सोलापूर

# तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, १४ जानेवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक २९० | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# सोयाबीन खरेदीसाठी कायमस्वरूपी यंत्रणा उभारण्यात यावी : मुख्यमंत्री

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि. १३ जानेवारी : दरवर्षी पणन विभागामार्फत सोयाबीनची खरेदी केली जाते. ही खरेदी कोणत्याही अडथळ्याशिवाय होण्यासाठी विभागाने कायमस्वरूपी यंत्रणा उभारावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी दिल्या. सह्याद्री अतिथीगृह येथे पणन विभागाकडून १०० दिवसात करण्यात येणारी कामाचा आढावा घेतल्यानंतर ते बोलत होते.

समृध्दी महामार्गालगत ॲग्रो हब उभारण्यात यावेत असे सांगून ते म्हणाले की, समृध्दी महामार्गगा लगत उभारण्यात येणार ॲग्रो हब, मॅग्नेट प्रकल्पाअंतर्गत उभी करावीत. या ठिकाणी सर्व सोयी सुविधा उभारण्यात याव्यात. या ॲग्रो हबसाठीचा आराखडा तयार करून सादर करण्याच्या सूचनाही फडणवीस यांनी दिल्या. पुढील वर्षीपासून राज्यात नोव्हेंबरमध्ये सुरू होणाऱ्या सोयाबीन खरेदीसाठीची तयारी ऑक्टोबरमध्ये पूर्ण करण्याच्या सूचना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शेतकऱ्यांची नोंदणीही ऑक्टोबरमध्ये पूर्ण करावी. सोयाबीन खरेदीसाठी कायमस्वरूपी उभारण्यात येणाऱ्या व्यवस्थेचे निकष ठरवावे. त्यामध्ये सर्व सोयी सुविधांचा अंतर्भाव असावा. कोणत्याही अडचणीशिवाय सोयाबीन खरेदी सुरू राहिली पाहिजे अशी यंत्रणा उभी करावी. राज्यातील चारही विभगात उभारण्यात येणाऱ्या ॲग्रो लोगिस्टीक हबचा प्रस्ताव सादर करावा. कांदा साठवणुकीसाठी कांदा चाळ हा उत्तम पर्याय आहे. त्यासाठी जास्त मागणी ही आहे. त्यामुळे या चाळींची संख्या वाढवावी अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

विभागाचे सादरीकरण करताना अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा यांनी नवी मुंबईत आंतरराष्ट्रीय दर्जाचा महाबाजार उभारण्याचे नियोजन असून किमान दोनशे ते अडीचशे एकर जागेमध्ये हा प्रकल्प राबवण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच राज्यातील प्रत्येक तालुक्यात एक बाजार समिती उभारण्यात येणार आहे. कोकण भागात माशांसाठी तर आदिवासी भागात तेथील स्थानिक उत्पादनासाठी बाजार समिती स्थापन करण्यात येणार असल्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले. राज्यातील १ कोटींपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या बाजार समित्यांचे एक ते अडीच कोटी, अडीच कोटी ते पाच कोटी, पाच ते दहा कोटी, दहा ते पंचवीस कोटी असे उपावर्गिकरण करणार. छ. संभाजी नगर जिल्ह्यातील जाभूरगाव येथे ॲग्रो हबची उभारणी पूर्ण झाली असून येत्या ४५ दिवसात त्याचे लोकार्पण करण्यात येणार असल्याचेही देवरा यांनी यावेळी सांगितले.

बैठकीस , शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मेघना साकोरे - बोर्डीकर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, आदी उपस्थित होते.

## जपानच्या क्यूशूमध्ये भीषण भूकंप, त्सुनामीचा अलर्ट

टोकयो: जपानच्या क्यूशूमध्ये सोमवारी भूकंपाचे जोरदार झटके बसले. या भूकंपाची तीव्रता ६.९ रिश्टर स्केल इतकी होती. अधिकाऱ्यांनी अनेक ठिकाणी त्सुनामीचा अलर्ट दिला आहे. मात्र अद्याप कोणत्याही प्रकारची हानी झाल्याचे वृत्त नाही. दरम्यान, भूकंपानंतर मियाझाकीमध्ये २० सेमी उंचीच्या त्सुनामीच्या लाटा दिसल्या. युरोपीय भूमध्यसागरीय भूकंप विज्ञान केंद्रानुसार भूकंपाची खोली ३७ किमी इतकी होती. जपानच्या हवामान विज्ञान एजन्सीने सांगितले भूकंप मियाजाकी प्रांतात स्थानिक वेळेनुसार रात्री ९ वाजून २० मिनिटांनी हा भूकंप आला. याआधी गेल्या वर्षी ८ ऑगस्टला जपानमध्ये ६.९ आणि ७.१ तीव्रतेचे दोन भूकंप आले होते. यामुळे क्यूशू आणि शिकोकूच्या दक्षिण-पश्चिम द्वीप हलले होते.

# ठाकरे, पवारांवर टीका हा महाराष्ट्राचा अपमान : संजय राऊत

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई,दि.१३ जानेवारी : बाहेरून कोणीतरी येऊन उद्धव ठाकरे, शरद पवार यांच्यावर टीका करतो हा बाळासाहेब ठाकरे व महाराष्ट्राचा अपमान आहे, येथील स्वाभिमानी जनता त्यांना योग्य वेळी धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही, असे प्रतिपादन ठाकरे गटाचे नेते खा.संजय राऊत यांनी सोमवारी केले.

भाजपाच्या शिर्डी येथे रविवारी झालेल्या अधिवेशनात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी भाषणात उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्यावर जोरदार टीका केली. त्याला प्रत्युत्तर देताना राऊत म्हणाले की,

उद्धव ठाकरें किंवा शिवसेना यांनी दगाफटका केलेला नाही. तर भाजपाने गद्दारीला खतपाणी घालण्याचे काम अमित शाह आणि मोदींनी केले आहे. आता तेच शिवसेनेवर टीका करत आहेत. उद्धव ठाकरेंना दगाबाज म्हणणं हा हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरेंचा अपमान आहे. या वाक्यावर टाळ्या वाजवल्या गेल्या हा महाराष्ट्राचा अपमान आहे. शरद पवार यांनी अख्खी हयात राजकारण, समाजकारण यांच्यासह सार्वजनिक आयुष्यात घालवली. त्यांना मोदींच्याच सरकारने पद्मविभूषण देऊन गौरविले आहे. त्यांच्यावर महाराष्ट्रात येऊन सडक्या शब्दांत टीका करणे हे महाराष्ट्रातल्या भाजपाच्या लोकांना पटलं आहे का? आवडलं आहे का? याचा खुलासा झाला पाहिजे. कुणीतरी बाहेरचे लोक येतात, पदावर असणारे नेते असतील. पण ज्यांनी महाराष्ट्रात येऊन तुम्ही शिवसेनेचा आणि शरद पवारांचा अपमान करता आणि समोर बसलेले लोक टाळ्या वाजवत आहेत. टाळ्या वाजवणाऱ्यांना लाज वाटली पाहिजे, अशी बोचरी टीका राऊत यांनी केली आहे.

### परळीत मोक्का लावलेली पोरंटोरं : संजय राऊत

परळीत जे काही घडले आहे त्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जोपर्यंत बीडमध्ये जाऊन आपला इंगा दाखवत नाही. तोपर्यंत हे सुरुच राहिल. काही पोराटोरांना त्यांनी मोक्का लावला आहे. ज्यांना मोक्का लावला आहे ते भाडोत्री आहेत. मुख्य आरोपी मोकाट आहेत. त्याच्यावर एक साधा गुन्हा टाकला आहे, त्यांचे बॉस मंत्रिमंडळात आहेत.केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना सांगू इच्छितो की महाराष्ट्रात आल्यानंतर तुम्हाला इथली परिस्थिती माहीत नाही का? गुंडांच्या मदतीने सरकार चालवणं ही महाराष्ट्राशी गद्दारी आहे अशी टीका त्यांनी केली.

# दरडग्रस्त तळीये गावाचे पुनर्वसन अद्यापही अपूर्णच : अंबादास दानवें



तभा वृत्तसेवा/वरिष्ठ प्रतिनिधी

महाड - सुमारे ३ वर्षे उलटूनही रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील तळीये या दरडग्रस्त गावातील रहिवाशांचे पूर्णतः पुर्नवसन झाले नाही.जे काही नागरिक येथे वास्तव्यास आले आहेत, ते मूलभूत सोयी सुविधांअभावी वंचित आहेत. त्यामुळे दरडग्रस्त तळीये गावातील समस्यांबाबत शासन दरबारी पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी गावकऱ्यांना दिली.

२२ जुलै २०२१ रोजी रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील तळीये या दरडग्रस्त गावाची विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आज पाहणी करून दुर्दैवी घटनेत मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना आदरांजली वाहिली. पुनर्वसित गावास भेट देऊन गावकऱ्यांना दिलेल्या घरांना भेट दिली. निर्माण झालेले घर उत्तम दर्जाचे असली तरीही अद्यापही संपूर्ण घराचे बांधकाम झालेले नाही. त्यातही दरडग्रस्त रहिवाशांना घरकुल मंजूर झालेले नाही. या राहिलेल्या रहिवाशांना घरकुल मंजुरीचा प्रस्ताव तयार करण्यात यावा तसेच पाणी, वीज, रस्ते व इतर सोयीसुविधा तातडीने गावकऱ्यांना मिळण्यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

तसेच येथे १०० घरे जरी दिली असली तरी डोंगराळ भागतील वाड्यावस्तीत राहणारे गावकरी अजून येथे राहण्यास आले नाही. भविष्यात अशा दुर्घटना घडू नये, यासाठी शासनाने पावले उचलणे आवश्यक असताना शासनाने त्यांचे पुर्नवसन का केले नाही की शासन अजून अशा दुर्घटना होण्याची वाट बघत आहे का असा संतप्त सवाल दानवे यांनी उपस्थित केला. याप्रसंगी कार्यकरी अभियंता सलोनी निकम, प्रांत अधिकारी ज्ञानेबा बनापुरे,तहसिदार महेश शितोळे, शिवसेना दक्षिण रायगड संपर्कप्रमुख नागेंद्र राठोड, जिल्हाप्रमुख नंदूशेठ शिर्के, माजी नगराध्यक्ष स्नेहल जगताप,उपजिल्हाप्रमख पद्माकर मोरे, विधानसभा प्रमुख अमित मोरे, विधानसभा संघटक धनंजय देशमुख, सुभाष मोरे व आशिष पळसकर उपस्थित होते.

# राज्यघटनेच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त काँग्रेसचे राज्यव्यापी अभियान

## २६ जानेवारी पासून वर्षभर संविधान वाचवा राष्ट्रीय पदयात्रा अभियान

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि. १३ जानेवारी : राज्यघटनेच्या ७५ व्या वर्धापनदिनी २६ जानेवारीला 'जय बापू, जय भीम, जय संविधान' रॅलीचे राज्य, जिल्हा व ब्लॉक स्तरावर आयोजन करण्यात आले आहे. हे अभियान अधिक मजबूत करण्यासाठी २६ जानेवारी २०२५ ते २६ जानेवारी २०२६ या दरम्यान 'संविधान वाचवा राष्ट्रीय पदयात्रा' ही देशव्यापी जनसंपर्क मोहिम सुरु केली जाणार आहे., अशी माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सोमवारी दिली.

विधानसभा निवडणुकीतील दारुण पराभवानंतर पक्षात मोठी मरगळ आली आहे. त्यामुळे या अभियानामुळे पदाधिकारी, कार्यकर्तेंना ऊर्जितावस्था मिळण्यासाठी उपक्रम राबविले जात आहेत.

या अभियानात प्रदेश काँग्रेसचे सर्व पदाधिकारी, आजी माजी आमदार, खासदार, सेल व विभागाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होणार आहेत.

भाजपाकडून संविधान व संविधान निर्मात्याचा सात्यत्याने अवमान केला जात असताना महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सन्मान, राज्यघटना, सामाजिक न्याय व समानतेच्या मुल्यांचे रक्षण करण्यासाठी काँग्रेस पक्ष कट्टीबद्ध आहे. याच हेतूने काँग्रेस पक्षाने 'जय बापू, जय भीम, जय संविधान' हे अभियान आयोजित केले आहे. देशपातळीवर ३ जानेवारीपासून हे अभियान सुरु झाले असून २६ जानेवारी रोजी मध्य प्रदेशातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, महू येथे एक भव्य रॅलीने त्याची सांगता होणार आहे.अशी माहितीही पटोले यांनी दिली.

## जानेवारी अखेरपर्यंत राहणार थंडीचा प्रभाव

पुणे : राज्यातील थंडीत चढ उतार होत असून, थंडीच प्रभाव जानेवारी अखेरपर्यंत राहण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. गेले काही दिवस राज्यात थंडी जोर वाढला आहे. अनेक भागातील कमाल तसेच किमान तापमान घटले आहे. गेल्या २४ तासात काही भागात कमाल तापमान १ ते ३ अंश सेल्सिअसने वाढल्याने उबदारपणा जाणवत आहे. मात्र मंगळवारनंतर पुन्हा थंडीचा कडाका वाढणार आहे. रविवारपर्यंत थंडीची अशीच स्थिती असेल. ज्येष्ठ हवामान तज्ञ माणिकराव खुळे म्हणाले, सध्या मुंबईसह संपूर्ण कोकणातील ७ जिल्ह्यात दुपारी ३ चे कमाल तापमान सरासरीच्या जवळपास एक डिग्रीने कमी तर पहाटेचे किमान एक डिग्रीने वाढलेले जाणवत आहे.

### भा.शि.प्र संस्थेचे त्रैवार्षिक शिक्षण शिबीर उत्साहात संपन्न

# संघ भावनेतून संस्था काम करत असते : डॉ. हेमंत वैद्य



छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) : भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संस्थेचे त्रैवार्षिक शिक्षण शिबीर २०२४ - २५ छत्रपती संभाजीनगर येथे उत्साहात संपन्न झाले. तीन दिवसीय निवासी शिक्षण शिबीर एम.आय.टी. शैक्षणिक संकुल छत्रपती संभाजीनगर येथे उत्साहात संपन्न झाले.

समारोप सत्रात माजी आमदार श्रीकांत जोशी म्हटले की मला सांगायला अभिमान वाटतो की भा. शि. प्र.संस्थेच्या लालबहादूर शास्त्री विद्यालयाचा मी विद्यार्थी आहे. आज समाजात उभा आहे यात माझ्या शाळेचा मोलाचा वाटा आहे. आजच्या युगात शिक्षणासोबत आरोग्य सुदृढ असावे यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करावा.भा. शि. प्र. संस्थेची ताकद म्हणजे काय तर यामध्ये ४४ शै.संकुले यात शिक्षण घेणारे जवळपास ४५हजार विद्यार्थी व १३१० शिक्षक आहेत. हे सर्व देश घडविण्यासाठी पेटून उठले आहेत,याच सामर्थ्यावर बलशाली भारत उभा राहणार आहे.

### संस्थेतील विद्यार्थी देश घडविण्यासाठी पेटुन उठले पाहिजे -माजी आ. श्रीकांत जोशी

शिक्षक हा माणूस घडवणारा असतो. तो सर्व शिक्षणाचा आणि अशा प्रकारे मानवजातीच्या, वर्तमान आणि भविष्यातील संपूर्ण संस्कृतीचा पाया आहे.त्यामुळे संस्थेतील विद्यार्थी देश घडविण्यासाठी पेटुन उठले पाहिजे. शिक्षकांनी स्वतः चे आरोग्य निरोगी ठेवुन देशसेवेचे कार्य करावे असे प्रतिपादन मा. आ श्रीकांत जोशी यांनी केले.

विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकसित करण्यासाठी शिक्षकांना केंद्रबिंदू मानून त्यांना प्रशिक्षित व प्रगल्भ अशा वक्त्यांचे मार्गदर्शन १३सत्रात करण्यात आले होते.मराठवाड्यातील भौगोलिक दृष्ट्या सर्वात मोठी असलेली संस्थेच्या ४४ संकुलतील जवळपास ४५हजार विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या १३१० शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी या शिबीरात सहभागी झाले होते.यासमवेत शिक्षकांच्या आरोग्याच्या दृष्टीने विविध वैद्यकीय तपसण्या करून डॉ. जयंत जोशी यांनी त्याप्रमाणे शिक्षकांना व्यायाम, चालणे, प्रवास,वाचन,झोप,आहार,आनंद देणाऱ्या बाबी करण्याचा सल्ला दिला.सोबतच विद्यार्थी दैवत समजून कार्य करा असे प्रतिपादन केले. या शिबिरात शैक्षणिक सोबत वैचारिक, सामाजिक, पर्यावरण पूरक व आरोग्यदायी अशा विविध विषयांवर आणि वक्ते बोले त्यामध्ये शैक्षणिक समरसता-विष्णू पादानंदस्वामी, शिक्षकांची जीवनशैली-धनंजय केशवराव धामणे,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर-पुष्कर शास्त्री,आधुनिक काळातील शैक्षणिक आव्हाने-अनिल साबळे, संस्था काल,आज,उद्या -डॉ. हेमंत वैद्य,सुनिल लोढा, भारतीय ज्ञान परंपरा-श्रेयश कुऱ्हेकर, शिक्षक ते कार्यकर्ता- डॉ. शरद हेबाळकर, संस्था कुलधर्म कुलाचार(आयमश :)- महेश कस्तुरे,राजाभाऊ धाट,प्रफुल्ल कुलकर्णी, आरोग्य मार्गदर्शन- डॉ. जयंत जोशी , आधुनिक तंत्रज्ञानाचा अध्यापनामध्ये उपयोग-बालाजी जाधव,राष्ट्रीय शैक्षणिक धोरण(वर्गनिहाय )-कीर्ती देशपांडे,जगदीश इंदलकर, मनीष देशपांडे मिलिंद नाईक गणेश मुडेगावकर, कृष्णा पाटील, सतीश हिवरेकर, संस्था संवर्धनासाठी माझा दृष्टिकोन- वामन देशपांडे, माझी शाळा माझी जबाबदारी -दिवाकर कुलकर्णी,इ -कचरा अशा विभिन्न व अभ्यास पूर्ण १३ सत्र संपन्न झाले.शिबिराच्या प्रथम दिनी विशेष कलादालनाचे उदघाटन मंत्री अतुल सावे व एम. आय. टी चे सचिव मुनीशजी शर्मा यांच्या शुभहस्ते करण्यात आले. शिक्षकांचा सांस्कृतिक कार्यक्रमात सर्व संकुलनी सहभागी होत कला सादर करत उपस्थितींची मन जिंकली.

कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य प्रास्ताविकात बोलताना ते म्हटले की संघ भावनेतून संस्था काम करत असते भारतीय शिक्षण प्रसारक संस्था ही समाजाभिमुख संस्था आहे. संस्था अमृत महोत्सवाच्या(७५वर्षे )दिशेने आज वाटचाल यामध्ये शिक्षकांची भूमिका महत्वपूर्ण ठरली आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा संस्थेचे अध्यक्ष सुरेंद्र आलूरकर बोलताना म्हटले की आपल्या सगळ्यांची गुणवत्ता वाढावी यासाठी हे शिक्षण शिबीर आयोजन आपण केले. शैक्षणिक गुणवत्ता विकास झाल्याचे स्वतः ला अनुभवले पाहिजे सोबतच सहकाऱ्यांना जाणवले पाहिजे, तेव्हा प्रगती निश्चित आहे.प्रमुख अतिथी अनिल भालेराव मार्गदर्शनात आपल्या वाटेला आलेले काम हे जगातील सर्वात चांगले काम आहे ज्याला जे काम दिले आहे त्याने ते उत्कृष्ट केले पाहिजे. भौतिक सुविधांपेक्षा आपले अध्यापन कार्य प्रभावी असावे जेणेकरून मुले तल्लीन होऊन जातील. प्रतिपादित केले.

कार्यक्रमास माजी आमदार श्रीकांत जोशी,एम. आय.टी चेअध्यक्ष यज्ञवीर कवडे,संस्थेचे अध्यक्ष सुरेंद्र आलूरकर, कार्यवाह हेमंत वैद्य,विद्यासभा अध्यक्ष जयंत जोशी,विद्यासभा उपाध्यक्ष उमेश जगताप, अनिल भालेराव,केंद्रीय कार्यकारणी सदस्य, स्थानिक पदाधिकारी, पत्रकार,मुख्याध्यापक उपस्थित होते.

शिबिराचे महाव्यवस्थापक भास्कर कुलकर्णी यांच्या नेतृत्वात शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेत त्रैवार्षिक शिबीर यशस्वी केले.

**शिक्षकांची रॅली ठरली आकर्षक**

स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त काढण्यात आलेली रॅली ही एक आकर्षण ठरले

**तीन दिवस थाटली होती शिक्षकांची मांदियाळी**

या त्रैवार्षिक शिबिरा निमित्त छत्रपती संभाजी नगर येथे मराठवाड्यातील विविध विविध संस्कार केंद्रातून चौदाशे शिक्षकांची मांदियाळी या ठिकाणी थाटली होती त्यामुळे एक चैतन्याचे व ज्ञानची शिदोरी घेऊन जाण्यासाठी उत्सुकता लागली होती.

**कलादालनाने सर्वांची मने जिंकले**

विद्यार्थी व शिक्षक यांनी स्वतः काढलेली आहे विविध कलाकृती चित्रे , प्रतिकृती , विविध माहिती संग्रहित करून एक प्रदर्शन भरवत सर्व शिक्षकांचे मन या कलादालनाने जिंकले.





एक नॉन-पार, लिंक्ड, जीवन, वैयक्तिक बचत योजना

आमचा व्हाट्सॲप नं. 8976862090 बोला 'Hi'

अधिक माहितीसाठी तुमच्या एजंट/जवळची एलआयसीची शाखा यांच्याशी संपर्क साधा किंवा 56767474 वर तुमच्या शहराचे नाव एसएमएस करा

एलआयसी मोबाईल ॲप डाऊनलोड करा LIC digital | भेट द्या: licindia.in | कॉल सेंटर सेवा (022) 6827 6827

आम्हाला फॉलो करा: LIC India Forever | IRDAI Regn No.: 512

LIC भारतीय आयुर्विमा महामंडळ भारतीय जीवन बीमा निगम LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA


प्रत्येक क्षणी तुमच्या सोबत

LIC/P1/2024-25/41/Mar

भ्रामक फोन कॉल्स आणि बनावट/फसव्या ऑफर्सपासून सावध रहा. आयआरडीएआय किंवा त्यांचे अधिकारी विमा पॉलिसीज्ची विक्री, बोनस जाहीर करणे किंवा प्रिमियम्सची गुंतवणूक, रकमा परत करणे यासारख्या विमा व्यवसायाशी संबंधित कोणत्याही कामकाजात सहभाग घेत नाहीत, अशा प्रकारचे दुरध्वनी येणाऱ्या पॉलिसीधारकांनी अथवा संभाव्य ग्राहकांनी पोलिसांकडे तक्रार नोंदवावी. कृपया विक्रीचा व्यवहार पूर्ण करण्यापुर्वी अधिक माहितीसाठी तसेच जोखमींचे घटक, नियम व अटी यासंबंधीच्या माहितीसाठी, विक्री माहितीपुस्तिका काळजीपूर्वक वाचा.

लिंक्ड इन्श्युरन्स प्रॉडक्टस् हे परंपरागत इन्श्युरन्स प्रॉडक्टस् पेक्षा वेगळे असतात आणि हे जोखिम घटकांच्या अधीन असतात.
लिंक्ड इन्श्युरन्स पॉलिसीज् मध्ये भरण्यात येणारे प्रिमियम हे बाजारपेठेतील भांडवल आणि जाहीररीत्या उपलब्ध असणारा निर्देशांक यांच्याशी संबंधित गुंतवणूकीच्या जोखमींच्या अधीन असतात. फंडाची कामगिरी आणि भांडवली बाजारपेठ/जाहीररीत्या उपलब्ध असणारा निर्देशांक यांच्यावर परिणाम करणारे घटक यांच्या आधारे युनिट्सचा एनएव्ही कमी जास्त होऊ शकतो आणि विमाधारक व्यक्ती ही त्याच्या/तिच्या निर्णयासाठी स्वतःच जबाबदार असते.
लाइफ इन्श्युरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया हे केवळ लाइफ इन्श्युरन्स कंपनीचे नाव आहे आणि निवेश प्लस हे केवळ संलग्न इन्श्युरन्स कॉन्ट्रॅक्टचे नाव आहे आणि त्यातून कॉन्ट्रॅक्टची गुणवत्ता, त्याच्या भविष्यातील संभावना किंवा परतावे या गोष्टी कोणत्याही प्रकारे सूचित होत नाहीत.
कृपया तुमचे विमा एजंट किंवा मध्यस्थ किंवा इन्श्युरन्स कंपनीने दिलेले पॉलिसी डॉक्युमेन्ट यांच्यामधून संबंधित जोखमी आणि लागू होणारे भार यांची माहिती घ्या.
या कॉन्ट्रॅक्ट अंतर्गत देऊ करण्यात येणारे वेगवेगळे फंड्स ही फक्त फंडांची नावे आहेत आणि ती कोणत्याही प्रकारे या प्लॅन्सची गुणवत्ता, त्यांच्या भविष्यकाळातील संभावना आणि परतावे सूचित करीत नाहीत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



सोयगाव– पाचोरा तालुक्यातील कळमसरा येथील जागृत देवस्थान आई तुळजाभवानी माता मंदिर येथे यात्रा सुरू झाली त्यानिमित्ताने भाविकांची दर्शनासाठी गर्दी
(छायाचित्र – साई बोखारे,सोयगाव)

# १० व्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे १५ ते १९ जानेवारी २०२५ दरम्यान आयोजन

## महोत्सवात भारतीय सिनेमा स्पर्धा विभागाचा समावेश, जगभरातील ६५ फिल्म्सचे होणार प्रदर्शन

छत्रपती संभाजीनगर, दि.१३ : जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट मराठवाड्यातील रसिकांपर्यंत पोहोचवणार्या दहाव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची घोषणा करण्यात आलेली असून बुधवार, दि. १५ ते रविवार, दि. १९ जानेवारी २०२५ या दरम्यान हा महोत्सव पीव्हीआर–आयनॉक्स थिएटर प्रोझोन मॉल, छत्रपती संभाजीनगर येथे राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय पातळीवरील कलावंताच्या मांदियाळीत संपन्न होणार आहे.

नाथ ग्रुप, एमजीएम विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण सेंटर व मराठवाडा आर्ट कल्चर व फिल्म फाउंडेशन आयोजित अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव हा भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने संपन्न होत असून प्रोझोन मॉल यांचे विशेष सहकार्य या फेस्टिव्हलला मिळालेले आहे. एनएफडीसी व महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ, महाराष्ट्र शासन यांची सहप्रस्तुती असणार आहे. डेली हंट डिजीटल पार्टनर आहेत. सॉलीटेअर टॉवर्स हे या महोत्सवाचे सह आयोजक आहेत. एमजीएम स्कूल ऑफ फिल्म आर्टस या महोत्सवाचे ॲकॅडमीक पार्टनर तर एमजीएम रेडिओ एफएम ९०.८ हे रेडिओ पार्टनर आहेत.

भारतीय सिनेमा स्पर्धा :

महोत्सवाच्या पाच दिवसांच्या कालावधीत भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. महोत्सवात मागील वर्षाप्रमाणे भारतीय स्पर्धा गटाचा समावेश करण्यात आलेला आहे. यात विविध भारतीय भाषांतील नऊ सिनेमांचा समावेश असून पाच राष्ट्रीय पातळीवरील ज्युरी हे प्रेक्षकांसह चित्रपट पाहणार आहेत. यातील सर्वोत्कृष्ट भारतीय चित्रपटाला सुवर्ण कैलास पारितोषिक व एक लक्ष रूपये देण्यात येणार आहे. तसेच सर्वोत्कृष्ट पटकथा, सर्वोत्कृष्ट कलाकार (स्त्री/पुरुष) या वैयक्तिक पारितोषिकांचा देखील समावेश असणार आहे.

कालिया मर्दन विशेष प्रदर्शन, उद्घाटन सोहळा व जीवन गौरव पुरस्कार :

महोत्सवाच्या दशकपुर्ती वर्षाच्या निमित्ताने आयोजन समितीच्या वतीने मराठवाड्यातील रसिकांना एका विशेष कार्यक्रमाची भेट दिली जाणार आहे. भारतीय सिनेसृष्टीचे संस्थापक दादासाहेब फाळके यांनी १०५ वर्षांपूर्वी दिग्दर्शित केलेला प्रसिध्द मुकपट कालिया मर्दन याचे विशेष प्रदर्शन उद्घाटन सोहळ्याआधी संपन्न होणार आहे. शंभर वर्षांपूर्वीचे मुकपट सिनेगृहात प्रत्यक्ष संगीताद्वारे (लाईव्ह ऑर्केस्ट्रा) दाखविले जात. तोच अनुभव रसिकांना मिळावा म्हणून कालिया मर्दन हा मुकपट कोलकाता येथील सतब्दीर सब्द या वाद्यवृंद समूहातर्फे सादरीकरणाद्वारे दाखविला जाणार आहे. एमजीएम विद्यापीठाच्या रूक्मीणी सभागृहात बुधवारी, दि. १५ जानेवारी २०२५ रोजी सायं. ५ वा. या मुकपटाचे प्रदर्शन करण्यात येईल. कालिया मर्दन विशेष प्रदर्शन व उद्घाटन सोहळ्यासाठी सर्वांसाठी प्रवेश खुला असेल यानंतर लगेचच याच ठिकाणी चित्रपट महोत्सवाचा उद्घाटन सोहळा बुधवारी, दि. १५ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजता रूक्मीणी सभागृह, एमजीएम परीसर, छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न होणार आहे. या महोत्सवाचे उद्घाटन महोत्सवाचे मानद अध्यक्ष व प्रसिध्द दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांच्या हस्ते होणार आहे. यंदाचा पद्मपाणि जीवनगौरव पुरस्कार प्रसिध्द व ज्येष्ठ लेखिका, नाटककार, निर्मात्या व चित्रपट दिग्दर्शिका पद्मभूषण मा. सई परांजपे यांना त्यांच्या भारतीय सिनेमातील अतुल्य योगदानाबद्दल संयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल व एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून एनएफडीसीच्या गौरी नायर, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाच्या विशेष कार्य अधिकारी संजय कृष्णाजी पाटील, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, महोत्सव संचालक सुनील सुकथनकर, महोत्सवाचे कार्यकारी संचालक चंद्रकांत कुलकर्णी, प्रोझोनचे सेंटर डायरेक्टर व वरिष्ठ उपाध्यक्ष कमल आर. सोनी उपस्थित राहणार आहेत. उद्घाटन सोहळ्यानंतर रात्री ९ वा. पीव्हीआर–आयनॉक्स, प्रोझोन मॉल येथे यावर्षीची जागतिक पातळीवरील नावाजलेली फ्रेंच आणि तामिळ भाषेतील फिल्म लिटील जाफना(ङळ्ळींश्रश गरषषपर)फेस्टिव्हलची ओपनिंग फिल्म म्हणून प्रदर्शित केली जाणार आहे. उद्घाटन सोहळ्यानंतर पुढील चार दिवस महोत्सव पीव्हीआर–आयनॉक्स, प्रोझोन मॉल येथे संपन्न होईल.

समारोप सोहळा :

फेस्टिव्हलचा समारोप सोहळा रविवार, दि. १९ जानेवारी २०२५ रोजी सायं. ५ वाजता पीव्हीआर आयनॉक्स प्रोझोन मॉल येथे संपन्न होणार आहे. सुप्रसिध्द नृत्य व चित्रपट दिग्दर्शिकाफराह खान, ऑस्कर विजेते साउंड डिझायनर रसूल पुक्कुट्टी व आयोजन समितीचे मानद अध्यक्ष प्रसिध्द दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत समारोप सोहळा संपन्न होईल.

## जेव्हीसी ने क्यूएलईडी टीव्हीच्या प्रीमियम श्रेणीसह भारतीय बाजारपेठेत प्रवेश

मुंबई : कंज्यूमर इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील जगप्रसिद्ध जपानी ब्रँड जेव्हीसी अधिकृतपणे भारतीय टीव्ही बाजारात प्रवेश करत आहे, जो जेव्हीसीसाठी अभिमानाचा क्षण आहे. अत्याधुनिक नवोपक्रम राबविण्यात आघाडीवर राहण्याचा जेव्हीसीचा वारसा १९२७ पासून सुरू आहे. जेव्हीसी जवळजवळ एका शतकापासून प्रीमियम तंत्रज्ञान आणि अतुलनीय ऑडिओ–व्हिज्युअल अनुभव देत आहे. टेलिव्हिजन लाँच करणारा पहिला ब्रँड आणि टेलिव्हिजन उद्योगातील प्रणेता जेव्हीसी आता प्रीमियम स्मार्ट क्यूएलईडी टेलिव्हिजनच्या नवीन श्रेणीसह भारतात सर्वोत्तम दर्जाचा वारसा घेऊन येत आहे आणि घरगुती मनोरंजनासाठी एक नवीन मानक स्थापित करत आहे. जेव्हीसीने भारतातील पहिला ४० इंच क्यूएलईडी टीव्ही देखील लाँच केला आहे. जेव्हीसीचा भारतीय बाजारपेठेत प्रवेश हा ब्रँडसाठी एक महत्त्वपूर्ण संधी आहे, जो ग्राहकांच्या बदलत्या गरजा पूर्ण करणारी उच्च–गुणवत्तेची, नाविन्यपूर्ण उत्पादने तयार करण्याची त्याची वचनबद्धता दर्शविते. जेव्हीसी ९७ वर्षांहून अधिक काळापासून ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स उद्योगात कार्यरत आहे आणि त्यांनी कौशल्य, विश्वासार्हताचे प्रदर्शन केले आहे. हा वारसा त्यांच्या नवीन टेलिव्हिजन श्रेणीसह सुरू आहे, ज्यामुळे भारतीय ग्राहकांना घरी जागतिक दर्जाचे मनोरंजन मिळेल.

## स्वतःच्या पद्धतीने ड्रोवी काढा आणि बक्षीसे जिंका राज्यस्तरीय ऑनलाइन रेखाचित्र स्पर्धेचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर – राज्यातील ३ ते १३ वयोगटातील विद्यार्थ्यांना त्यांची सर्जनशीलता दाखवण्याची अनोखी संधी उपलब्ध झाली आहे. या वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी मुंबईतील आघाडीची आरोग्यसेवा कंपनी मेफार्म लाईफसायन्सेसने ड्रोवी राज्यस्तरीय रेखाचित्र स्पर्धा २०२५ आयोजित केली आहे. विशेष म्हणजे ही स्पर्धा ऑनलाइन घेतली जाणार आहे.विजेत्यांना प्रत्येक वयोगटात तीन रोख बक्षीसे दिली जातील. सर्व सहभागींना ई–प्रमाणपत्रे दिली जाणार आहेत. तर रोख बक्षीसे महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमधील आघाडीच्या बालरोग तज्ज्ञांद्वारे वितरित केली जातील. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यानंतर त्यांनी त्यांचे रेखाचित्र क्युआर कोडद्वारे किंवा व्हाट्सॲप क्रमांकाद्वारे सबमिट करायचे आहे. स्पर्धेसाठीची आवश्यक माहिती देखील त्यात आहे. स्पर्धेचा फॉर्म मिळविण्यासाठी, पूर्ण करण्यासाठी आणि सबमिट करण्यासाठी पालक त्यांच्या बालरोग तज्ज्ञांच्या रिसेप्शनिस्टशी देखील संपर्क साधू शकतात. मुलांची रेखाचित्रे २६ जानेवारी २०२५ पर्यंत क्युआर कोडद्वारे किंवा व्हाट्सॲप द्वारे दाखल करू शकतात.

## तेनाली पुन्हा विजयनगरात परतला आहे

सोनी सबवरील 'तेनाली रामा' मालिकेत तेनाली रामा या महान प्रज्ञावंताच्या गोष्टी सांगितल्या जातात. मालिकेत सध्या तेनाली (कृष्ण भारद्वाज) पुन्हा विजयनगर साम्राज्यात परतला आहे. राज्यावर आलेल्या संकटाचा सामना करून आपल्या हुशारीने साम्राज्याचे संरक्षण करण्याचे आव्हान त्याच्या पुढे आहे. अलीकडच्या भागांमध्ये तेनाली रामाचे भूत आपण पाहिले असा समज होऊन तथाचार्य (पंकज बेरी) हादरले आहेत, कारण तेनालीच्या मृत्यूची वार्ता सगळीकडे आधीच पसरलेली असते. दरम्यान, तेनाली आपल्या नावाला लागलेला कलंक धुवून काढण्यासाठी आणि आपले निरपराधित्व राजासमोर सिद्ध करण्यासाठी एक युक्ती करतो.

## फिटनेसच्या समर्पणासाठी किशोरी शहाणे घालत आहे स्वतःचे आदर्श उदाहरण!

नावाजलेल्या अभिनेत्री किशोरी शहाणे यांनी नेहमीच आपल्या उत्तम अभिनयाने प्रेक्षकांचे लक्ष वेधले असून आता आपल्या फिटनेसप्रतिच्या समर्पणाने त्या एक आदर्श उदाहरण घालून देत आहेत. सध्या झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका 'कैसे मुझे तुम मिल गये'मध्ये बबिता आहुजाच्या रूपात दिसून येणाऱ्या किशोरी यांनी हे सिद्ध केले आहे की निरोगी आणि सक्रिय जीवनशैली राखण्यामध्ये वयाची अट असू शकत नाही. ह्या मालिकेच्या सेटवर किशोरी शहाणे ह्या अनेकदा आपल्या सहकलाकारांना हलकेफुलके स्ट्रेचेस आणि व्यायाम करण्यासाठी प्रोत्साहन देताना दिसून येतात. हल्लीच त्या जिममध्ये दिसून आल्या आणि आपल्या फिटनेसप्रति त्यांचे समर्पण त्यांचे चाहते आणि सहकारी सर्वांसाठीच प्रेरणादायी आहे. आपल्या आरोग्य आणि स्वास्थ्यासाठी त्यांचे अढळ समर्पण हे त्यांच्या उजळलेला चेहरा, उत्तम ऊर्जा आणि व्यस्त चित्रीकरणाच्या शेड्युलला सहजपणे सामोरे जाण्याची क्षमता यांमधून प्रतिबिंबित होते.

## जुळ्या मुलांना वाचवण्यासाठी राजेशचे खतरनाक धाडस

सोनी सबवरील 'वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से' मालिकेत वागले या मध्यमवर्गीय कुटुंबाचा दैनंदिन संघर्ष आणि त्यांचे यशापयश यांचे चित्रण असते. अलीकडच्या भागांमध्ये वंदना (परिवा प्रणती) च्या भाचीच्या लग्नात एक मोठे विघ्न येते, जेव्हा त्यांनी लग्नासाठी भाड्याने ठेवलेली जागा आयत्या वेळी रद्द करण्यात येते. त्यांना मदत करण्यासाठी राजेश (सुमित राघवन) त्यांना लग्नासाठी साई दर्शन सोसायटीचा कम्युनिटी हॉल देऊ करतो. पण प्रकरण आणखी गुंतागुंतीचे होते, जेव्हा त्याच दिवशी सोसायटीतील एक अन्य सदस्य त्याच जागी एक प्रार्थना सभा योजतो. या गोंधळाच्या स्थितीत राजेश सर्वांना शांत करून सांगतो की, हे दोन्ही प्रसंग येथे सुरळीतपणे होऊ शकतात. प्रार्थना सभा लॉनवर आणि लग्न हॉलमध्ये करता येईल.

# पारनेर तालुक्याच्या सर्वांगिण विकासासाठी अधिकारी व लोकप्रतिनिधींनी समन्वयाने काम करावे : राधाकृष्ण विखे पाटील

अहिल्यानगर दि.१३– पारनेर तालुक्याच्या सर्वांगिण विकासासाठी अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या.

पारनेर येथील लक्ष्मी मंगल कार्यालयात तालुकास्तरीय अधिकाऱ्यांसमवेत आयोजित बैठकीत मंत्री श्री.विखे पाटील बोलत होते. बैठकीस आमदार काशिनाथ दाते, उपविभागीय अधिकारी श्रीकांत चिंचकर, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजी लांगोरे, तहसीलदार गायत्री सैंदणे, गट विकास अधिकारी दयानंद पवार उपस्थित होते.

जलसंपदा मंत्री श्री.विखे पाटील म्हणाले, तालुक्यातील प्रत्येक अधिकाऱ्याने कोणाच्याही दबावाला बळी न पडता



### पिंपळगाव जोगा कालव्याची जलसंपदामंत्र्यांनी केली पाहणी

पारनेर शहरापासून जवळ असलेल्या पिंपळगाव जोगा कालव्याची जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करत अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचनाही केल्या.

नियमानुसार व निर्भीडपणे काम करावे. नागरिकांच्या तक्रारींचा तातडीने निपटारा करावा. चांगले काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देण्याबरोबरच कामचुकारपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असेही मंत्री श्री. विखे पाटील म्हणाले.

तालुक्यातील प्रत्येक घरासाठी आणि शेतकऱ्यांना पुरेशा प्रमाणात व योग्य दाबाने वीज मिळाली पाहिजे. तालुक्यातील विद्युत रोहित्रांची, सिंगल फेजची कामे



विहित वेळेत पूर्ण झाली पाहिजेत. भविष्यातील विजेची मागणी लक्षात घेता सौर ऊर्जेला शासनाचे प्राधान्य असून मागेल त्याला मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजनेंतर्गत शेतकऱ्यांना सौरकृषी पंपाचे वितरण करण्यात यावे. विजेच्या बाबतीमध्ये एकाही नागरिकाची तक्रार येणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही मंत्री श्री. विखे पाटील यांनी दिल्या. सामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व अधिकाऱ्यांना १०० दिवसांचा कृती कार्यक्रम निश्चित करुन दिला आहे. त्यामुळे येत्या काळात राज्यासह आपल्या जिल्ह्याचा विकास अधिक गतीने होताना निश्चितच आपणास दिसेल, असा विश्वास व्यक्त करत पारनेर तालुक्याचा पाणी प्रश्न कायमस्वरूपी मिटविण्यासाठी सर्वो तोपरी प्रयत्न करण्यात येतील, असेही ते यावेळी म्हणाले.

## प्रतिबंधित मांजा विक्री करणारा ताब्यात तोफखाना पोलिसांची कारवाई

नगर : विक्री व वापरासाठी प्रतिबंध असलेला पतंगाचा नायलॉन मांजा विक्री करणाऱ्या ओंकार सुरेश कांबळे यास तोफखाना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे तोफखाना भागातील नवरंग व्यायाम शाळेजवळ प्रतिबंधित नायलॉन मांजाची विक्री होत असल्याची खात्री झाल्यानंतर अधिक चौकशी केली असता ३० हजार रुपये किमतीच्या मोनो केटीसी फायटर असे नाव असलेल्या ६० चकऱ्यासह कांबळे यास ताब्यात घेण्यात आले. याप्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १२५ वगैरे नुसार पो.कॉ. म्हस्के यांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पो. हे. कॉ. गर्जे हे करीत आहेत.

### केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते महाराष्ट्र केसरी स्पर्धा मैदानाचा मातीपूजन सोहळा संपन्न

# कुस्तीला वैंभव मिळवून देण्यासाठी एकत्रित प्रयत्न करा–मुरलीधर मोहोळ

अहिल्यानगर दि.१३– केंद्रीय नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते कै. बलभीमअण्णा जगताप क्रीडा नगरी वाडिया पार्क येथे महाराष्ट्र केसरी स्पर्धा मैदानाचे मातीपूजन करण्यात आले. कुस्तीला नवे वैभव मिळवून देण्यासाठी सर्वांनी मिळून एकत्रित प्रयत्न करावे, असे आवाहन श्री.मोहोळ यांनी केले.

कार्यक्रमाला आमदार शिवाजीराव कर्डिले, आमदार तथा अहिल्यानगर कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष संग्राम जगताप, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष पै.रामदास तडस, महापालिका आयुक्त यशवंत डांगे, माजी आमदार अरुणकाका जगताप, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष पै.संदीप भोंडवे, उपाध्यक्ष गुलाबराव दगडे, सरचिटणीस हिंदकेसरी पै.योगेश



दोडके आदी उपस्थित होते.

केंद्रीय राज्यमंत्री श्री.मोहोळ म्हणाले, अहिल्यानगर जिल्ह्याला कुस्तीची वैभवशाली परंपरा आहे. त्यामुळे इथे होणारी महाराष्ट्र केसरी स्पर्धा निश्चितपणे मोठी आणि यशस्वी होईल. खाशाबा जाधव यांच्यानंतर ऑलिम्पिकमध्ये पदक मिळविणारा पैलवान आपल्याकडे झाला नाही. त्यामुळे अशा स्पर्धेतून कुस्तीमध्ये देशाचे नेतृत्व करणारे कुस्तीगीर घडविण्याची गरज आहे. स्पर्धेचे यशस्वीपणे आयोजन झाल्यास कुस्तीगीरांना प्रेरणा मिळते. अहिल्यानगरमध्ये होणारी स्पर्धा कुस्ती क्षेत्राला नवी ऊर्जा देण्यात यशस्वी ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्रातल्या मातीतल्या या खेळाला शासनाने भरीव अर्थसहाय्य दिले असून महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी १ कोटी रुपये देण्याचा आणि महाराष्ट्र केसरी आणि हिंदकेसरींच्या पुरस्कार रकमेतही वाढ करण्याचा निर्णय शासनाने यापूर्वीच्या स्पर्धेच्यावेळी घेतला आहे, असेही ते म्हणाले.

आमदार कर्डिले म्हणाले, कुस्तीमुळे शरीर निरोगी आणि मन शुद्ध रहाते, जीवनात नवी ऊर्जा मिळते. लाल मातीत श्रम करतांना पैलवानांनी चुकीच्या गोष्टीपासून दूर राहण्याचा प्रयत्न करावा. स्पर्धेच्या निमित्ताने पैलवानांना प्रोत्साहन दिल्यास त्यांना पुढील कारकिर्दीसाठी ऊर्जा मिळेल, असे त्यांनी सांगितले.

आमदार जगताप म्हणाले, महाराष्ट्र केसरी स्पर्धेला वेगळे महत्व आहे. २९ जानेवारी ते २ फेब्रुवारी या कालावधीत ही स्पर्धा होणार असून राज्यातील मल्ल स्पर्धेत सहभागी होतील. या स्पर्धेतून देशभरातील मल्लांना प्रेरणा मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अहिल्यानगर जिल्ह्याला कुस्तीची गौरवशाली परंपरा आहे, हे वैभव आणखी वाढविण्यासाठी ही स्पर्धा उपयुक्त ठरणार असल्याचे ते म्हणाले.

श्री.तडस म्हणाले, महाराष्ट्रातील कुस्तीगीरांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर चांगले यश संपादन केले आहे. महाराष्ट्र कुस्तीगीर संघातर्फे कुस्तीगीरांना चांगल्या सुविधा दिल्या जात आहेत. त्यांनी ऑलिंपिक, आशियाई आणि राष्ट्रकुल स्पर्धेत चांगले यश मिळावे यासाठी प्रयत्न होत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कुस्तीगीरांना राजाश्रय देण्याचे, त्यांना शासकीय नोकरीत सामावून घेण्याचे कार्य केले. कुस्तीच्या विकासासाठी तालुका पातळीवर मॅटची सुविधा उपलब्ध होणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

संतोष भुजबळ यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाला महाराष्ट्र केसरी, उप महाराष्ट्र केसरी, कुस्तीप्रेमी नागरिक उपस्थित होते.

# खो–खो प्रेमीसाठी २०२५ हे खो–खो वर्ष


### भाग–१

खो–खो या खेळाचा उगम महाराष्ट्राच्या या मातीतच खऱ्या अर्थाने झाला. ज्येष्ठ सांख्यिकीतज्ञ रमेश वरळीकर यांच्या खो–खो या पुस्तकात मांडलेला खालील तर्क पटण्यालायक आहे. आपला देश हा शेतीप्रधान भारतीय संस्कृतीचा अविष्कार आहे. पिकांनी भरलेली शेती जनावरांनी खराब करु नये म्हणून जे विविध उपाय योजले जात असत. त्यापैकी त्यांच्या मार्गात अडथळे निर्माण करुन त्यांना पळवून लावणे हा प्रमुख उपाय असे. त्यासाठी शेतात काही ठराविक अंतरावर लहान मुले एकमेकांच्या विरुद्ध दिशेला तोंड करुन बसवून त्यांना कुत्र्याच्या भुंकण्याचा आवाज (भो भो) करायला सांगितले जात असावे. असे या शेत (क्षेत्र) रक्षणवृत्तीतून लहान मुलांचा खो–खो खेळ–पळती / पाठलागाचा सुरु झाला असावा.

वरळीकर यांच्या माध्यमातून १९६० ते १९६५ या काळामध्येच महाराष्ट्राने खो–खो जगाला सांख्यिकिचे महत्त्व पटवून दिले. खो–खो खेळाची आणि खेळाडूंच्या नैपुण्याची सांख्यिक नोंद ठेवण्याचे काम महाराष्ट्र खो–खो असोसिएशनने प्रत्यक्षात १९६८ पासून सुरु केले. भारतीय खो–खो क्षेत्रात महाराष्ट्र खो खो असोसिएशन हीच एकमेव राज्य संघटना आहे कि जिने खो–खो मध्ये सांख्यिकीची उपयुक्तता आणि महत्त्व जाणून प्रत्यक्षात आणले. महाराष्ट्र खो–खो असोसिएशनचे माजी अध्यक्ष शरदचंद्रजी पवार यांच्या सर्वांगीण प्रयत्नामुळे खो–खो हा खेळ आशियाई पातळीवर पोहोचला.

त्यानंतर खो–खोचे आश्रयदाते व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, भारतीय खो खो महासंघाचे अध्यक्ष सुधांशू मित्तल, सरचिटणीस एम. एस. त्यागी, सहसचिव प्रा. डॉ. चंद्रजित जाधव यांच्या प्रयत्नामुळे तो जागतिक स्तरावर पोहोचत आहे. त्याचा थरार सोमवारपासून नवी दिल्ली येथे इंदिरा गांधी स्टेडियमवर पाहायला मिळत आहे.

मुंबईचे शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते खेळाडू पांडुरंग परब आपल्या आठवणी सांगताना म्हणतात, शाळेत असताना दोन खांबांच्या मध्ये; खांब नसतील तर दोघांना खांब म्हणून उभा करून प्रत्येकाने खेळलेला खेळ म्हणजे खो–खो. २०२५ या नवीन वर्षातील पहिल्याच महिन्यात जानेवारी १३ पासून खो–खो चा पहिला विश्वचषक आपल्या





भारतात होतोय, म्हणून प्रत्येक खो–खो प्रेमीसाठी हे खो–खो वर्ष !

अस्सल लाल मातीतला हा खेळ तहान भूक हरपून मनसोक्त खेळला आहे. हा खेळ अनेकांसाठी खूप आठवणी देणारा, खिलाडुवृत्ती अंगी जोपासायला शिकवणारा. यातील अनेक नियम आयुष्यातील तत्वांशी बांधील आहेत. पळताना कितीही दम लागला तरी आऊट झाल्याशिवाय थांबायच नाही, ही या खेळातील मुख्य गोष्ट धकाधकीच्या आयष्यात तंतोतंत लागू पडते. फाऊल झाला तर बॅक खो देऊन आपली चूक सुधारायची. जीवनात पण चूक झाली तर त्याचे प्रायश्चित्त भोगून पुन्हा ध्येयावर लक्ष केंद्रित करायला हा खेळ शिकवतो.

यात स्वतःला वाचवायचे असेल तर सरळ पळून उपयोग नाही. नागमोडी वळणे घेत, अनेक धोक्यांपासून स्वतःला वाचवून आपले अस्तित्व जिवंत ठेवायला खो–खो सांगतो. जेंव्हा तुमची आक्रमण करण्याची वेळ येते, तेंव्हा तुम्ही नऊ खेळाडू एकत्र येऊन शिकारीच्या मागे लागता. नऊ जणांचे अंतिम ध्येय एकच की शिकार लवकर पकडायची. त्यासाठी एकमेकांची साथ द्यायची. जे उद्दिष्ट एकट्याला साध्य करता येत नाही त्याठिकाणी आपल्या साथीदारांना सोबत घेऊन आयुष्याच्या कठीण प्रसंगात साथ देण्याची वृत्ती इथेच अंगी बाणली जाते. आजही आठवून पहा खो–खो संघातील तुमचे साथीदार फक्त तुमचे साथीदार राहत नाहीत तर ते आयुष्यभरासाठी तुमचे खास होतात.

सामना हरला कोण आणि जिंकला कोण हे निकाल ठरवतो; पण तुम्ही खेळला कसे याची प्रचिती सामना झाल्यावरच येते. जेंव्हा तुम्हाला कोणीतरी येऊन म्हणतो, की 'काय खेळालाय तू आज'. खेळ म्हणलं की हार जीत आलीच पण मैदान गाजवता आलं पाहिजे हा पहिला सिद्धांत खो–खोने दिला. खांबावर गडी टिपण्याचे कौशल्य म्हणजे आयुष्यात मोक्याच्या क्षणी हुशारीने निर्णय घेऊन कमी वेळात यशाचे शिखर गाठल्यासारखे ! पण ते गाठताना त्यामागे सराव करताना शंभर वेळा त्या खांबावर पडताना हाताची तलवार आणि छातीची ढाल केलेली असते. हवेत झेपावत गडी बाद करणे हे या खेळाचे आकर्षण. जणू आयष्यात काहीच अशक्य नाही हेच धाडस या डाईव्हने दिलेले असते. त्यातून हाता–पायावर झालेल्या जखमा अभिमानाने मिरवताना झालेला आनंद कोणत्याही पुरस्कारापेक्षा कमी नसतो. शेवटी या मैदानावर ज्यांनी आपल्याला खेळायला शिकवले त्यांचे आयुष्यात महत्व अनन्यसाधारण आहे. ते पुढे दिसताच आपले हात कधी त्यांच्या चरणस्पर्शाकडे जातात हे कळतच नाही हे नातं आहे गुरू शिष्याचं ! खो–खो फक्त एक खेळ नसून ती एक भावना आहे. ती अनेकांनी जपली, वाढवली आहे. त्याचे मूर्त स्वरूप म्हणजे आता होणारा खो–खो विश्वचषक. आपला खेळ जागतिक पातळीवर खेळला जाणार यापेक्षा अभिमानाची गोष्ट काय असू शकते. माजी खेळाडूंना देखील खो–खो खेळाच्या भावना, आठवणी मनात दाटून आल्या असतील. व्यक्त व्हा कारण आपला खेळ आपला स्वाभिमान!

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मतदार संघातील विकासाकरता निधी कमी पडू देणार नाही : आ अब्दुल सत्तार





सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.१३, मतदारसंघातील नागरिकांना आरोग्याच्या जास्तीत जास्त सुविधा निर्माण करण्यासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही असे स्पष्ट करीत अंभई येथे डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानासाठी ५ कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर करा यासाठी शासनाकडून मंजुरी व निधी मिळवून देवू अशी ग्वाही माजीमंत्री आ. अब्दुल सत्तार यांनी अंभई ता. सिल्लोड येथे बोलताना दिली.


अंभई ता. सिल्लोड येथे ६ कोटी २५ लाख रुपयांच्या प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच ५० लाख रुपयांच्या ग्राम सचिवालय यासह एकूण १० कोटी ७ लाख रुपयांच्या विकास कामांचे भूमिपूजन आ. अब्दुल सत्तार यांच्याहस्ते संपन्न झाले. या विकास कामांच्या भूमिपूजन निमित्त आयोजित कार्यक्रमात आ. अब्दुल सत्तार बोलत होते.

पुढे बोलत असतांना आ. अब्दुल सत्तार म्हणाले की, अंभई येथील प्राथमिक आरोग्य केंद्र अनेक दिवसांपासून मंजूर होते. मात्र जागेच्या अडचणीमुळे याचे काम सुरू झाले नाही. जागेचा तिढा आपण गेल्या काळात सोडविला त्यामुळे आज बहुप्रतिक्षित प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कामाला सुरुवात झाली आहे. येत्या काही दिवसांत नागरिकांच्या सेवेत ही सुसज्ज ईमारत उभी असेल यामुळे परिसरातील १९ गावांना चांगल्या दर्जाच्या आरोग्याच्या सुविधा मिळतील असे आ. अब्दुल सत्तार म्हणाले. मतदारसंघात आरोग्य सुविधांचे बळकटीकरण करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने मतदारसंघात फर्दापूर सह इतर ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र उभारण्यात येणार असल्याचे आ. अब्दुल सत्तार म्हणाले. विकास कामांचे उद्घाटन झाले ती कामे तातडीने सुरू करण्यात यावी यासह काम गुणवत्तापूर्ण व निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश आ. अब्दुल सत्तार यांनी संबंधित यंत्रणेला दिले.

याप्रसंगी अंभई येथे उभारण्यात येणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरात जवळपास ४०० वृक्षांची लागवड करण्यात आली. या वृक्षारोपण कार्यक्रमाचा शुभारंभ देखील आ. अब्दुल सत्तार यांच्याहस्ते करण्यात आला. नैसर्गिक ऑक्सिजन निर्मिती ला चालना देणाऱ्या वृक्षाची लागवड येथे करण्यात यावी, तसेच वृक्षांची देखभाल काळजीपूर्वक व्हायला हवी, जसजसे इमारतीचे काम होईल तशी झाडांची देखील उंची वाढली पाहिजे असे नियोजन करा असे आ. अब्दुल सत्तार म्हणाले.

याप्रसंगी मुर्डेश्वर संस्थांचे पिठाधीश महंत ओंकार गिरी महाराज ,जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा.गाढे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक शिरसे , कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती केशवराव पा. तायडे, उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर अभय धानोरकर, तहसीलदार संजय भोसले ( सिल्लोड ) ,तहसीलदार मनीषा मेने ( सोयगाव ), गटविकास अधिकारी रत्नाकर पगार ( सिल्लोड ), गटविकास अधिकारी दादाराव अहिरे ( सोयगाव ), मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेचे कार्यकारी अभियंता पंढरीनाथ खडेकर, उपविभागीय अभियंता उमेश लिंबारे, शाखा अभियंता मंगेश दापके, उपविभागीय कृषी अधिकारी सुभाष आघाव ,तालुका कृषी अधिकारी ज्ञानेश्वर बरदे , माजी सभापती रामदास पा. पालोदकर , शिवसेना उपजिल्हाप्रमुख देविदास पा. लोखंडे ,कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक दामू अण्णा गव्हाणे , नंदकिशोर सहारे, राजाराम पाडळे, जयराम चिंचपुरे, नानासाहेब रहाटे, पप्पू राऊत, सरपंच रामदास पा. दुतोंडे, उपसरपंच रईस देशमुख, डॉ. संजय जामकर, नॅशनल सहकारी सूतगिरणीचे संचालक राजेंद्र ठोंबरे, सयाजी वाघ, शिवसेना महिला आघाडीच्या दुर्गाबाई पवार ,मनोज झंवर, संजय डमाळे , राजू मिया देशमुख , अब्दुल करीम , पंकज जैस्वाल, राजू बाबा काळे , कौतिकराव मोरे , राहुल सपकाळ , बद्रीनाथ कोठाळे, प्यारेलाल जयस्वाल, शेख रब्बानी, गणेश सयाजी वाघ, गजानन दराडे ,सोनसिंग चव्हाण ,सय्यद जब्बार ,फकीरा शेठ पठाण ,कालूशेठ पठाण ,नरसिंग वाघ, रामू सुरडकर ,रुद्रप्पा नगरे, त्रिपुरे आप्पा नगरे, दत्तू पंडित, रितेश जयस्वाल, गंगाधर दांडगे, फय्याज देशमुख आदिंसह पंचक्रोशीत नागरिक, ग्रामस्थ उपस्थित होते.

## संघ हीच जीवनगाथा



### अलक (१२) नामकरण

**इ.स.१९२५ला विजयादशमीला संघाचा जन्म झाला व पुढे १७ एप्रिल १९२६ ला सर्वानुमते राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हे नामकरण झाले. कारण त्यावेळी हिंदुस्थान हे त्यात राहणाऱ्या सर्व लोकांचे राष्ट्र असा अपसमज सर्व लोकांमध्ये रूढ होता. हा अपसमज राष्ट्रीय शब्दयोजून खोडून काढला व राष्ट्र म्हणजे परस्पर विरोधी परंपरा, संस्कृती व भावभावना असलेल्या लोकांची मारून मुटकून बांधलेली आवळ्याची मोट नसते; तर धर्म- संस्कृती-देश- भाषा व इतिहास या साधर्म्यातून आपण सर्व एक आहोत; सारखे आहोत हे राष्ट्रीय या संकल्पनेतून सिद्ध होते. व राष्ट्रसेवा करण्यासाठी स्वत:हून अग्रेसर होतो; तो स्वयंसेवक. व या हिंदू राष्ट्राभिमानी स्वयंसेवकांचे (७) एकत्रीक रण करणारी संघटना म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ 'भारत माता की जय' (क्रमशः)**

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १३ जानेवारी : पैठण तालुक्यातील बिडकीन येथील ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल व ब्लु माउंटन प्री स्कुल मध्ये स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्सहात साजरा करण्यात आली शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतिश तोतला सर यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पुजन व पुष्पहार घालुन कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली शाळेतील मुली राजमाता जिजाऊ यांच्या पोशाखात आल्या होत्या, तर काही विद्यार्थ्यांनी भाषणे सादर केली. शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतिश तोतला सर यांनी आपल्या भाषणाद्वारे जिजाऊंच्या स्वराज्य निर्मितीतील योगदान, विवेकानंदांच्या विचारधारेचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावुन सांगितले. हा कार्यक्रम यशस्वी रित्या पार पडण्यासाठी शाळेतील शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी यांनी मेहनत घेतली.

## जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्या निमित्त ज्योतिराम पाटील युवा मंचने काढली शहरातून वाहन रॅली

कन्नड दि.१२ - जिजाऊ जन्मोत्सव सोहळा शहरात उत्साहात संपन्न झाली,ज्योतिराम पाटील युवा मंचने शहरातून वाहनांची रॅली काढली होती

दि.१२ रोजी सकाळी ०९ वाजता श्रीछत्रपती महाविद्यालयाच्या प्रागणांत जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त ज्योतिराम पाटील युवा मंचने विद्यार्थ्यांचे व्याख्याना सह वाहनांच्या रॅलीचे आयोजन केले होते,या सोहळ्यासाठी छत्रपती संभाजीनगर सह मराठवाड्यातुन मोठ्या संख्येने युवक आले होते, सकाळी १० वाजता रिलायबल इंग्लिश स्कुलच्या विद्यार्थ्यांनी भाषणे, नृत्य सादरीकरण केले होते,शिवशाहीर गणेश गलांडे यांच्या शाहिरीची ध्वनिफितीचे अनावर करण्यात आले यावेळी व्यासपीठावर शिवराज भुमरे, निलेश पाटील,पोलिस निरीक्षक कुंदन जाधव, पोलिस उपनिरीक्षक भालेराव, ज्योतिराम पाटील,प्रशांत वाघ व्यासपीठावर उपस्थित होते, शहरातील क्रांती चौकात पाण्याच्या प्लास्टिकच्या बॉटल पासून जिजाऊंची प्रतिमा साकारण्यात आली होती या कलाकृतीला बघण्यासाठी मोठी गर्दी जमा झाली होती,सदर वाहन रॅलीची सांगता क्रांती चौकात झाली सोहळ्याचे सूत्रसंचालन सहयोग जावळे यांनी केले तर आभार ज्योतिराम पाटील यांनी मानले.

## बिडकीन येथे राजमाता जिजाऊ जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरी



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १३ : पैठण तालुक्यातील बिडकीन येथे जिजाऊ जन्मोत्सव समिती, बजरंग दल बिडकीन, मनोज मुरदारे जिल्हाध्यक्ष यांच्या वतीने राजमाता जिजाऊ जयंती निमित्त सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांना पुष्पहार घालून. मुलींनी राजमाता जिजाऊंची वेशभूषा परिधान करून रथयात्रा मिरवणूक काढण्यात आली तसेच मर्दानी खेळ व व्याख्यान असे विविध कार्यक्रम घेऊन जिजाऊ वंदन व जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी व्याख्यान करत्या स्वातीताई नखाते यांनी मोलाचे असे मार्गदर्शन केले तसेच मस्ताजोक चे सरपंच संतोष देशमुख व परभणीचे सोमनाथ सूर्यवंशी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. यामध्ये महिला व गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली यावेळी सरपंच अशोक धर्मे, जि प सदस्य विजुभाऊ चव्हाण, मधुकर सोकटकर, ज्ञानेश्वर कांबळे,अंकुश धर्मे ,रमेश शिंदे ,किरण गुजर ,अमोल कोथिंबिरे ,सागर फरताळे, राहुल ठाणगे,भगवान हिवाळे ,अशोक टेके ,अविनाश राठोड ,अमोल वंजारे ,वामन साठे ,कल्याण शिंदे ,अंबादास गुंजाळ, संतोष कुसेकर विजय शेळके धनंजय चिरेकर ,सचिन जोशी , बजरंग दल चिमण जाधव ,आदित्य घुले ,गणेश कोथिंबीरे, सारीका पेरे .ज्योती मुरदारे .अंजली गोर्डे . जयश्री नरवडे .शोभा नितनवरे . शितल शेळके . साधना निपाने . दिक्षा साबळे . शितल कुमावत . अनिता जाधव आदी पदाधिकारी शिवभक्तांची उपस्थिती होती

## दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल मध्ये राष्ट्र माता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १३ जानेवारी पैठण तालुक्यातील दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल निलजगाव इथे राष्ट्र माता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष ओमप्रकाश जैस्वाल , सचिव रोशन जैस्वाल , राजेंद्र जैस्वाल,मुक्खाद्यापक . मयूर बाबू स्वामी यांची उपस्थिती होती. वर्ग २ रि च्या विद्यार्थांच्या हस्ते महापुरुषांच्या फोटोला पुष्प हार घालून पुजन करण्यात आले. शाळेतील विद्यार्थांनी या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले. शिक्षी प्रतीक्षा बात्तले यांनी महापुरुषांच्या जीवनावर प्रकाश टाकला. कार्यक्रमांचे सूत्र संचालन शिक्षीका आरती कावरे यांनी केले. कार्यक्रमाचया यशवीतेसाठी शिक्षीक, कु. अनुराधा ठाकूर इतर सर्वांनी यांनी परिश्रम घेतले.

## महावीर इंटरनॅशनल अपेक्स च्या हैद्राबाद मध्ये गौरव



छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी - महावीर इंटरनॅशनल अपेक्स ३० व आंतरराष्ट्रीय अधिवेशन व स्वर्ण जयंती महोत्सव हैद्राबाद येथे संपन्न झाला. यामध्ये छत्रपती संभाजीनगर केंद्रातुन महावीर इंटरनॅशनल च्या १४ सदस्यांचा सहभाग त्या अधिवेशनात होता. संपुर्ण भारतातुन २५० केंद्रांनी आपला सहभाग नोदविला होता. या अधिवेशनात हजाराच्या वर सदस्यांची उपस्थिती होती. संपुर्ण भारतातुन आलेल्या केंद्रांनी बॅनर प्रतियोगीतेमध्ये आपला सहभाग नोदविला. या प्रतियोगेतेमध्ये आपल्या केंद्राने केलेल्या सर्वोत्तम प्रकल्प दर्शविला होता. छत्रपती संभाजीनगर केंद्राने सर्वात उत्तम प्रकल्प म्हणुन गरीब वस्तीतल्या शाळेला दोन वर्षा करिता दत्तक घेत प्रदर्शनातुन एक थिम व्दारे प्रदर्शन केले. सर्व सदस्यांनी पिवळा पोशाख परिधान करैन बॅनरचे प्रदर्शन केले. यामध्ये छत्रपती संभाजीनगर केंद्राला तिसरे पारितोषीक मिळाले. यावेळी केंद्राचे अध्यक्ष पारस तातेड, अमृत खाबीया, प्रकल्प प्रमुख हेमलता मुगदिया, प्रकाश मुगदिया, पुखराज पगारीया, कुकुंम पगारीया, सौ.अल्का , सौ.शोभा , शशी व पारस छाजेड, छाया नवल,सिंघी,विमलराणी बाफना, कैलास बाफना आदींचा यावेळी सहभाग होता.

## माहिती कार्यालयाचे कर्मचारी सुनील चौधरी यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर, दि.१३, (विमाका) :- संचालक (माहिती), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, छत्रपती संभाजीनगर कार्यालयातील कर्मचारी सुनील विश्वनाथ चौधरी यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, पत्नी व मुली आहेत. चौधरी यांनी माहिती कार्यालयात १६ वर्षे सेवा केली आहे. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

## व्यापारी महासंघाच्या शहराध्यक्ष पदासाठी स्वदेश पांडे यांना पसंती



तभा वृत्तसेवा

पैठण दि १३:- पैठण शहर व्यापारी महासंघाच्या अध्यक्ष पदासाठी आता प्रमुख चार व्यापारी प्रबळ दावेदार असून यात स्वदेश पांडे यांचे पारडे जड दिसत आहे.

पैठण तालुका व शहर व्यापारी महासंघाची कार्यकारिणी बदल करण्याच्या हालचालींना वेग आला असून शहराध्यक्ष पदासाठी चिंतामणी सीड्स चे संचालक स्वदेश पांडे यांना बहुतेक व्यापारी वर्गाचा पाठिंबा दिसून येत आहे. गेल्या अनेक महिन्यापासून व्यापारी महासंघाची मुदत संपली असून नवीन कार्यकारिणी तयार करण्यासाठी पैठण व शहरात अनेक इच्छुक दिसून येत आहेत.

विशेषता पैठण शहर व्यापारी अध्यक्षपदासाठी सर्वात मोठी चुरस असून ही निवड प्रक्रिया बिनविरोध व्हावी अशी अपेक्षा शहर व्यापारी वर्गातून व्यक्त करण्यात येत आहे. सध्या तरी व्यापारी महासंघ शहराध्यक्षपदासाठी चिंतामणी सीड्स चे संचालक मालक स्वदेश पांडे यांच्यासाठी बहुतेक व्यापाऱ्यांनी होकार दिला असून कुठे आठवड्यात होणाऱ्या व्यापारी महासंघाच्या बैठकीत स्वदेश पांडे यांच्या नावावर शिक्कामोर्तब होणार असल्याची चर्चा पैठण शहरात सुरू आहे.यात अध्यक्ष पदासाठी प्रबळ चार दावेदार असून या चौघांनी एकत्र बसून तोडगा काढत महासंघाची निवड बिनविरोध करावी अशी प्रतिक्रिया मावळते तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील उगले यांनी दिली आहे.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, (क. स्तर) न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद.**

सिव्हील एम ए.क. ५३२/२०२४ प्रकरणात पुढील तारीख दि.०४/०२/२०२५

अर्जदार : १) दामोधर आबाराव पाटेकर, वय ७९ वर्ष, धंदा शेती, रा. तुर्काबाद खराडी ता. गंगापुर जि. औरंगाबाद २) शिवाजी आबाराव पाटेकर, वय ५९ वर्ष, धंदा शेती, रा. तुर्काबाद खराडी ता. गंगापुर जि. औरंगाबाद. ३) विश्वनाथ आबाराव पाटेकर, वय ५० वर्ष, धंदा शेती, रा. तुर्काबाद खराडी ता. गंगापुर जि. औरंगाबाद. ४) गयाबाई भ्र. चत्रु हिवाळे, वय ६६ वर्ष, धंदा घरकाम, रा. कासोडा ता. गंगापुर जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे बाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी या न्यायालयात ॲड. एस. एन. साबणे, गंगापुर यांच्यामार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे कामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हे दार हे वर नमुद ठिकाणचे राहणारे असुन अर्जदार क १ ते ४ हे आपसात सख्ये भाउ व बहिन आहेत. अर्जदार क १ ते ४ यांचे वडील नामे आबाराव नामदेव पाटेकर हे दि. २७/०१/१९८३ रोजी मौजे तुर्काबाद खराडी ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले असुन मयताची पत्नी म्हणजेच अर्जदार क १ ते ४ यांची आई नामे गिरजाबाई भ्र. आबाराव पाटेकर हि दि. ११/१०/२०१८ रोजी मौजे तुर्काबाद खराडी ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झालेली आहे. तसेच मयत आबाराव नामदेव पाटेकर व मयत गिरजाबाई भ्र. आबाराव पाटेकर यांचा मुलगा व अर्जदार क १ ते ४ यांचा भाउ नामे गोपीनाथ आबाराव पाटेकर हा दि. १२/०८/२०२४ रोजी मौजे तुर्काबाद खराडी ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे अविवाहीत मयत झालेला आहे. म्हणजेच मयत गोपीनाथ आबाराव पाटेकर याचे विवाह झालेले नसुन त्यास पत्नी किंवा आपल्य नाही. तिन्ही मयतांना अर्जदार क १ ते ४ हेच कायदेशीर वारसदार आहेत. मयत आबाराव नामदेव पाटेकर व मयत गिरजाबाई भ्र. आबाराव पाटेकर आणि मयत गोपीनाथ आबाराव पाटेकर यांना अर्जदार क १ ते ४ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे. अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयतांना इतर कोणीही वारसदार नाही. मयत आबाराव नामदेव पाटेकर व मयत गिरजाबाई भ्र. आबाराव पाटेकर आणि मयत गोपीनाथ आबाराव पाटेकर यांच्या अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी मृत्यु मुळे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला असुन वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही. करीता जाहीर प्रगटन.

आज दि. १३/१/२०२५ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

आदेशावरून

लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती ए.आय.आवटी मॅडम, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक: २०/२०२५

पुढील तारीख: २०/०२/२०२५

अर्जदार : १- किर्ती भ्र. बापूसाहेब मोहिते, वय ३२ वर्षे, धंदा घरकाम, रा. टापरगांव ता. कन्नड, जि. औरंगाबाद २- अथर्व पिता बापूसाहेब मोहिते, वय १४वर्षे, धंदा शिक्षण, अज्ञान पालनकर्ती जन्मदाती आई अर्जदार क्रमांक १ रा. टापरगांव ता. कन्नड, जि. औरंगाबाद ३- जान्हवी पिता बापूसाहेब मोहिते, वय ११ वर्षे, धंदा शिक्षण, अज्ञान पालनकर्ती जन्मदाती आई अर्जदार क्रमांक १ रा. टापरगांव ता. कन्नड, जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी छ. संभाजीनगर

प्रकरण : कायदेशीर वारसा हक्क प्रमाण पत्र मिळणे बाबत. Legal heirship Certificate

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. व्ही. के. मोहिते यांच्या मार्फत या न्यायालयात अर्जदार हे वरील ठिकाणचे राहणारे असून अर्जदार यांनी सदरील अर्ज वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून विदयमान न्यायालयात दाखल केले आहे. अर्जदार क्रमांक १ ची सासु व अर्जदार क्रमांक २ व ३ यांची आजी नामे सिंध्दुबाई गोविंद मोहिते या दिनांक ६.४.२०१२ रोजी मौजे टापरगांव ता. कन्नड येथे राहत्या घरी मयत झालेल्या आहेत, तसेच अर्जदार क्रमांक १ चे सासरे व अर्जदार क्रमांक २ व ३ यांची आजोबा नामे गोविंद भिमराव मोहिते हे दिनांक २१.९.२०२४ रोजी मौजे टापरगांव ता. कन्नड येथे राहत्या घरी मयत झालेले आहेत, त्याच प्रमाणे अर्जदार क्रमांक १ चे पती व अर्जदार क्रमांक २ व ३ यांचे वडील नामे बापुसाहेब गोविंद मोहिते हे दिनांक १८.८.२०२४ रोजी मौजे टापरगांव ता. कन्नड येथे राहत्या घरी मयत झालेले आहेत. सोबत मयतांचे ग्राम पंचायत कार्यालय टापरगांव, ता. कन्नड यांचे कडील मृत्यु प्रमाण पत्र दाखल केले आहे. अधिक स्पष्टीकरणासाठी या न्यायालयाच्या अवलोकनासाठी अर्जदारांनी वंशावळ दिली आहे. सदरील प्रकरणात अर्जदार क्रमांक २ व ३ हे अज्ञान असून त्यांचे अज्ञानाचे विरोधात अर्जदार १ चे कोणतेही हित संबंध नाहीत, केवळ अर्जदार क्रमांक २ व ३ अज्ञान यांच्या हिता करीता व भविष्यातील व्यवस्थापना करीता सदरील प्रकरण दाखल करण्यात येत आहे. अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदारां शिवाय मयतांना कोणीही ईतर वारस नाही. तसेच अर्जदार यांना सदरील वारसाचे प्रमाण पत्र हे शासकीय व निमशासकीय योजनेसाठी तसेच महसुल दप्तरी नोंद करण्यासाठी आवश्यक असल्याने वारस प्रमाण पत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार हे मागणी करीत आहे. सबब अर्जास कारण २५ डिसेंबर, २०२४ रोजी घडले आहे. अर्जदार यांनी सोबत स्वतःचे आधार कार्ड तसेच ग्राम पंचायत कार्यालय टापरगांव ता. कन्नड यांचे कडील मृत्यु प्रमाण पत्र, व वारसाचे प्रमाण पत्र दाखल केले आहे. अर्जदार हे मे. न्यायालयाचे कक्षेत राहत असल्याने सदरील अर्ज चालविण्याचा व वारसाचे प्रमाण पत्र देण्याचा अधिकार मे. न्यायालयास आहे. वरील प्रमाणे या न्यायालयात अर्जदार यांनी मागणी केली आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल. सबब आज दिनांक १३.०१.२०२५ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांक : १३.०१.२०२५

आदेशावरून

लिपिक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/ जन्म-मृत्यु नोंद/सिआर-६५०

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड

दिनांक ३०/०९/२०२४

अर्जदार : विनोद शेषराव जाधव रा.नावडी ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय नावडी ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या आईच्या मृत्यू प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या आईचा मृत्यू दिनांक १२-०४-२००२ रोजी नावडी ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या आईचा मृत्यू दिनांक १२-०४-२००२ रोजी नावडी ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे आई

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या आईचा मृत्यू दिनांक १२-०४-२००२ रोजी नावडी येथे मृत्यू झाल्याचे मृत्यू प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक २७-११-२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक १२-०४-२००२ रोजी नावडी येथे मृत्यू झाल्याचे मृत्यू प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक ३०/०९/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए. क्र. ४१ /२०२५

ND. 01/3/25

अर्जदार : १) शकुंतला राधाकिसन मगर, वय ७६ वर्षे, धंदा घरकाम रा. जामगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) अशोक राधाकिसन मगर, वय ४८ वर्षे, धंदा शेती रा. जामगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) रामेश्वर राधाकिसन मगर, वय ४१ वर्षे, धंदा शेती रा. जामगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) सोमेश्वर राधाकिसन मगर, वय ३७ वर्षे, धंदा शेती रा. जामगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एम. डी. तांबे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.२ ते ४ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ असुन अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ते ४ यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील नामे राधाकिसन धनाजी मगर हे मौजे जामगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवाशी होते ते दिनांक ०७/०९/२०२३ रोजी मौजे जामगाव ता. गंगापुर येथे मयत झालेले आहे. मयत राधाकिसन धनाजी मगर यांना अर्जदार क्र.१ ही पत्नी, अर्जदार क्र.२ ते ४ हे मुले असे कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरीक्त अन्य कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे सांगुन शासकीय-निमशासकीय व इतर कार्यालयीन कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे सुचित करण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील.

करीता हे प्रगटन माझे सही व शिक्कयानी आज दिनांक १३/१/२०२५ दिले.

कनिष्ठ लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

जा.क्र.२०२४/विधी/ज.मृ. आदेश/ प्र.क्र.४५८९/कावि-५१९८ उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, सिल्लोड दिनांक : २६.१२.२०२४.

## जाहीर प्रगटन

अर्जदार : संगीता सिताराम सोलींकी, वय-३४ वर्ष व्यवसाय- मजुरी, रा. काळेनगर, सोयगांव ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार : मुख्याधिकारी नगरपंचायत कार्यालय सोयगांव. ता. सोयगांव जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय : जन्म - मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी संगीता सिताराम सोलींकी, रा. काळेनगर सोयगाव ता.सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांचा दिनांक १८.०५.१९९० रोजी मौजे सोयगाव येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा-२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की संगीता सिताराम सोलींकी, यांचा दिनांक १८.०५.१९९० रोजी मौजे सोयगाव येथे जन्म झाला असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर / आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर /आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप/हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दडाधिकारी, सिल्लोड कारता

## अग्रलेख...

# लॉस एंजेलिसच्या अग्निकांडाचा धडा

मनोरंजनाची जागतिक राजधानी मानले जाणारे हॉलिवूड ज्या ठिकाणी आहे, अशा लॉस एंजेलिसमधील अलिकडच्या अग्निकांडाने नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण करण्याच्या मानवी मर्यादांचे पितळ पुनः एकवार उघडे पाडले आहे. लॉस एंजेलिस अमेरिकेत आहे आणि ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञानात अमेरिका हा मानदंड व मापदंड आहे, असा साऱ्या दुनियेचा समज आहे. त्यामुळेच एवढी मोठी आग आणि तीदेखील अमेरिकेत लागते, याचे सर्वांना आश्चर्य वाटते आहे. लॉस एंजेलिसला लागून असलेल्या वनक्षेत्राशेजारील संपूर्ण परिसर जळून राख झालेला आहे. हजारो कुटुंबे विस्थापित झाली आहेत, त्यांची उपजीविका विस्कळीत झाली आहे आणि हॉलिवूड चित्रपट उद्योगाला जणू ब्रेक लागला आहे. जॉन गुडमन, ब्रिटनी स्पियर्स, पॅरिस हिल्टन, बिली क्रिस्टल, रिकी लेक, हायडी माँटॅग, सर अँथनी हॉपकिन्स, टॉम हँक्स, बेन अफ्लेक, मँडी मूर, स्टिवन स्पिलबर्ग अशा अनेक सेलिब्रिटींना या अग्निकांडाचा फटका बसला. कुणाचे घर जळाले तर कुणाचे घर वाचूनही त्याला विस्थापित व्हावे लागले.

लॉस एंजेलिसचा प्रदेश भूमध्य सागरीय हवामानाचा आहे. तो तसा वणव्यांबाबत अपरिचित नाही; किंबहुना कुपरिचित आहे. कोरडे वातावरण, जोराने वाहणारे वारे आणि विशिष्ट प्रकारच्या वनस्पतींच्या विस्तृत पट्ट्यांमुळे या प्रदेशात आगी लागण्यासाठी आणि वेगाने पसरण्यासाठी अनुकूल परिस्थिती असते. कॅलिफोर्नियामधील वणवे ही तशी हंगामी घटना आहे. परंतु, अलिकडच्या दशकांमध्ये वणव्यांची वारंवारता आणि तीव्रतेत चिंताजनक वाढ झाली आहे. वाढते जागतिक तापमान, दीर्घकाळ दुष्काळ आणि सहज आग लागू शकेल अशा भागांत मानवाने केलेले अतिक्रमण ही त्याची कारणे. विस्तीर्ण उपनगरे आणि जंगली क्षेत्रांच्या जवळ असल्याने लॉस एंजेलिस हा भाग तसा असुरक्षितच मानला जातो. 'व्हर्डुगो ब्लेझ' अशा नावाची ही आग जानेवारीच्या सुरुवातीला कोरड्या संध्याकाळी लागली. प्राथमिक तपासात असे दिसून आले आहे की, दाट वनस्पती असलेल्या भागात दोषपूर्ण विद्युत तारांमुळे ही आग लागली असावी. सांता आना वाऱ्यांमुळे आग वेगाने पसरली आणि पहिल्या ४८ तासांत ५० हजार एकरपेक्षा जास्त भागात अग्निकांड घडले. सारे काही जळून खाक झाले. लॉस एंजेलिसच्या बाहेरील भागातील लोकांना स्थलांतर करण्याचा आदेश देण्यात आला. आपत्कालीन सेवांना मोठ्या आव्हानांचा सामना करावा लागला. अनेक आघाड्यांवर संसाधनांचा अभाव होता. हेलिकॉप्टर आणि पाणी टाकणारी विमाने वरून आग विझवण्यासाठी प्रयत्न करीत होती, तर अग्निशमन दलाच्या जवानांनी जमिनीवर अथक परिश्रम करून नियंत्रण रेषा तयार केल्या होत्या. ते आगीवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न करीत होते. तरीही आगीचे थैमान घडलेच. मनोरंजन उद्योगाचे केंद्र असलेले हॉलिवूडही यातून सुटले नाही. आगीच्या धुराने हा संपूर्ण टापू व्यापल्यामुळे अनेक स्टुडिओजमध्ये कामकाज थांबवावे लागले. एव्हाना ही आग ८० टक्के आटोक्यात आलेली आहे, असे म्हणतात. या आगीत आतापर्यंत पाच हजारांवर घरे व इमारती नष्ट झाल्या आहेत. एक लाखावर रहिवासी विस्थापित झाले आहेत. त्यांना तात्पुरता निवारा आणि रेड क्रॉससारख्या संस्थांकडून मिळालेल्या मदतीवर अवलंबून राहावे लागत आहे. अग्निकांडात झालेल्या आर्थिक नुकसानीचा अंदाज तीन अब्ज डॉलर्सहून अधिकचा आहे. यात झालेले पर्यावरणाचे नुकसान तितकेच विनाशकारी आहे. जंगलांचा मोठा भाग जळून खाक झाला आहे आणि त्यामुळे जैवविविधता धोक्यात आली आहे. कार्बन उत्सर्जन प्रचंड वाढले आहे. या प्रदेशाचे पर्यावरण पूर्वस्थितीला येण्यासाठी किमान एक दशक लागू शकेल, असे तज्ज्ञ म्हणतात.

यावरून या अग्निकांडाचे गांभीर्य लक्षात यावे. दृश्य असलेल्या नुकसानाव्यतिरिक्त या अग्निकांडाचा फटका बसलेल्या लोकांवर झालेले भावनिक आणि मानसिक परिणामही फार गंभीर आहेत. त्या भागात केवळ सेलिब्रिटिज राहत नाहीत. सामान्य माणसेही राहतात. त्यांना त्यांचे जीवन पुन्हा नव्याने उभे करण्याचे आव्हान पेलावे लागेल. अनेकांसाठी तात्पुरते घर मिळविणे आणि नोकरशाहीच्या ढिसाळ कारभारातून दिलासा मिळविणे, हे त्रासदायक ठरणार आहे. उपजीविकेचा प्रश्न वेगळा. अमेरिकेवर टीका करायची तर कितीही मुद्दे सापडतील. पण, लोकांच्या आर्थिक नुकसानासह मानसिक नुकसानीबद्दलही तिथले सरकार, समाज जागरूक आहे. आग अजून पूर्णतः आटोक्यात यायची असताना तेथे मानसिक स्वास्थ्याच्या स्थितीचा अभ्यास झाला. या अभ्यासातून असे दिसून आले आहे की, वणव्याचा फटका बसलेल्या अनेकांना पोस्ट ट्रॉमॅटिक स्ट्रेस डिसऑर्डर (पीटीएसडी) चिंता आणि नैराश्याने ग्रासलेले आहे. विस्थापित लोकांमध्ये वृद्ध व्यक्ती, आजारी लोक आणि मुले आहेत. काही अपंग आहेत. या साऱ्यांचे पुनर्वसन हे आव्हानात्मक काम आहे. त्यासाठी शासन-प्रशासन कामाला लागलेले आहे. मात्र, अशा आपत्तींचा पूर्णपणे प्रतिबंध करणे आणि त्या आल्याच तर त्यांचा प्रभाव कमी करणे या दोन्ही गोष्टी अत्यंत कठीण असल्याचे एव्हाना सर्वांना पटलेले आहे. तंत्रज्ञान आणि आपत्ती व्यवस्थापनात जागतिक आघाडीवर असलेला युनायटेड स्टेट्स नावाचा देश या अग्निकांडाने पुरता हादरलेला आहे. कोणत्याही प्रमाणात संसाधने किंवा तयारी असली, तरी निसर्गाने निर्माण केलेल्या धोक्यांना आपण पूर्णपणे रोखू शकत नाही, हे शासकांच्या लक्षात आलेले आहे. यातील दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की, या घटनेला जागतिक हवामान बदलाचेही पदर आहेत. अग्निशमन व्यवस्थेत कितीही गुंतवणूक केली तरी कार्बनचे उत्सर्जन मर्यादित करणे, जमिनींच्या वापराबाबत सजगता दाखवणे, बांधकामाचे नियम अधिक कठोर करणे हे सारे आवश्यकच असते. भारतात यातले काहीही होत नाही. लोक कुठेही कसेही बांधकाम करतात आणि सरकारी यंत्रणा परवानग्या वाटत फिरते. आपल्याकडील आपत्तींची तीव्रता नेहमी अधिक असते ती त्यामुळे. वनस्पतींचे आच्छादन कमी झाले की त्या त्या प्रदेशाची कार्बन डाय ऑक्साईड शोषण्याची क्षमता कमी होते. अशा आपत्तींना अनुकूल असलेले हवामान त्यामुळे निर्माण होते. साऱ्या जगभर अशीच स्थिती आहे. वन्यजीव अधिवास नष्ट झाले आहेत, असंख्य प्राणी विस्थापित झाले आहेत आणि त्यांच्या परिसंस्था विस्कळीत झाल्या आहेत. अशात असे अग्निकांड घडते तेव्हा ते तात्पुरते नसते. ते अनेक नव्या प्रश्नांना जन्म देत असते. लॉस एंजेलिस परिसरातील लोकांसाठी संपूर्ण सामान्य स्थितीला पोहोचण्याचा मार्ग लांब पल्ल्याचा आहे. घरे आणि पायाभूत सुविधांची पुनर्बांधणी करण्यासाठी अनेक वर्षे लागतील. शहराच्या अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ असलेला मनोरंजन उद्योग अधिक वेगाने पुन्हा सुरू होण्यासाठीही काही काळ जावा लागेल. लॉस एंजेलिसमधील वणव्यामुळे हे स्पष्टपणे दिसते आहे की, जगभरातील कोणत्याही शहराला असा धोका होऊ शकतो. मग ते जंगलाला लागून असो वा नसो. काँक्रिटमुळे सर्वत्र आलेला कोरडेपणा हे आगीसाठी अनुकूल असलेला एक कारक आणि दाट लोकवस्त्यांमुळे ती वेगाने पसरते हा दुसरा मुद्दा. लॉस एंजेलिसमध्ये शहरी नियोजनाचा मुद्दा आता चर्चेला आलेला आहे. ते अमेरिकेतील दुसऱ्या क्रमांकाचे (पहिला नंबर न्यू यॉर्कचा) शहर आहे. पाणी, जंगल, डोंगर-खोरे सारे आजूबाजूला. तरीही जे घडायचे ते घडले. लॉस एंजेलिसमधील आगीचा भडका निसर्गाच्या शक्तीची जशी आठवण देतो, तसा तो आपल्या असुरक्षिततेचेही स्मरण करून देतो. अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रात असे घडत असेल तर भारतात काय घडू शकेल, याचाही अंदाज यावरून करता येतो. त्यामुळे या घटनेतून भारताने धडा घेतला पाहिजे. आपली सर्व शहरे दाट लोकवस्त्यांची, कोंदट गल्ल्यांची, अस्वच्छतेची माहेरघरे आहेत. नागपूर-पुण्यासारख्या नगरांत जुन्या वस्त्यांमध्ये अग्निशमनाचे वाहन जाऊच शकत नाही, अशी स्थिती आहे. तरीही तिथली बांधकामे वैध आहेत. तिथला जमिनींचा वापर वैध आहे. निसर्ग अवैध कधीच नसतो. त्याला मर्यादा सोडून केलेले काम आवडत नाही आणि त्यामुळेच तो मानवाला अशा प्रसंगांतून मर्यादा दाखवून देतो. त्या ओळखून त्यातून धडा घ्यायचा आणि कामाला लागायचे की असा प्रसंग आपल्या गावात, वस्तीत घडेपर्यंत वाट पाहायची, एवढेच आपल्याला ठरवायचे आहे. ▮

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# दिल्लीची 'दंगल' सुरू!

अखेर दिल्ली विधानसभा निवडणुकीची घोषणा झाली. ५ फेब्रुवारी रोजी दिल्लीत मतदान होईल आणि ८ रोजी निकाल घोषित होतील. मागील १० वर्षांपासून सत्तेत असलेला आम आदमी पक्ष, १० वर्षांपासून सत्तेबाहेर असलेली काँग्रेस आणि मागील २६ वर्षांत सत्ता न मिळविता आलेली भाजपा अशी ही तिरंगी लढत असेल. यात आणखीही काही पक्ष-अपक्ष निवडणूक लढविणार असले, तरी मुख्य लढत भाजपा, आप व काँग्रेस यांच्यात होईल.

**तुल्यबळ लढत** : दिल्लीने एक-दोन अपवाद वगळता आजवर एकतर्फी निवाडे दिले आहेत. मग, ती लोकसभा निवडणूक असो की विधानसभा, ज्या पक्षाला कौल दिला तो भरभरून दिला आहे. लोकसभा निवडणुकीत सर्व सातही जागा भाजपाला दिल्या तर विधानसभेत केजरीवाल यांच्या पक्षाला छप्परफाड बहुमत दिले. यावेळी दिल्लीचा मतदार काय करणार, याचा अंदाज आज तरी लावता येणार नाही.

**जमेची बाजू** : लोकसभा निवडणुकीत भाजपा व काँग्रेस-आम आदमी पक्ष यांच्यात सरळ लढत झाली होती. आम आदमी पक्षाने चार जागा लढविल्या होत्या तर काँग्रेसने तीन जागांवर लढत दिली होती. पण, भाजपासमोर या युतीचा टिकाव लागला नाही आणि सातही जागा भाजपाने जिंकल्या. लोकसभेतील विजय ही भाजपाची जमेची बाजू आहे. शिवाय राज्यात सरकार नसल्याने सरकारविरोधात असलेल्या वातावरणाचा फटकाही भाजपाला बसणार नाही. पक्षासाठी ही जमेची बाजू मानली जाते. दुसरीकडे आम आदमी पक्षाची जमेची बाजू म्हणजे केजरीवाल यांची अटक. आम्हाला लक्ष्य केले जात आहे, असा सूर केजरीवाल लावणार आहेत. याच्या जोडीला त्यांची उपलब्धी म्हणजे शिक्षण, आरोग्य या दोन क्षेत्रात या सरकारने बजावलेली कामगिरी. सामान्य नागरिक दिल्ली सरकारच्या या दोन कामगिरींवर खूश असला, तरी केवळ या शिदोरीवर केजरीवाल यांना दिल्ली जिंकता येणार नाही. केजरीवाल यांनी आणखी दोन योजना घोषित केल्या आहेत. महिलांना दरमहा २१०० रुपये देण्याची योजना त्यांनी समोर आणली आहे तर ऑटोरिक्षा चालकाचा अपघातात मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबीयास १० लाख रुपये देण्याची घोषणा त्यांनी केली आहे. या दोन्ही घोषणांचा काही फायदा केजरीवाल यांना मिळू शकतो. मात्र, सत्तेत असल्याचे तोटेही त्यांच्या पदरात पडणार आहेत. केजरीवाल यांनी सरकार चालविण्यासाठी जनतेच्या पैशाची उधळपट्टी केली आहे, असेही काही लोकांना वाटते. केजरीवाल यांनी स्वतःची प्रतिमा तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जाहिराती केल्या, त्यासाठी सरकारी पैसा वापरला, असेही एक वातावरण आहे. केजरीवाल यांच्या जाहिरातबाजीवर सर्वोच्च न्यायालयानेही काही प्रसंगी टिप्पणी केली आहे. या साऱ्यांची गोळाबेरीज काय असेल यावर विधानसभा निकाल अवलंबून राहणार आहेत.

**जातीय समीकरण** : केजरीवाल हे स्वतः बनिया समाजाचे आहेत. या वर्गाचा त्यांना मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळत आला आहे. याही निवडणुकीत तो मिळेल, असे मानले जाते. याशिवाय मुस्लिम त्यांना एकगठ्ठा मतदान करतील. लोकसभा निवडणुकीत काँग्रेस तर विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्ष असे धोरण मुस्लिम समाजाने आजवर अवलंबिलेले आहे. तेच या निवडणुकीतही होणार असे मानले जाते. दलित मते भाजपा, केजरीवाल व काँग्रेस या तीन भागांत विभागली जाण्याची शक्यता आहे.

**मायावतीही मैदानात** : उत्तरप्रदेशाच्या राजकारणातून जवळपास बाद झालेल्या बसपा नेत्या मायावती यांनीही दिल्ली विधानसभा निवडणूक लढविण्याची घोषणा केली आहे. मागील विधानसभा निवडणुकीत काही मतदारसंघात बसपा उमेदवारांनी चांगली मते घेतली होती. पण, आता एकूणच बसपाचा राजकीय भाव घसरला असल्याने दिल्लीत बसपाचे उमेदवार किती-कितपत कामगिरी बजावू शकतात, याबाबत साशंकता व्यक्त केली जात आहे. मात्र, काही मतदारसंघात बसपा उमेदवारांनी चांगली मते घेतल्यास ते अन्य पक्षांना प्रभावित करू शकतात.

**बिहार-उत्तरप्रदेश** : बिहार-उत्तरप्रदेशातून आलेल्या मतदारांचा पाठिंबा भाजपाला मिळण्याची शक्यता आहे. कधीकाळी हा मतदार काँग्रेसकडे होता□□. त्याच शिदोरीवर मूळच्या उत्तरप्रदेशाच्या असलेल्या शीला दीक्षित यांनी दिल्लीवर तब्बल १५ वर्षे राज्य केले होते. हा सारा मतदार मागील काही वर्षांत भाजपाकडे वळला आहे. याचा भाजपाला चांगला फायदा मिळेल, असे मानले जाते. दिल्लीतील शीख समाज आम आदमी पक्ष व भाजपा यांच्यात विभागला जाईल असे दिसते. पंजाबात आम आदमी पक्षाचे सरकार आहे. याचा काही फायदा दिल्लीत केजरीवाल यांना मिळू शकतो तर जाट, गुजर हे समाज भाजपाला एकगठ्ठा मतदान करू शकतात. जातीय समीकरणाचा विचार केल्यास भाजपा व आम आदमी पक्ष दोघेही तुल्यबळ असल्याचे दिसून येते. दिल्लीत अगदी जातीच्या आधारावर मतदान होत नसले, तरी त्याचा थोडाफार परिणाम तर प्रत्येक निवडणुकीवर होत आला आहे. तसा तो यावेळीही होणार आहे. कधीकाळी दिल्लीवर पंजाबी समाजाचे वर्चस्व राहात होते. आता ती स्थिती राहिलेली नाही. उत्तरप्रदेश-बिहारमधून आलेल्या मतदारांनी दिल्लीत आपले बस्तान बसविले आहे. ते निवडणूक निकालांना प्रभावित करू लागले आहेत.

**भाजपाचा चेहरा?** : भाजपाने या निवडणुकीत आपला मुख्यमंत्रिपदाचा चेहरा घोषित केलेला नाही. मागील काही निवडणुकीत भाजपाने चेहरा घोषित न करण्याचे धोरण स्वीकारले आहे. राज्यात पक्षाला बहुमत मिळाल्यास एखादा नवा चेहरा मुख्यमंत्री म्हणून घोषित करण्याची तयारी पक्षाने ठेवली आहे. आप आदमी पक्षासाठी केजरीवाल यांचा चेहरा एक जमेची बाजू ठरू शकतो. मात्र, स्वतः केजरीवाल यांच्यासाठी नवी दिल्ली विधानसभा मतदरसंघातील लढत तुल्यबळ ठरण्याची चिन्हे आहेत. भाजपाने त्यांच्याविरोधात माजी खासदार परवेश वर्मा यांना उभे केले आहे. वर्मा जाट आहेत. नवी दिल्लीत जाट समाजाचे फार मतदार नाहीत, तरीही वर्मा केजरीवाल यांच्यासाठी डोकेदुखी ठरू शकतात. विशेष म्हणजे केजरीवाल यांच्याजवळ यावेळी मुख्यमंत्रिपदाचे वलय नाही. याचा काही परिणाम तर त्यांच्या निवडणुकीत दिसणार आहेच.

**व्यक्तिगत प्रतिष्ठा** : दिल्ली विधानसभेची ही निवडणूक केजरीवाल यांच्यासाठी व्यक्तिगत प्रतिष्ठेची ठरणार आहे. दिल्ली सरकारवर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप झाले आहेत. दिल्ली मद्य घोटाळ्यात अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया, संजयसिंग या तिघांना तुरुंगात जावे लागले. आगामी निवडणुकीत आम आदमी पक्षाचा पराभव झाल्यास, त्यासाठी दिल्ली मद्य घोटाळा जबाबदार ठरणार आहे, म्हणजेच केजरीवाल जबाबदार ठरणार आहेत. त्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षेला ग्रहण लावणारी ही घटना ठरेल. शिवाय दिल्ली निकालांचा परिणाम केवळ दिल्लीपुरता मर्यादित न राहता, पंजाबवरही त्याचा परिणाम होणार आहे. दिल्ली हातातून गेल्यास पंजाब किती काळ आपल्या हातात शाबूत राखता येईल, हे आव्हान केजरीवाल यांना पेलावे लागणार आहे. राष्ट्रीय महत्त्वाकांक्षा असलेला प्रादेशिक नेता हे केजरीवाल यांच्या राजकारणाचे वास्तव आहे. पण, हे वास्तव ते स्वीकारण्यास तयार नाहीत.

दिल्लीचे निकाल केजरीवालांना राजकीय वास्तवाच्या जवळ नेणारे ठरतात की त्यांच्या राष्ट्रीय महत्त्वाकांक्षेला बळ देणारे ठरतात हे तर ८ फेब्रुवारीलाच दिसणार आहे. ▮

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# पतंगबाजी करा पण नायलॉन मांजा नकोच!

मकरसंक्रांत येताच भारतात पतंगबाजीला उधाण येते. आता तर ही पतंगबाजी व्यावसायिक आणि लोकांचे गळे कापणारी झाली आहे. यातून कोट्यवधी रुपयांची उलाढाल सुरू झाली आहे. एखाद्या विषयातून रोजगार निर्मिती होत असेल तर त्यात काहीही वावगे नाही. मात्र यातून लोकांचे जीवन संकटात येत असेल तर नक्कीच त्यावर मंथन आणि कठोर उपाय करणे अगत्याचे आहे. २५ वर्षांपूर्वी जेव्हा घरीच मांजा घोटून पतंगबाजी व्हायची तेव्हा तेवढा धोका नव्हताच. पण चीननिर्मित नायलॉन मांजा आला अन् पतंगबाजी बदनाम झाली. कारण मकरसंक्रांतीला पतंगांनी आकाश झाकले जाते अन् कटलेल्या पतंगीचा नायलॉन मांजा खाली आल्यावर लोकांचे गळे कापून जातो. ज्या लोकांचा त्याच्याशी काहीही संबंध नाही ते विनाकारण रुग्णालयात चकरा मारतात. काही जण तर गळे कापल्याने यमाघरीही गेले आहेत. मग अशी पतंगबाजीची खरोखरच आपल्या देशाला गरज आहे का? मूठभर लोकांनी मजा मारायची अन् 'ओऽऽ काऽऽट' असे म्हणत रस्त्याने जाणाऱ्या हजारो लोकांना यमाघरी पाठवायचे, हेच त्यांचे ध्येय आहे का? शासनाने तर नायलॉन मांजावर प्रतिबंध घातला आहे. पण आपल्या देशातील लोकांची मानसिकता विचित्र आहे.



ज्यावर प्रतिबंध असतो, त्याच वस्तूचा खप वाढत असतो. अगदी तसाच प्रकार नायलॉन मांजाच्या संदर्भात घडत आहे. शहरात सोडा आता ग्रामीण भागातही नायलॉन मांजा खुलेआम विकला जात आहे. पोलिस नायलॉन मांजा विकणाऱ्यांना पकडतात आणि गुन्हा दाखल करून मोकळे होतात. पण नायलॉन मांजा खरेदी करणारे आणि त्याची निर्मिती करणारे तर मोकाटच फिरतात ना? त्यांचे काय, त्यांनाही आरोपी बनवून कारागृहात टाकण्याची गरज आहे. वस्तुतः नायलॉन मांजा हे देशावरचे फार मोठे संकट आहे. त्याला कुणीही हलक्यात घेण्याचा प्रयत्न करू नये. समजा जी मंडळी नायलॉन मांजा वापरणाऱ्यांची बाजू घेत असतील तर त्यांचे गळे कापा आणि नंतर त्यांना यातना झाल्यावर विचारा, दादा, आता कसे वाटते! जावे त्यांच्या वंशा तेव्हा कळे या युक्तीचा वापर आपण आता करायलाच हवा. माझ्या मते हिंदू धर्मात जे काही सण आहेत, त्यांना बदनाम करण्याचे आंतरराष्ट्रीय कट कारस्थानच सुरू झाले आहे. पूर्वी धूलिवंदन पवित्र मानले जायचे. आज त्या दिवशी केमिकलयुक्त रंग चेहऱ्याला फासून लोकांना विद्रूप केले जाते. त्यात अनेकांचे डोळे खराब होतात. दिवाळीलाही अशाच स्वरूपात बदनाम केले जात आहे. एकीकडे हिंदू सणांच्या बळावरच पैसे कमवायचे आणि याच लोकांना बदनाम करायचे याही षडयंत्राला संपविण्यासाठी सतर्क होण्याची गरज आहे.

त्रेतायुगातील मकर संक्रांतीच्या दिवशी प्रभू श्रीरामाने लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न आणि हनुमानासह पतंग उडवली होती. तेव्हापासून मकर संक्रांतीच्या दिवशी पतंग उडविण्याची परंपरा भारतात सुरू झाली. पण आज त्याच प्रभू रामचंद्रांच्या देशात भक्त नायलॉन मांजा वापरून काय साध्य करीत आहेत, याची विचारणा त्यांना करायला हवी. तसे पाहता पतंगाचा उपयोग चांगल्या कार्यासाठी सहज करता येते. संदेश पाठवणे, हवामानाचा अभ्यास करणे याकरिता तिचा उपयोग पूर्वी करण्यात आला आहे. मग या पतंगबाजीत नायलॉन मांजा आलाच कुठून? हेही आंतरराष्ट्रीय विशेषतः चीनचे षडयंत्र समजून भारतातील समस्त रामभक्तांनी तरी नायलॉन मांजा विकण्याच्या, खरेदी करण्याच्या भानगडीत पडू नये, असेच मला वाटते. आपली पतंग कटू नये याकरिता आम्ही नायलॉन मांजा वापरतो अशीही बाजू मांडली जाईल. पण राजेहो, पतंग कटण्यासाठीच असते. पतंग कटलीच नाही तर खेळात मजा कशी येईल? विशेष म्हणजे साधा दोरा वापरून जो पतंगबाजी करतो अन् यश संपादन करतो तोच खरा शूरवीर ठरतो. नायलॉन मांजा वापरायचा आणि लोकांची पतंग कापून रस्त्याने जाणाऱ्या दुचाकी चालकांना यमाघरी पाठविणारा शूरवीर कसा? तो तर गुन्हेगार आहे. तेव्हा येणाऱ्या मकरसंक्रांतीच्या दिवशी आपल्याला शूरवीर बनायचे की गुन्हेगार याचा निर्णय पतंगबाजी करणाऱ्यांनी करायलाच हवा. ज्या चीनने समस्त जगावर कोरोनारूपी संकट टाकले, त्याच देशाला नायलॉन मांजाच्या रूपातून फायदा होईल अशी कृती भारतीयांनी सोडायलाच हवी. जी मंडळी आपल्या देशावर, देशातील बांधवांवर प्रेम करतील ते नक्कीच नायलॉन मांजा आयुष्यातून हद्दपार करतील, अशीच अपेक्षा आज आपण करायला हवी, नाही का? ▮

९८८१७१७८५९

## कानोसा


**अमोल पुसदकर**

# विवेकानंदांचा तरुणांना संदेश

स्वामी विवेकानंद युवकांचे प्रेरणास्थान आहेत. त्यांनी संपूर्ण भारताचा प्रवास केला. भारताच्या चालीरीती, भारताचे जनजीवन, भारताची श्रद्धा केंद्रे, भारताचे महापुरुष या सर्वांचा अभ्यास करून त्यांच्या मनात आपल्या देशवासीयांबद्दल काही भावना उमटल्या. त्यांच्या वेगवेगळ्या भाषणांमध्ये त्यांनी या भावनांचे प्रकटीकरण केलेले आहे. यातून तरुणांना एक अतिशय उत्तम संदेश मिळतो. तरुणांनी विवेकानंदांचा हा संदेश जर ग्रहण केला तर त्यांच्याही जीवनाला एक चांगली दिशा मिळाल्याशिवाय राहणार नाही.

विवेकानंद ज्यावेळेस शिकागोच्या सर्वधर्म परिषदेमध्ये बोलायला उभे राहिले, त्यावेळेला त्यांनी स्वतःबद्दल 'मी कोण आहे' हे सांगताना म्हटले की, लाखो वर्षं जुन्या संन्यासी परंपरेचा प्रतिनिधी म्हणून मी आपल्यासमोर उभा आहे. म्हणजे त्यांनी आपले नाते लाखो वर्षं जुन्या संन्यासी परंपरेशी जोडले आहे. स्वामी विवेकानंदांच्या मनामध्ये भारताविषयी अतिशय पूज्य भाव होता. ते म्हणतात की, पूर्वी सगळ्या हिंदूंप्रमाणे मलाही वाटत होते की, भारत ही पुण्यभूमी आहे. भारत जन्मभूमी आहे. परंतु आज मला असे वाटू लागले आहे की, पृथ्वीच्या पाठीवर जर असा कोणता देश असेल की ज्याला 'पुण्यभूमी' हे गोड नाव देता येईल, जर असे एखादे कोणते ठिकाण असेल की जिथे जगामधील सर्व जीवांना आपल्या कर्मफलाचा उपयोग घेण्यास यावे लागेल, तर ती भूमी म्हणजे ही आपली मायभूमी 'भारत'च होय.

स्वामीजी म्हणायचे की, इंग्लंडचा जन्म कदाचित वेगवेगळ्या पद्धतीच्या भौतिक सुविधा शोधण्यासाठी झाला असेल, अमेरिकेचा जन्म कदाचित वेगवेगळ्या पद्धतीच्या नागरिक सुधारणांसाठी झाला असेल, मात्र भारताचा जन्म हा जगाला आध्यात्मिकतेचे पसायदान देण्यासाठी झालेला आहे. स्वामीजी म्हणतात की, प्रत्येक समाजामध्ये काही चांगल्या व काही वाईट गोष्टी असतात. आमच्याही समाजामध्ये काही दोष आहेत. एखादा लहान मुलगा व्यासपीठावर उभा राहून आमच्या समाजातील दोषांचा पाढा वाचू शकेल. परंतु मानव जातीचा मित्र तोच आहे की, जो हे करण्याचा दूर करण्याचा मार्ग दाखवतो. मागील १०० वर्षांत समाज सुधारणेच्या नावाखाली जे साहित्य निर्माण झालेले आहे, त्यामध्ये इतके शिव्याशाप भरलेले आहेत, सनातनी लोकांवर इतके प्रहार त्यांनी केलेले आहेत की, संपूर्ण देशाने हे साहित्य पाहून शरमेने मान खाली घालावी. ही काय सुधारणा झाली? यामुळे राष्ट्राला वैभव प्राप्त होईल का? स्वामीजी म्हणतात की, भारताला कधीतरी सुधारकांची उणीव पडली आहे काय? आपण भारताचा इतिहास पाहिला आहे का? रामानुजाचार्य कोण होते? शंकराचार्य कोण होते? गुरुनानक कोण होते? चैतन्य महाप्रभू कोण होते? कबीर व दादू हे कोण होते? रामानुजाचार्यांना दलित वर्गाबद्दल कळवळा नव्हता का? आमच्या देशातील महापुरुषांनी समाजसुधारण्याचे कार्य केलेले आहे. परंतु आजच्या सुधारकांप्रमाणे त्यांच्या तोंडी शिव्याशाप नव्हते. त्यांच्या तोंडी होते ते केवळ आशीर्वाद. शिव्याशाप व निंदा यांच्यामुळे काहीही चांगले निष्पन्न होणार नाही. शेकडो वर्षांपासून अशा उपायांचा अवलंब करण्यात आलेला आहे. पण त्यापासून कोणताही चांगला परिणाम घडून आलेला नाही. प्रेम व सहानुभूती यांच्याद्वारे चांगले परिणाम घडवून आणता येईल. पुढे ते म्हणतात की, आपल्या ज्या राष्ट्ररूपी जहाजाने कित्येक शतके हिंदू जातीला परतीराला पोहोचविले आहे; आज कदाचित या जहाजाला काही छिद्रे पडली असतील, कदाचित ते नादुरुस्त झाले असेल आणि जर असे असेल तर ही छिद्रे बुजविणे हे तुमचे, माझे, सर्वांचेच कर्तव्य आहे. चला, आपल्या देश बांधवांना आपण या धोक्याची जाणीव करून देऊ.



आपल्या शास्त्रातील सत्यांचा भारतात व भारताबाहेर प्रसार करण्याकरिता तरुण प्रचारकांना शिक्षण देणाऱ्या संस्था आपल्या देशात सुरू करण्याची माझी योजना आहे. माणसे हवी आहेत. माणसे हवी आहेत. सशक्त, उत्साही, श्रद्धावान व निष्कपट अशी तरुण माणसे हवी आहेत. असे शंभर तरुण मिळाले तरी सर्व जगात क्रांती घडविता येईल.

देशभक्तीविषयी स्वामीजी म्हणतात की, देशभक्तीवर माझाही विश्वास आहे. देवतांचे व ऋषींचे लाखो वंशज आज पशुतुल्य बनले आहेत, हे बघून तुमच्या हृदयाला पीळ पडतो का? कोट्यवधी लोक आज भुकेने तडफडत आहेत, हे पाहून तुमच्या हृदयाला चरे पडतात का? आपला देश अज्ञानाच्या काळ्याकुट्ट मेघांनी झाकाळून गेला आहे हे बघून तुमचे हृदय पिळवटून निघते काय? तुम्ही अस्वस्थ झाला आहात काय? तुमची झोप उडाली आहे काय? ही जर तुमची अवस्था असेल तर देशभक्त होण्याची ही पहिली पायरी आहे. समजा, देशाविषयी तुमच्या हृदयात तळमळ आहे, पण केवळ व्यर्थ बोलण्यात शक्ती खर्च न करता आपल्या देशबांधवांची दुर्दशा थांबविण्याकरिता तुम्ही काही प्रत्यक्ष मार्ग शोधून काढला आहे काय? देशभक्त होण्याची ही दुसरी पायरी आहे. पर्वत प्राय विघ्नांना तोंड देता येईल असा दृढ निश्चय तुमच्या ठायी आहे का? सर्व जग हाती तलवार घेऊन तुमच्या विरोधात उभे झाले तरी तुम्हाला जे सत्य वाटते ते करण्याचे धैर्य तुमच्यात आहे का? आपल्या ध्येयाचा पाठपुरावा करीत धीराने तुम्ही वाटचाल करू शकता का? अशी चिकाटी जर तुमच्याजवळ असेल तर देशभक्त होण्याची ही तिसरी पायरी आहे.

स्वामीजी म्हणतात, आता आपल्या सगळ्यांनाच कठोर परिश्रम करावे लागतील. खूप खूप झटावे लागेल. आता झोपायला वेळ नाही. आपल्या कार्यावरच भारताचा भविष्यकाळ अवलंबून आहे. आपली ही भारत माता हळूहळू नेत्र उघडीत आहे. ती काही काळ निद्रिस्त झाली होती इतकेच. उठा, तिला जागे करा आणि या नवजागृतीच्या संजीवनीने तिला पूर्वीपेक्षाही अधिक गौरवान्वित करून भक्तिभावाने तिची तिच्या चिरंतन सिंहासनावर स्थापना करा.

स्वामीजींचे हे अनमोल विचार आजही तरुणांना देशभक्तीचा संदेश देणारे आहेत. स्वामीजींनी सांगितलेल्या मार्गावर जर तरुणांनी चालायचे ठरविले तर भारताचा उज्ज्वल भविष्यकाळ जवळच उभा राहील, यात काही संशय नाही. ▮

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## श्रीराम जन्मभूमी आणि समर्थ रामदास स्वामी

टाकळी येथे १२ वर्षांच्या कठोर तपश्चर्येनंतर समर्थ तीर्थयात्रेस निघाले. या यात्रेदरम्यान चित्रकूट येथे प्रत्यक्ष हनुमंतांनी मानव रूपात समर्थांना दर्शन दिलं. या भेटीत हनुमंतांनी समर्थांना स्वसंरक्षणार्थ एक कुबडी दिली. यामध्ये दुधारी शस्त्र होते. या यात्रेदरम्यान काही संकट आल्यास हे शस्त्र स्वतःचा जीव वाचवण्यासाठी समर्थांच्या कामी येणार होते. ती व्यक्ती दुसरी-तिसरी कुणीही नसून प्रत्यक्ष हनुमंत होते, हे नंतर समर्थांनी ओळखले. यात्रेचा एकेक टप्पा पार पाडत समर्थ रामजन्मभूमीच्या वेशीवर येऊन पोचले. रामनामाच्या संकीर्तनात न्हाऊन गेलेली ही पुण्यभूमी. जिकडे तिकडे रामनामाचा गजर सुरू होता. सगळीकडे प्रसन्न वातावरण होते. अचानक धावपळ सुरू झाली. आरडाओरड वाढली. मुगलांची जिहादी फौज समोर येईल त्याला भोसकू लागली. असाच एक जिहादी समर्थांवर तुटून पडला. क्षणाचाही विलंब न करता समर्थांनी कुबडीतील शस्त्र त्याच्यावर उगारले व त्याला संपवले. नंतर समर्थ थेट मथुरेस गेले. तेथील परिस्थितीही काही वेगळी नव्हती. ही परिस्थिती बदलली पाहिजे हा विचार समर्थांना स्वस्थ बसू देत नव्हता. त्यामुळे येथे कुणी समविचारी भेटतो का याचा शोध घेताना समर्थांना हरिकृष्ण सापडला. त्याला सोबत घेऊन समर्थांनी मथुरेला मठाची स्थापना केली. मथुरेप्रमाणे अयोध्येतही आपल्या संप्रदायाचा मठ स्थापन झाल्यास रामजन्मभूमीच्या संरक्षणासाठी तरुणांची एक संघटना उभी करता येईल, असे समर्थ हरिकृष्णाजवळ बोलले. त्यावर अयोध्येचा रामकृष्ण या कामी आपली मदत करेल, असे हरिकृष्णांनी समर्थांना सांगितले. तीर्थयात्रेवरून परत येताना आपण त्याची भेट घेऊ, असे मथुरेतील मुक्कामात समर्थांनी सांगितले आणि परतीच्या प्रवासात हरिकृष्णासह समर्थ अयोध्येस आले. ठरल्याप्रमाणे रामकृष्णाची भेट झाली आणि अयोध्येतील कार्य सुरू झाले. आंदोलनाचे विविध टप्पे आणि न्यायव्यवस्थेच्या ऐतिहासिक निकालानंतर रामजन्मभूमीच्या ठिकाणी भव्य मंदिर तयार होऊन ऐतिहासिक प्राणप्रतिष्ठा सोहळा संपूर्ण जगाने अनुभवला. त्याच ऐतिहासिक सोहळ्याची वर्षपूर्ती साजरी करताना पुन्हा एकदा संपूर्ण देश राममय झालाय.

**अखिल देशपांडे**/अकोला

## वाचक पत्रे

### ग्रामीण भागात इंटरनेट नेटवर्कची समस्या

ग्रामीण भागातील बीएसएनएलसह खाजगी इंटरनेट नेटवर्क सेवा देणाऱ्या कंपनीचे जाळे पोहोचले असले, तरी नेटवर्क समस्या कायम आहेत. नेटवर्क इंटरनेट सुविधांमध्ये गतिशील वाढ होण्याचे कंपनीद्वारे केलेले दावे फोल ठरत आहेत. गतिशील सुविधा सोशल माध्यमाद्वारे दाखविण्यात येते आहे, परंतु आजही ४-जी पासून ५-जी पर्यंतच्या नेटवर्क दर्जात सुधारणा झालेली नाही. मोठमोठ्या शहरात नेटवर्क इंटरनेट रेंज वाढली, परंतु ग्रामीण भागात ४-जी इंटरनेट नेटवर्क सेवेचा अभावच आहे. त्यामुळे इंटरनेट नेटवर्क चालवणारा ग्राहक वर्ग मोठा असून त्यामध्ये नेटवर्कअभावी नागरिकांना विद्यार्थ्यांना, व्यावसायिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी इंटरनेट नेटवर्क सेवा ठप्प झाल्यासारखे आहे. ५-जी जलद सेवा देणाऱ्या कंपन्या ग्रामीण भागात जलद सेवा देत नसल्याने इंटरनेट नेटवर्क सेवा ठप्प होत असल्याने ग्राहकांना याचा आर्थिक फटका बसतो आहे. नेटवर्क इंटरनेट सुविधेचे वाढते दर यामुळे ग्राहकांना विनाकारण आर्थिक भुर्दंड भरावा लागत आहे. बीएसएनएलसह खाजगी इंटरनेट नेटवर्क सुविधेचे जाळे पसरले, परंतु जलद सुविधांकडे नेटवर्क इंटरनेट कंपनीचे दुर्लक्ष करतात. कंपनीद्वारे शुल्क वाढविण्यात आले, परंतु नेटवर्क इंटरनेट सुविधांमध्ये मात्र गती देण्यात आली नाही. ग्राहकांना त्रास होणार नाही याची काळजी नेटवर्क इंटरनेट कंपनीने घेतली पाहिजे.

**मुनीश्वर मलेवार**/७७४४०१०७८७

••••

### दुर्लक्षित माहूर रेणुका देवी गड

मी दोन दिवसांपूर्वी माहूरला गेलो होतो. लहानपणापासून मी दरवर्षी जात असतो. माझ्यासारखे बरेच भाविक मुंबई, पुणे व मध्यप्रदेशमधून दर्शनाला येतात. येथे घोषित केलेले स्काय



वॉकचे काम अगदी प्राथमिक टप्प्यातच आहे. दोन वर्षांपासून काम सुरू आहे. वयस्क व दिव्यांग भाविकांना अजूनही पालखीत बसून जावे लागते. अर्धवट कामामुळे इतर भाविकांना सुद्धा त्रास सहन करावा लागतो. काम रेंगाळायचे कारण एक तर पैशाची कमतरता, ते शक्य वाटत नाही किंवा अशा कामाकरिता जे कुशल मनुष्यबळ लागते त्याचा अभाव असावा. पण एक गोष्ट पक्की आहे की माहूर गड पहिलेपासून दुर्लक्षित आहे तो आजपावतो. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असताना या कामाला प्राधान्य दिले जावे. काही दिवसांपूर्वी मी वणीच्या सप्तशृंगी गडावर जाऊन आलो. तेथे सुद्धा स्काय वॉकची सोय आहे. माहूर गडाकडे प्राधान्याने लक्ष द्यावे, ही अपेक्षा. ▮

**राजेंद्र वाडी**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# आ.गुट्टेंची ती फेसबुक पोस्ट चर्चेत, भ्रष्टाचाऱ्यांचे व दलालांचे धाबे दणाणले

## गतिमान व पारदर्शक कारभारासाठी आग्रही : फेसबुकद्वारे सोशल मीडियात मांडली भूमिका

**गंगाखेड,/प्रतिनिधी-:** जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, महावितरण, शिक्षण विभाग, बँकेसह सर्व शासकीय कार्यालयांमध्ये कुठलाही अधिकारी कर्मचारी किंवा दलाल जर अडवणूक करीत असेल तर माझ्याशी संपर्क साधावा. तसेच सर्वसामान्य नागरिकांकडून पैसे घेताना कोणी अधिकारी सापडला तर त्याची माझ्याशी गाठ आहे, असा गर्भित इशारा देत सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देणारी स्थानिक आ.डॉ. रताकर गुट्टे यांची ती फेसबुक पोस्ट चांगलीच व्हायरल झाली आहे. त्यामुळे त्या पोस्टची सर्व प्रशासकीय कार्यालयांमध्ये जोरदार चर्चा सुरू आहे.

आपल्या गंगाखेड विधानसभा मतदारसंघातील कोणत्याही माय-बाप जनतेची प्रशासकीय कामात अडवणूक होता कामा नये. पारदर्शक आणि गतिमान कारभार, हेच माझे उद्दिष्ट आहे. त्यासाठी आपण स्वतः पुढाकार घेतला आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात स्वच्छ कारभार झाला पाहिजे. कोणी अडवणूक करीत असेल तर त्याची गय करणार नाही, असेही आ.डॉ.गुट्टे यांच्या अधिकृत फेसबुक पेजवरील त्या पोस्टमध्ये म्हटले आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनतेकडून समाधान व्यक्त केले जात आहे. लाच देणे आणि घेणे हा गुन्हा आहे, हा नियम प्रत्येकालाच माहिती आहे. त्यानंतरही एखादं काम करण्यासाठी लाच देण्याचे प्रकार घडत असतात. तसे प्रकार आपल्या मतदारसंघात घडू नयेत, यासाठी आ.डॉ. गुट्टे आग्रही आहेत. त्यामुळे त्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून आपली भूमिका स्पष्ट केली आहे. तसेच सर्वसामान्य नागरिकांची अडवणूक करणाऱ्या अधिकारी व दलालांना कडक भाषेत इशारा दिला आहे. परिणामी, सर्वसामान्य लोकांच्या प्रशासकीय कामांना गती येईल, अशीही अपेक्षा मतदारसंघातील नागरिक व्यक्त करीत आहेत. सरकारी वा खासगी क्षेत्रात कुठेही भ्रष्ट पद्धतीचा अंगिकार होणार नाही, हे पाहिले पाहिजे. लाच देणे किंवा घेणे थांबण्यासाठी संपूर्ण यंत्रणेत निष्पक्षपणा हवा. नियमांवर बोट ठेवून सर्वसामान्यांना त्रास देणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर अंकुश असायला हवा. तसेच सरकारी काम आणि सहा महिने थांब हाही प्रकार पूर्णपणे थांबला पाहिजे. सर्वसामान्यांची कामे करण्यासाठी गैरमार्ग अवलंबण्यातून लाचखोरी वाढते. ही पद्धत रोखण्यासाठी सर्वसामान्यांकडून प्रशासकीय यंत्रणांवर दबाव वाढल्यास लाचखोरी थांबेल. केवळ घोषणा करून लाचखोरी थांबणार नाही. त्यादृष्टीने सर्वसामान्यांनीही स्वतःची जबाबदारी ओळखली पाहिजे. कोणत्याही स्थितीत लाचखोरीस प्रोत्साहन देणाऱ्या गोष्टी टाळल्या पाहिजेत. तरची भ्रष्ट प्रवृत्तीवर आपसूकच नियंत्रण येईल. त्यामुळे कोणी अडवणूक करीत असेल, तर मला संपर्क साधा, असेही आवाहन आ.डॉ. गुट्टे यांनी मतदारसंघातील नागरिकांना केले आहे. एखाद्या घटनेमध्ये कलम १६१ आणि कलम १६५ नुसार दोषी व्यक्तीने वस्तू, पैसे किंवा तत्सम काही स्विकारल्याचे सिध्द झाल्यास त्याला शिक्षा होते. तसेच संबंधित व्यक्तीला लाच देणारी व्यक्ती सुध्दा कलम १६५ अ नुसार गुन्हेगार ठरतो. त्यामुळे अधिकारी व लाभार्थी यांनी आपल्यातला विवेक जागृत ठेवून शासकीय नियमांच्या चौकटीनुसार पारदर्शक व स्वच्छ कारभार करणे शासनाला अपेक्षित आहे. तसेच सरकारी कार्यालयांच्या बाहेर असणाऱ्या दलालांनी सुध्दा जनतेची पिळवणूक करता कामा नये. अन्यथा त्यांच्यावरही कडक कारवाई करण्यात येईल. शासनाचे लाभ, योजना आणि मोबदला योग्य त्या लाभार्थी वर्गाला भेटले पाहिजेत, हा कायम आग्रह असणार असल्याचेही आ.डॉ.गुट्टे यांनी स्पष्ट केले. दरम्यान, काही दिवसांपूर्वी आ.डॉ. गुट्टे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या प्रशासकीय आढावा बैठकीनंतर त्यांनी ही पोस्ट केल्यामुळे मतदारसंघातील अधिकारी आणि कर्मचारी यांच्याकडून त्या पोस्ट बद्दल तर्कवितर्क लावले जात आहेत. मात्र, त्या बैठकीत पारदर्शक व गतिमान कारभाराचा आग्रह धरणारे आ.डॉ.रताकर गुट्टे हे चांगलेच ॲक्शन मोडवर आल्याचे पाहायला मिळत आहे.




## संक्षिप्त वृत्त...

### परभणीत मराठा वधू-वर परिचय मेळावा



**परभणी,/प्रतिनिधी :** मराठा प्रवाह समन्वय समितीच्या वतीने २ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता मराठवाडा विभागीय वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमाची कार्यक्रम पत्रिका जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात १२ जानेवारी २०२५ रोजी जिजाऊ मंदिर वसमत रोड येथे संत, महंत व इतर मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आली. यावेळी ह भ प अच्युत महाराज दस्तापुरकर यांनी वधु वर परिचय मेळावे घेणे ही काळाची गरज असून या कार्यक्रमाचा जास्तीत जास्त मराठा बांधवांनी लाभ घ्यावा असे अहवाल याप्रसंगी करण्यात आले.

परभणी शहरात मराठा प्रवाह समन्वय समितीच्या वतीने गेल्या ६ वर्षापासून वधु वर परिचय मेळाव्याचे आयोजन केले जाते. या ७ व्या वर्षी २ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाची कार्यक्रम पत्रिका जिजाऊ जन्मोत्सवा निमित्त आयोजित कार्यक्रमत जिजाऊ मंदिरात १२ जानेवारी २०२५ रोजी ह भ प अच्युत महाराज दस्तापुरकर व ह भ प बालासाहेब महाराज मोहिते पाटील यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी वधू वर परिचय मेळावे व सामूहिक विवाह सोहळे ही काळाची गरज यासाठी आपण पुढे येणे गरजेचे असल्याचे मार्गदर्शन करताना सांगितले. यावेळी कार्यक्रम आयोजन समितीचे अध्यक्ष धाराजी भुसारे यांनी वधु वरांच्या पालकांनी आपल्या वधू-वरांची नाव नोंदणी करावी ही नोंदणी विनामूल्य असून प्रत्याक्षात परभणीत मराठा वधु वर परिचय कार्यालय, क्षीरसागर हॉस्पिटल बाजूला शिवाजीनगर परभणी येथे किंवा या ९८ २३ १२ ५२ २७, ९४ २१ ८७ ३१ ८३, ८६ ९८ ३८ ९० ५४ व ८० ० ७५ ८६ १० २ या नंबर वर आपल्या मुला मुलींचे बायोडाटा टाकून नोंदणी करून घ्यावी. गतवर्षी झालेल्या वधू वर परिचय मेळाव्यात वधु २५४ तर वरांच्या ५१५ नोंदी आल्या होत्या यात परभणी,हिंगोली, नांदेड, लातूर, उस्मानाबाद, बीड, जालना, संभाजीनगर सह विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रातील पालकांनी सहभाग नोंदविला होता. या कार्यक्रमात मराठवाडा विभागीय वधु वर परिचय मेळावा २०२५ चे सर्व आयोजन समितीचे सदस्य तसेच मराठा महासंघाच्या सर्व पदाधिकारी,सदस्यांनी सहभाग नोंदविला.

### युवा दिनानिमित्त विविध क्रीडा स्पर्धा

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्यावतीने



युवा दिनानिमित्त स्वामी विवेकानंद आणि माँ जिजाऊ यांना अभिवादन करण्यात आले.

युवा दिनानिमित्त विविध क्रीडा स्पर्धा या प्रियदर्शनी इंदिरा गांधी जिल्हा क्रीडा संकुल येथे संपन्न झाल्या. या कार्यक्रमाकरीता कविता नावंदे (जिल्हा क्रीडा अधिकारी), नानकसिंग बस्सी (क्रीडा अधिकारी) संजय मुंढे (क्रीडा मार्गदर्शक) रोहन औढेंकर (क्रीडा अधिकारी) रमेश खुणे (वरिष्ठ लिपीक) धनंजय बनसोडे (सचिव बॉक्सींग असो.) प्रदिप लटपटे (जिम्नॅस्टीक असो.) प्रकाश पंडित (बास्केटबॉल असो.) यांची उपस्थीती होती. कविता नावंदे यांनी यावेळी मार्गदर्शन केले. कार्यक्रमानंतर जिम्नॅस्टीक, बॉक्सींग आणि बास्केटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले व या स्पर्धेकरीता खेळाडुंनी मोठया उत्साहाने सहभाग नोदवला. कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता कार्यालयातील धिरज नाईकवाडे, योगेश आदमे, प्रकाश पंडित, विजय जोंधळे, सिध्दार्थ सावंत यांनी परिश्रम घेतले.

### सोनपेठ-शिर्डी पायी पालखीचे २५ जानेवारीला प्रस्थान होणार

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** सोनपेठ शहरातील श्री साई द्वारकामाई परिवाराच्यावतीने सोनपेठ ते शिर्डी पाई पालखी सोहळ्याचे याही वर्षी आयोजन करण्यात आले असून शनिवार २५ जानेवारी रोजी पालखीचे शिर्डीकडे प्रस्थान होणार आहे. साई पालखीचे हे ९ वे वर्ष आहे.

२५ जानेवारी सकाळी ८ वाजता शहराचे ग्रामदैवत हनुमान मंदिर, हनुमान चौक येथून पालखीचे प्रस्थान होणार असून सांगता शिर्डी येथे बुधवार ५ फेब्रुवारी रोजी होणार आहे. ११ दिवस चालणाऱ्या या पालखी सोहळ्यात अकरा मुक्काम असून चहा, नाश्ता, भोजनाची व्यवस्था भक्तांकडून करण्यात आली आहे.

२५ रोजी प्रस्थान होणाऱ्या साई पालखीची शहरातून मिरवणूक काढण्यात येणार असून पालखीचे खालील ठिकाणी मुक्काम असणार आहेत. संत तुकाराम महाराज मंदिर टाकळगव्हाण, छोटेवाडी, माऊली फाटा, शिरसदेवी, बाग पिंपळगाव, सुकळी, येवले वस्ती, कुकाणा, साईनाथ नगर, गोंदवणी, श्री स्वामी नित्यानंद गोविंद गिरीजी सिध्द आश्रम शिर्डी व साईबाबा मंदिर असा प्रवास राहणार आहे. पालखी सोहळ्यामध्ये सहभागी होणाऱ्या साई भक्तांनी २० जानेवारी पर्यंत ८७८८९२३१४०, ९४२३७३७७८४, ९४२१०८४४६६, ९४२०८८४८८८, ९०४९१७४२८५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन श्री साई द्वारकामाई परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

## संतोष अंधारे यांचे निधन; आज होणार अंत्यसंस्कार

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि पर्यवेक्षक संतोष बप्पा अंधारे यांचे सोमवार १३ जानेवारी रोजी हैद्राबाद येथील खाजगी रुग्णालयात ११.५८ वाजता निधन झाले. मृत्यूसमयी ते ४८ वर्षांचे होते.

गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते. त्यामुळे हैद्राबाद येथील एका खाजगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु होते. त्यातच त्यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, भाऊ, बहिण, पती, एक मुलगा, एक मुलगी, काका, काकू असा मोठा परिवार आहे. अंधारे यांचा मोठा मित्र परिवार होता. तसेच सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातही वावर होता. त्यांच्या निधनाने कुटूंबियांसह मित्र परिवारासही मोठा धक्का असला आहे. दरम्यान, त्यांच्या पार्थीवावर मंगळवार १४ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजता जिंतूर रस्त्यावरील वैकुंठधाम स्मशानभूमीत अंत्यासंस्कार करण्यात येणार आहेत.

दरम्यान संतोष अंधारे हे शहरातील नांदखेडा रोडवरील बेलेश्वर नृसिंह महाविद्यालय या ठिकाणी बऱ्याच दिवसापासून काम करित होते. याशिवाय त्यांचे परभणीतील सामाजिक, आर्थिक, राजकीय स्तरावर मोठे स्नेह संबंध होते. तसेच माजी आमदार सुरेश देशमुख यांचे ते स्वीय सहाय्यक म्हणून देखील काम पाहत होते. त्यांना मागील एक महिन्यापासून पोटाचा त्रास होता त्यामुळे त्या उपचारासाठी ते हैद्राबादला गेले होते परंतू उपचारा दरम्यानच त्यांचे निधन झाले.

## रुग्णवाहिकेच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**बाबासाहेब गर्जे**

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** तालुक्यातील शेळगाव येथे दि.५ जानेवारी रोजी रुग्णवाहिकेने उडवलेल्या दुचाकीस्वाराचा रविवारी उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. भरधाव वेगात व निष्काळजीपणे रुग्णवाहिका चालविणाऱ्या चालकाने दुचाकीस्वाराला जोरदार धडक दिल्याने हा अपघात घडला होता.



या प्रकरणी रुग्णवाहिका चालकावर सोनपेठ पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मयत दुचाकीस्वाराचे नाव भीमराव गोविंदराव चांदवडे (वय ६०) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ५ जानेवारी रोजी दुपारी २ वाजता भीमराव चांदवडे हे त्यांच्या एम.एच.२२ ए.बी.९२२७ क्रमांकाच्या दुचाकीने सोनपेठहून थडी-उक्कडगावकडे जात होते. शेळगावजवळ आले असता, भरधाव वेगात आलेल्या एम.एच.१४ सी.एल.०९६२ क्रमांकाच्या रुग्णवाहिकेने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.या धडकेत भीमराव चांदवडे गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला आहे.या घटनेच्या अनुषंगाने मयताचे नातेवाईक रवीराज चांदवडे यांनी सोनपेठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी रुग्णवाहिका चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक किरकण हे करत आहेत प्राथमिक तपासानुसार, रुग्णवाहिका चालक मद्यपान करून वाहन चालवत होता, त्यामुळे निष्काळजीपणे वाहन चालविल्यामुळे हा अपघात झाल्याचे बोलले जात आहे. घटनेनंतर स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. अनेकवेळा रुग्णवाहिका रुग्णांना दवाखान्यात सोडून येत असताना व मध्ये रुग्ण नसताना सुद्धा चालक रुबाबात सायरन वाजवत वेगाने रुग्णवाहिका चालवत असतात. अशावेळी सौजन्य दाखवत समोरील वाहन चालक रुग्णवाहिकेला रस्ता मोकळा करून देतात. परंतू आतमध्ये रुग्ण नसताना वाहन शिस्तीत चालवणे गरजेचे असते.परंतू नियमांचे पालन न करणाऱ्या अशा वाहनचालकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे. तसेच अशा घटनांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने रुग्णवाहिका चालकांना कठोर नियम घालून देण्याची गरज आहे.

## काळ्या बाजारात विक्रीसाठी साठवून ठेवलेला ३०० क्विंटल तांदूळ जप्त

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी :** घेवंडा रस्त्यावरील एका पत्र्याच्या गोडाऊनवर उपविभागीय पोलीस अधिकारी जीवन बेनिवाल यांच्या मार्गदर्शनाखाली शहर पोलीस पथकाने धाड टाकली. याठिकाणी अंदाजे ३०० क्विंटल स्वस्त धान्य दुकान मार्फत वाटप करण्यात येणाऱ्या तांदुळाचा साठा आढळून आला.

पोलिसांनी तांदूळ साठा जप्त करून गोडाऊनला तहसीलदारांनी सील ठोकले. तालुक्यात स्वस्त धान्याचा काळाबाजार करणारी एक मोठी साखळी कार्यरत आहे. दि.७ जानेवारी रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास उपविभागीय पोलीस अधिकारी जीवन बेनिवाल यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार देशपांडे,



जमादार गणपत मुरकुटे, दुधाटे, धोत्रे, कांबळे येलदरी रस्त्यावर गस्त घालत असतांना समोरून एक ट्रक भरधाव वेगाने जात असल्याचे दिसून आले. पोलिसांनी थांबवण्याचा प्रयत केला असता ट्रक चालकाने तो घेवंडा रस्त्याने पळवला. पोलीस पथकाने त्याचा पाठलाग केला असता एका शेतात पत्र्याचे गोडाऊन जवळ आढळून आला. पोलिस पत्र्याच्या आखाडयावर गेले असता त्यांना स्वस्त धान्य वितरण प्रणाली मार्फत लाभार्थ्यांना वितरित करण्यात येणाऱ्या तांदळाचे रिकामे पोते दिसून आले. शेतमजुरास विचारपूस केली असता त्याने संबंधित शेत मालक, तांदूळ कोणी साठवून ठेवले त्यांची नावे पोलिसांना सांगितली. यानंतर जमादार मुरकुटे यांनी वरिष्ठ पोलीस अधिकारी व महसूल अधिकाऱ्यांना माहिती दिली. या माहिती वरून रात्री उशिरा तहसीलदार राजेश सरवदे व महसुल पथकाने घटनास्थळी धाव घेऊन गोडाऊन मधील तांदळाचे नमुने घेऊन ते प्रयोग शाळेला पाठवले असून गोडावूनला सील ठोकण्यात आले. प्रयोग शाळेचा अहवाल आल्यानंतर योग्य ती कार्यवाही केली जाईल असे तहसीलदार सरवदे यांनी प्रसारमाध्यमांना बोलतांना सांगितले.

## शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्थेत जिजामाता जयंती साजरी

**सेलू,/प्रतिनिधी-** शहरातील शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत जिजामाता जयंती व स्वामी विवेकानंद जयंती निमित्त राष्ट्रीय यूवा दिन रविवार १२ रोजी साजरा करण्यात आला.



यावेळी गोविंद काष्टे,जयसिंग शेळके ,रामेश्वर गटकळ,राहूल लव्हांडे,प्राचार्य लोढें डी.एच यांची उपस्थिती होती .यावेळी मान्यवरांनी उपस्थित प्रशिक्षणार्थी यांना राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचे कार्य व विचार तसेच भविष्यात आयटीआय प्रशिक्षणाच्या संधी याबद्दल मार्गदर्शन केले.तसेच यूवा दिनानिमित्त आयोजीत विविध स्पर्धेत प्राविण्य मिळवलेल्या प्रशिक्षणार्थ्यांचा प्रशस्तीपत्र देवून सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमासाठी के.ए.ब्रम्हपूरकर,बि.डी.वळसे,एस.सी .कासार,पी.एस.जोशी,श्रीमती एम.एस. सातारकर,सविता गादेवाड,प्रथम सूर्यवंशी,सय्यद हनिफ,शेख सलिम सह सर्व कर्मचारी व प्रशिक्षणार्थी यांनी पूढाकार घेतला.

## भारतीय संस्कृतीचे जतन व्हावे- पंडित भगरे गुरुजी

**संपत तेली**

**पूर्णा,/प्रतिनिधी-** गाय,गंगा,गायत्री व गीता हे भारतीय संस्कृतीचे मानबिंदू आहेत .त्याचे जतन करावे.आजच्या काळात नद्यांचे प्रदूषण गंभीर समस्या बनली आहे.प्रत्येक गंगा स्वच्छ असली पाहिजे,अशी अपेक्षा भागवतभूषण ज्योतिषाचार्य पंडित अतुलशास्त्री भगरे गुरुजी यांनी व्यक्त केली. श्री क्षेत्र धनगर टाकळीत आयोजित भागवत कथा ज्ञान यज्ञात ते बोलत होते.सर्वांचं कल्याण व्हावे हाच विचार भारतीय संस्कृतीचे महानपण दर्शवितो. वयोवृद्ध,ज्ञानवृद्ध व तपोवृद्ध व्यक्तींना सन्मान देणारी ही संस्कृती आहे.भक्ती,ज्ञान व वैराग्य या गुणांनी ओतप्रोत असलेला महान ठरतो .असे व्यक्तिमत्व म्हणजे श्री शुकदेव महामुनी.त्यांनी भागवत कथेचा अन्वयार्थ उलगडून सांगितला.हा धर्मोपदेश जनकल्याणाची दिशा देणारा होय,असे भाष्य श्री भगरे गुरुजींनी केले. इंद्रियांचे दमन करतात ते कर्दम असा विग्रह करीत कर्दम ऋषीची कथा सांगताना त्यांनी सध्याच्या सण समारंभातील विकृत स्वरूप व विवाहातील अनिष्ट परंपरावर टीका केली.विवाह हा सोहळा होऊ नये तर तो संस्कार म्हणून साजरा करावा.ध्रुव बाळाच्या कथेतून मातांनी बालक संस्कारात योगदान देण्याची,संस्कृती रक्षणाची आवश्यकता प्रतीपादित केली.

दरम्यान,भागवत कथेत संगीत वादक व गायकांची प्रभावी साथ लाभत आहे.त्यात व्यासपीठावर श्री रवींद्र जोशी गुरुजी,अंध कलावंत व्हायोलिन वादक श्री पवार काका,राजकुमार मखवाना,श्री गंगाधरराव ,मिलिंद मराठे हे भगवद् कथेत सहकार्य करीत आहेत.






# मकर संक्रांतीनिमित्त बाजारपेठ फुलली




आज साजरा होणाऱ्या मकर संक्रांतीनिमित्त बीड शहरातील बाजारपेठेत हळदी कुंकू, तिळगूळ, सुगडे आदी साहित्य खरेदी करण्यासाठी महिलांनी मोठी गर्दी केली होती. (छाया-श्रीकांत कुलकर्णी)

# वाल्मीक कराडवर 'मकोका' लावण्याच्या मागणीसाठी धनंजय देशमुख यांच्यासह गावकरी पाण्याच्या टाकीवर

## मनोज जरांगे यांच्या विनंतीनंतर आंदोलन मागे



**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१३ जानेवारी**

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडाशी निगडीत खंडणी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या वाल्मीक कराडवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यासाठी मस्साजोगचे ग्रामस्थ चांगलेच आक्रमक झालेत. मयत संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी ग्रामस्थांसह गावातील पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन सुरू करत स्वतःला संपवून घेण्याचा इशारा दिला आहे. धनंजय देशमुख यांनी आंदोलन करताना पाण्याच्या टाकीची शिडी काढून टाकली. मस्साजोगच्या ग्रामस्थांनी आज मोबाईलच्या टॉवरवर चढून आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. पण पोलिसांनी या टॉवरच्या भोवती प्रचंड बंदोबस्त लावल्यामुळे या ग्रामस्थांनी अचानक पाण्याच्या टाकीवर आंदोलन करण्यात आले.

खंडणीमुळे माझ्या भावाचा खून झाला. त्यामुळे खंडणीमधील गुन्हेगारांवर हत्येचा गुन्हा दाखल केला जावा. पुरावे असूनही त्यांना या प्रकरणी त्यांना आरोपी केले जात नाही. पोलिसांना पुरावे सांगितलेत, कोणी कोणाला कसा फोन केला अशा बऱ्याच घटना पोलिसांना सांगितल्यात. पण त्याचा कोणताही फायदा झाला नाही. पोलिस आरोपींना वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत. तपासात कुचराई करत आहेत. त्यांना विष्णू चाटे यांचा मोबाईल अद्याप हस्तगत करता आला नाही. ते आम्हाला तपासाची माहितीही देत नाहीत. या प्रकरणी काहीतरी लपवण्याचा प्रयत्न सुरू आहे, असे संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी केला आहे. दरम्यान, मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी सकाळीच मस्साजोगकडे धाव घेतली. बीडचे पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत हे देखील घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी संतप्त महिलांनी पोलिसांना बांगड्या दाखविल्या. अखेर मनोज जरांगे पाटील आणि एसपी कॉवत यांनी मोबाईलवरून वांरवार देशमुख यांच्याशी बातचीत करून त्यांचे मनपरिवर्तन केले. त्यानंतर धनंजय देशमुख आणि त्यांचे सहकारी पाण्याच्या टाकीवरून खाली उतरले. या घटनेमुळे सकाळपासून मस्साजोग मध्ये अतिशय तणावाचे वातावरण आहे.

# गोकुळ शिशुवाटिकेत आजी आजोबा मेळावा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ जानेवारी**

दीनदयाल शोध संस्थान संचालित गोकुळ शिशुवाटिकेत आजी आजोबा मेळावा उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम नानाजी देशमुख व दीनदयाल उपाध्याय यांच्या फोटोला पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले.त्यानंतर ध्रुव गटाच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले. गोकुळ शिशुवाटिका प्रमुख सौ.स्नेहलताई देशपांडे यांनी गोकुळ शिशुवाटिकेची माहिती देत प्रास्ताविक सादर केले. व आजी आजोबांचा परिचय देण्यात आला. व प्रमुख व्याख्याते म्हणून जन शिक्षण संस्थान चे संचालक गंगाधर देशमुख सर यांनी व्याख्यान देताना सांगितले कुटुंबात संवाद असेल तर कुटुंब चांगले राहते. सर्वांना गुंफवण्याचे काम करणार विद्यापीठ आजी आजोबा होय. कार्यक्रमासाठी लाभलेले प्रमुख पाहुणे गोविंद रामदासी सर जि.प.केंद्रप्रमुख यांनी आजी आजोबांना व्याख्यान देतांना कुटुंबात आजी आजोबाचे स्थान, वृद्धाश्रम वाढण्याचे कारण याबद्दल सांगितले.

स्वच्छंद गटातील काही विद्यार्थ्यांनी व आजी आजोबा यांच्या प्रोजेक्टरद्वारे व्हिडीओ क्लिप दाखवण्यात आले.व नंतर आजी आजोबांचे मनोगत घेतले.गोकुळ शिशुवाटिका समिती सदस्या सुनंदाताई कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप केला.नंतर आजी आजोबांसाठी चिठ्ठी खेळ घेण्यात आला.त्यामध्ये मुख आभिनय,प्राण्यांचे आवाज, अभंग, गवळणी, गोष्ट आभिनय,बडबड गीत म्हणा.या खेळात आजी आजोबांनी उत्साहात भाग घेतला. व नंतर नाष्टावाटप करण्यात आला. या कार्यक्रमासाठी नानाजी देशमुख विदयामंदीराच्या प्रभारी मुख्याध्यापिका सौ.अर्चनाताई मोराळे उपस्थित होत्या.या कार्यक्रमाचे मार्गदर्शन डॉ.सीमाताई जोशी, सौ.अर्चनाताई तुंगार यांचे लाभले.सुत्रसंचालन सौ.स्वातीताई देशपांडे आभार सौ.क्रांतीताई पोरवाल यांनी केले. कार्यक्रमाचा शेवट नमो मातृभूमी या प्रार्थनेने झाला. अशा पद्धतीने आजी-आजोबा मेळावा हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.



# संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालय राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१३ जानेवारी**

श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालय जायकवाडी वसाहत बागपिंपळगाव या शाळेत राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे सरपंच रामेश्वर जगताप हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून बेलगाव व बागपिंपळगाव सेवा सोसायटी चेअरमन जनार्धन आप्पा चितळकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीनिवास देवकते, जि.प केंद्रीय शाळेचे मुख्याध्यापक तथा केंद्र प्रमुख नामादेव शिंदे सर, गणेश मुगूटराव, भागवत साकळे, अभिमन्यू ठोंबरे, हैसाबाई कांबळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात शाळेतील ५वी ते १० वी वर्गातील कल्याणी गोरे, श्रध्दा बळवंते, सोनल पडुळे, अश्विनी देवकते, दिपाली माळी, वैशाली देवकते, कल्याणी देवकते, वक्ते, श्रुती मुगूटराव, अमृता सुरकुंडे, साक्षी कोळेकर, सिध्दी खटावकर, शिवाणी माळी आदी विद्यार्थ्यांदी यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या विषयी आपल्या शब्दात आपले विचार केले. तर काही विद्यार्थ्यांनी गिताव्दारे जिजाऊ माँ साहेब यांच्या जिवन कार्यक्रमाबद्दल माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे म्हणाले शिवरायांचं चरीत्र हे फक्त ढाल, तलवारी अन् घोड्यांच्या टापा नाहीत तर सर्वसामान्यांना जिवन जगण्यासाठी सगळ्यात मोठा शिवमंत्र आहे. शिवरायांना घढविणाऱ्या ह्या जिजाऊ माँ साहेब आहेत. त्याच प्रमाणे आपल्या आई वडिल व गुरुजनांकडून चांगले धडे घेऊन हे चांगले विचार आपल्या जीवनात आचरणात आणावे तसेच गेली अनेक वर्षांपासून शेतकरी समृद्ध होत नाही. याची कारण शेतकऱ्यांच्या मुलांनी शोधून काढली पाहिजेत शेतकरी गरीबीतून बाहेर कसा येईल याचा विचार केला पाहिजे. त्याच प्रमाणे स्वामी विवेकानंद यांचे विचार आत्मसात करून देश कार्य करावे असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक बापुराव घुले यांनी केले. या प्रास्ताविकपर भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना राजमाता जिजाऊ यांच्या शोर्य व हुशारी यांच्या बद्दल सांगून स्वामी विवेकानंद यांच्या जिवन चरित्रावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनुजा ठोंबरे यांनी केले. तर आभार मुक्ताबाई मोटे यांनी व्यक्त केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक बापुराव घुले, भागवत सोळुंके, अंजली माने, मुक्ताबाई मोटे, मयुर येवलेकर, नवनाथ घुगे, हरिभाऊ आघाव, वर्षा कांडेकर, योगेश म्हैसनवाड, प्रसाद कुलकर्णी, शिवाजी पवार, गोरख साकळे, बाबासाहेब कांबळे, ज्ञानेश्वर बास्टे आदींनी परिश्रम घेतले.



# पंतप्रधान नरेंद्रजी मोदींकडून भारतीय संविधानाचा गौरव-सामाजिक कार्यकर्ते भिकुजी दादा इदाते

# दीनदयाळ बँकेच्या युगपुरूष स्वामी विवेकानंद व्याख्यानमालेचा समारोप

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१३ जानेवारी**

दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही १० जानेवारी ते १२ जानेवारी २०२४ या कालावधीत तीनही दिवस युगपुरूष स्वामी विवेकानंद यांच्या १६२ व्या जयंतीनिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले होते. या प्रबोधनपर व्याख्यानमालेचा समारोप रविवार, दि.१२ जानेवारी रोजी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भिकुजी दादा इदाते (दापोली) यांच्या 'सामाजिक आचारसंहितेची गाथा - संविधान' या विषयावरील व्याख्यानाने झाला.

कार्यक्रमाची सुरूवात भारतमाता, राजमाता जिजाऊ माँ साहेब, युगपुरूष स्वामी विवेकानंद, पंडित दीनदयाळजी उपाध्याय यांच्या प्रतिमापूजन आणि दीपप्रज्ज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर बँकेच्या वतीने मान्यवरांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर प्रमुख व्याख्याते म्हणून भिकुजी दादा इदाते (दापोली), कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध साहित्यिक प्रभाकरराव साळेगावकर (माजलगाव), सामाजिक कार्यकर्ते विजयराव वाकेकर (परळी वैजनाथ), बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की, उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख, संचालक सर्वश्री रा.गो.धाट, संचालिका शरयूताई हेबाळकर, इंजि.बिपीन क्षीरसागर, मकरंद कुलकर्णी सोनेसांगवीकर, प्रा.अशोकराव लोमटे, प्रा.जयकरण सुरेशकांबळे, बाळासाहेब देशपांडे, तज्ज्ञ संचालक ॲड.अशोक कुलकर्णी व मुख्यकार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. तृतीय पुष्प गुंफताना ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भिकुजी दादा इदाते यांनी सांगितले की, स्वामी विवेकानंद यांनी पारतंत्र्यात असलेल्या तत्कालीन समाजात स्फुल्लिंग फुलविले. तर लाल-बाल-पाल यांनी पारतंत्र्यातील भारतात जागृती निर्माण केली. योगी अरविंद, स्वामी दयानंद सरस्वती यांनी देशाच्या एकात्मतेचं चित्र उभे केले. लोकमान्य टिळकांनी शिवजयंती व गणेशोत्सवातून समरसतेचा प्रयोग केला. होमरूल लीगच्या माध्यमातून डॉ.ॲनी बेझंट व लोकमान्य टिळकांनी समविचारी मंडळींशी चर्चा करून सर्वांच्या सामुहिक प्रयत्नांतून १८९५ मध्ये भारतीय संविधानाची १११ कलमं तयार केली. पुढे या सर्व कलमांना 'स्वराज बील' असे संबोधले गेले. या कलमांचा समावेश सध्याच्या भारतीय संविधानात महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केला. महात्मा फुले, गोपाळ गणेश आगरकर, विष्णूशास्त्री चिपळूणकर, दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, राजाराम मोहन रॉय, डॉ.केशव बळीराम हेडगेवार या सर्व महनिय व्यक्तीमत्वांनी त्यांच्या संपूर्ण आयुष्यात भारतीय समाजाच्या उत्थानासाठी विविध सामाजिक आणि विधायक प्रयोग केले. संविधान निर्मिती प्रक्रियेत अतिशय बुद्धिमान, तेजस्वी व्यक्तिमत्त्व असलेल्या १५ महिलांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात आला होता. त्यांचे ही महत्वपूर्ण योगदान आहे. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वसमावेशक सर्वसमाज घटकांना न्याय मिळवून देणारे भारतीय संविधान देशाला अर्पण केले. या संविधानात घटनात्मक अधिकार (फंडामेंटल राईट) बहाल करण्यात आले. दिवंगत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी भारतीय संविधान निर्माते महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचे कायमच स्मरण ठेवले. तर विद्यमान पंतप्रधान नरेंद्रजी मोदी हे भारतीय संविधानाला 'धर्म ग्रंथ' मानतात. त्यामुळे संविधान, घटना बदलणार असा विरोधकांचा अपप्रचार आहे. हा फेक नरेटिव्ह आहे. असे कदापि ही होणार नाही. आपण भारताचे जबाबदार नागरिक आहोत. त्यामुळे आपण सर्वांनी भारतीय संविधानाचा लौकिक वाढेल असे साजेसे कार्य करावे, या कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदींकडून भारतीय संविधानाचा वेळोवेळी गौरव करण्यात येत आहे. याचे दाखले देत, सांस्कृतिक, ऐतिहासिक संदर्भ देत दादा इदाते यांनी विषयाची अभ्यासपूर्ण मांडणी केली. सुमारे १५० वर्षांचा कालखंड उभा केला. यावेळी बोलताना सुप्रसिद्ध साहित्यिक प्रभाकरराव साळेगावकर यांनी संविधान हे प्रत्येक भारतीयांच्या जगण्याचा भाग बनले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली. अध्यक्षीय भाषणात जाती अंताची लढाई पुन्हा एकदा लढावी लागेल, प्रत्येकाने संविधानाचे पालन करावे, हक्क आणि कर्तव्य एकत्र नांदले पाहिजेत असे ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा म्हणाले. तर समारोपपर मनोगत व्यक्त करताना बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की यांनी सांगितले की, दीनदयाळ बँक एक परिवार म्हणून आम्ही काम करीत आहोत. उत्तम टीमवर्क करून ३१ डिसेंबर २०२४ अखेरपर्यंत ५२२ कोटींच्या ठेवींचा टप्पा पूर्ण केला आहे. एकूण व्यवसायाचा ८५३ कोटींचा पल्ला ही गाठला आहे. लवकरच ३१ मार्च २०२५ अखेरपर्यंत १००० कोटी रूपयांच्या व्यवसायाचे लक्ष्य बँकेने समोर ठेवले आहे. लवकरच ते ही साध्य होईल. आर्थिक क्षेत्रात कार्य करीत असताना सामाजिक बांधिलकी जोपासत समाजाचे आपण काही देणे लागतो. याच जाणिवेने बँकेने मागील २२ वर्षांपासून एक वसा जोपासला आहे. व्याख्यानमालेच्या माध्यमातून वैचारिक स्थिती सुधारावी, खरा इतिहास लोकांसमोर यावा, यासाठी दीनदयाळ नागरी सहकारी बँकेने कोविड काळासह अव्याहतपणे हे कार्य सुरू ठेवले आहे. या उपक्रमाचे हे २३ वे वर्ष आहे. या उपक्रमांतर्गत आजपावेतो सदर व्याख्यानमालेत विविध क्षेत्रातील ६६ मान्यवर व्यक्तींनी रसिकांना वैचारिक मेजवानी देवून वेळोवेळी आपले अनमोल विचार मांडले आहेत. अशी माहिती अध्यक्ष ॲड.पत्की यांनी दिली. सुरूवातीला पाहुण्यांचा परिचय बँकेचे संचालक ॲड.अशोकराव कुलकर्णी व संचालक प्रा.जयकरण सुरेशकांबळे यांनी करून दिला. सुत्रसंचालन संचालक मकरंद कुलकर्णी सोनेसांगवीकर यांनी केले. तर उपस्थितांचे आभार उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख यांनी मानले. आनंदकुमार देशपांडे यांनी वैयक्तिक पद्य सादर केले. वंदे मातरम या राष्ट्रगानास १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल संचालिका सौ.शरयुताई हेबाळकर यांच्या संपुर्ण वंदे मातरम् च्या गायनाने व्याख्यानमालेचा समारोप झाला. व्याख्यानमालेच्या तीनही दिवस अंबाजोगाईच्या विविध क्षेत्रातील मान्यवर, माता, भगिनी, ज्येष्ठ नागरिक, रसिक श्रोते आणि युवक वर्गाने सहकुटूंब सहपरिवार उपस्थित राहून युगपुरूष स्वामी विवेकानंद व्याख्यानमालेचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या वतीने पुढाकार घेण्यात आला.



# कारेगवहण येथे यात्रा उत्सवानिमित्त कुस्त्याचा कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ जानेवारी**



बीड तालुक्यातील कारेगवहण येथे ग्रामदैवत बिरुबा देवाच्या यात्रा उत्सवानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले असुन या यात्रा उत्सवाचा आणि कुसतयाचया कार्यक्रमांचा भाविक भक्तांनी व कुस्ती शौकीनानी लाभ घ्यावा असे आवाहन कारेगवहण ग्रामस्थांनी केले आहे या बद्दल अधिक माहिती अशी की बीड तालुक्यातील कारेगवहण येथे ग्रामदैवत बिरुबा देवाच्या यात्रा उत्सवानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले असुन मंगळवारी दि १४ जानेवारी रोजी संध्याकाळी संदलाचि मिरवणूक निघेल बुधवारी दि १५ जानेवारी ताज्या यात्रेनिमित्त ग्रामदैवत बिरुबा देवाच्या पालखीची वाजत गाजत भंडाराची उधळण करीत ढोलताशांच्या गजरात मिरवणूक निघेल रात्री गोंधळी गीते आणि लोकनाट्य तमाशा मंडळाचा मनोरंजनात्मक कार्यक्रम होणार आहे दि १६ जानेवारी गुरुवारी या यात्रा उत्सवानिमित्त भव्य कुसतयाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे कुस्ती विजेतयास योग्य प्रकारचे बक्षीस देण्यात येणार आहे तरी या यात्रा उत्सवाचा भाविक भक्तांनी व कुस्ती शौकीनानी लाभ घ्यावा असे आवाहन कारेगवहण ग्रामस्थांनी केले आहे.

# हिंगोलीची वाटचाल बीडच्या दिशेने

## उबाठाचे संपर्क प्रमुख बबनराव थोरात यांचा आरोप



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ जानेवारी**
सध्या राज्यात बीड जिल्ह्यातील संतोष देशमुख हत्याकांड प्रकरण चांगलेच गाजत आहे. बीड जिल्ह्यातील परिस्थिती हा सध्याचा गंभीर विषय बनला आहे. हिंगोली जिल्ह्यातही फार काही वेगळी परिस्थिती नाही. यासंदर्भात उबाठा शिवसेनेच्यावतीने आवाज उठविण्यात येणार असून मुख्यमंत्र्यांनी याकडे लक्ष देण्यासाठी दि १६ जानेवारी रोजी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात येणार असल्याची माहीती जिल्ह्याचे संपर्क प्रमुख बबनराव थोरात यांनी पत्रकार परिषदेत दिली.

विधानसभा निवडणुकीच्या नंतर प्रथमच उबाठा शिवसेनेची पक्ष संघटना, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या अनुषंगाने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या दौऱ्यात संपर्क प्रमुख बबनराव थोरात यांनी दोन दिवस जिल्ह्यातील तालुक्यांचा आढावा घेतला. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी जोमाने कामाला लागण्याचे आदेश देण्यात आले.

बैठकीनंतर संपर्क प्रमुख बबनराव थोरात यांनी पत्रकारांशी संवाद साधला. लोकसभा निवडणुकीत आम्हाला भरभरून यश मिळाले. त्यानंतर पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत लोकसभेच्या तुलनेत आम्हाला मतदान जास्त मिळाले परंतु काही कारणांमुळे आम्हाला विजय मिळवता आला नाही. खचून न जाता शिवसेना पुन्हा जोमाने कामाला लागली असून येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आमच्याच पक्षाचा भगवा फडकविण्यासाठी सज्ज झालो आहोत असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी माजी आ. डॉ संतोष टारफे यांनी जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध धंद्यावर प्रकाश टाकतांना हिंगोलीची परिस्थिती बीड सारखी बनत चालली आहे. रेती माफीया, जुगार अवैध धंदे एवढेच नव्हे तर खून आणि गोळीबाराचे प्रकार देखील वाढत चालल्यामुळे यावर मुख्यमंत्री यांनी लक्ष देऊन जिल्ह्याची परिस्थिती सुधारावी अशी मागणी केली.

माजी खा ॲड शिवाजीराव माने यांनी हाच मुद्दा धरीत कठोर शब्दांमध्ये टीका करतांना मुख्यमंत्र्यांना महाराष्ट्रातल्या या परिस्थितीकडे लक्ष द्यायला वेळ आहे की नाही असा सवाल देखील केला. यावेळी जिल्हाप्रमुख गोपू पाटील, राजेश पाटील गोरेगावकर, वसीम देशमुख, विनायक भिसे, परमेश्वर मांडगे, तानाजी जाधव, सुनील काळे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**खा नागेश पाटील आष्टीकराविरोधात शिवसैनिकांचा रोष**
जिल्ह्यातील संघटनेचा आढावा घेण्यासाठी संपर्क प्रमुख बबनराव थोरात आले असता त्यांच्यासमोरच जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी खासदार नागेश पाटील आष्टीकर यांच्या विरोधात चांगलीच खदखद व्यक्त केली. लोकसभा निवडणुकीत शिवसैनिकांनी विजयासाठी जीवाचे रान केले. परका उमेदवार लादल्यानंतरही शिवसैनिकांनी निष्ठेने काम करीत प्रत्येक विधानसभा मतदारसंघातून मताधिक्य दिले. परंतु विजयी झाल्यानंतर विधानसभा निवडणुकीत बोटांवर मोजण्या इतक्या सभांमधून खा आष्टीकरांनी उपस्थिती लावली. विधानसभा निवडणुकीत पक्षाचा दारूण पराभव झाला. एकही आमदार कार्यकर्त्यांना आधार देण्यासाठी जिल्ह्यात राहीला नाही. अशा परिस्थितीत एकमेव लोकप्रतिनिधी म्हणून शिवसैनिक आष्टीकरांकडे डोळे लावून बसले आहेत. शिवसैनिकांचे फोन उचलले जात नाहीत अशी खदखद शिवसैनिकांनी संपर्क प्रमुख बबनराव थोरात यांचेकडे मांडली.



**हिंगोली– येथील जिल्हा परिषदेत पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्यावतीने जिल्हास्तरीय पाणी गुणवत्ता विषयक प्रशिक्षाचे आयोजन करण्यात आले होते. छाया– विजय गुंडेकर**

# धार्मिक स्थळाजवळ लघुशंका केल्यावरून गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ जानेवारी**
कळमनुरी तालुक्यातील नांदापूर येथे धार्मिक स्थळासमोर लघुशंका केल्याच्या कारणावरून काहीकाळ तणाव निर्माण झाला होता. मात्र पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्यानंतर परिस्थिती नियंत्रणात आली. याप्रकरणी एका तरूणाविरूध्द कळमनुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार कळमनुरी तालुक्यातील नांदापूर येथे एका धार्मिक स्थळासमोर गावातील सय्यद सलीम या तरूणाने रविवारी दि १२ रोजी रात्री लघुशंका केली. सदर प्रकार गावकऱ्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी सलीम यास जाब विचारला. त्यानंतर त्याला त्याच्या घरी नेऊन सोडण्यात आले. मात्र काही वेळानंतर तो पुन्हा घटनास्थळाजवळ येऊन अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करू लागला. या प्रकारामुळे गावकरीही संतप्त झाले. अनेक गावकरी घटनाजवळी एकत्र आले. गावात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माणहोण्याची शक्यता असल्याने काही गावकऱ्यांनी तातडीने कळमनुरी पोलिसांना घटनेची माहीती दिली. या घटनेची माहीती मिळताच पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी तातडीने अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, पोनि मोहन भोसले, सपोनि हनुमंत भिंगारे, सपोनि शेवाळे यांच्यासह पोलिसांचे पथक घटनास्थळी रवाना केले. पोलिसांनी सय्यद सलीम यास ताब्यात घेतले यावेळी गावकऱ्यांनी त्याला आमच्या ताब्यात द्या अशी मागणी करून पोलिसांची गाडी अडवली. गावकऱ्यांच्या रोष वाढत असल्याचे लक्षात येताच अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांनी गावकऱ्यांशी संवाद साधून त्यांची समजूत काढली. त्यानंतर परिस्थिती नियंत्रणात आली. दोन ते अडीच तासांच्या चर्चे नंतर सय्यद सलीम यास पोलिसांनी कळमनुरीला आणले. याप्रकरणी जमादार सतीश शेळके यांच्या तक्रारीवरून सय्यद सलीम याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# जांभरून फसवणूक प्रकरणाची व्याप्ती वाढणार, पोलिसांकडून आरोपीचा शोध सुरू

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ जानेवारी**
सेनगाव तालुक्यातील जांभरून येथे तरूणांना शासकीय सेवेत नोकरी लावण्याचे आमिष दाखवून फसवणुक केल्या प्रकरणाची व्याप्ती वाढण्याची शक्यता पोलिस विभागाच्या सुत्रांनी व्यक्त केली आहे. फसवणुक झालेल्या तरूणांची संख्या १५ पेक्षा जास्त असून ४५ लाख रूपयांची फसवणुक झाल्याची शक्यताही पोलिसांनी व्यक्त केली आहे. त्यानुसार आता नर्सी नामदेव पोलिसांनी आरोपीचा शोध सुरू केला आहे.

सेनगाव तालुक्यातील जांभरून आंध येथील तरूणांना शासकीय नोकरी लावण्याचे आमिष दाखवून त्यांची फसवणूक केल्याचा प्रकार पुढे आला आहे. ग्रामसेवक, तलाठी, आदिवासी विकस विभागात नोकरी लावण्याचे आमिष दाखवून गजानन बाबर पाटील या व्यक्तीने १६लाख रूपयांची फसवणूक केल्याप्रकरणी नर्सी नामदेव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांनी नर्सी नामदेव पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक बद्रीनाथ सानप, उपनिरीक्षक जाधव यांना तपासाबाबत आवश्यक सूचना दिल्या आहेत. याशिवाय सायबरसेलची मदत घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या आहेत.

दरम्यान, पोलिसांनी घेतलेल्या प्राथमिक माहीतीमध्ये फसवणुक प्रकरणाची व्याप्ती वाढण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. या परिसरातील सुमारे १५ पेक्षा अधिक तरूणांची सुमारे ४५ लाख रूपयांची फसवणुक झाल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. त्यानुसार परिसरातील गावामधून अधिक माहीती घेण्यास सुरूवात करण्यात आली आहे. दुसरीकडे पोलिसांचे पथक आरोपीचा शोध घेत असल्याचे सुत्रांनी सांगितले आहे.



**हिंगोली– येथील नगर परिषद कार्यालयात घरपट्टी, नळपट्टी तसेच इतर मालमत्ता करासंदर्भात मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांनी आढावा बैठक घेतली. यावेळी वसुली पथकांनी जास्तीत जास्त कर वसुली करण्याचे आदेश मुंढे यांनी दिले. यावेळी अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### जिजाऊ जयंतीनिमित्त पुस्तकांचे वाटप



हिंगोली– राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती निमित्त राजमाता जिजाऊ पुस्तकाचे वितरण आई जगदंबा उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले. राजमाता जिजाऊ यांचा जिवनपट लहान बालक व युवकात पोहचावा हा उद्देश ठेवून पुस्तकांचे वाचन संस्कार उपक्रम राबविण्यात आला. हिंगोली येथील एनटीसी परिसरातील छत्रपती शिवाजी राजे उद्यानात आई जगदंबा नवरात्र उत्सव समिती च्या वतीने रविवार दि. १२ जानेवारी रोजी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती महोत्सव संपन्न झाला. यावेळी राजमाता जिजाऊ यांच्या पुतळ्याला व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या नंतर राजमाता जिजाऊ यांच्या पुस्तकांचे वितरण करण्यात आले. यावेळी समिती पदाधिकारी, समिती सदस्य, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### व्हीजेएनटी सेनेच्या जिल्हा प्रमुखपदी राठोड



हिंगोली– बाळासाहेब भवन मुंबई येथे शिवसेना ओबीसी व्हीजेएनटी सेनेच्या कार्यकर्त्यांची पदाधिकाऱ्याची बैठक रविवार दि १३ जानेवारी रोजी पार पडली. येथील स्वप्निल उर्फ बंटी राठोड यांची शिवसेना ओबीसी व्हीजेएनटी सेनेच्या हिंगोली जिल्हा प्रमुखपदी निवड करण्यात आली. निवडीचे पत्र देखील देण्यात आले. निवड पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेळी मेंढी विकास महामंडळ उपाध्यक्ष तथा शिवसेना ओबीसी भटके विमुक्त सेनेचे प्रदेशाध्यक्ष तथा बाळासाहेब किसवे यांनी दिले. यावेळी आमदार निलेश राणे, राज्य समन्वयक मारुती जानकर, राज्य प्रसिद्धी प्रमुख संजय कुसळकर, अनिल धमने पाटील, सचिन धायगुडे आदी पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

# लोक आंदोलन न्यासच्या जिल्हाध्यपदी ज्ञानेश्वर धायगुडे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ जानेवारी**
लोक आंदोलन न्यासच्या हिंगोली जिल्हाध्यक्षपदी डॉ. ज्ञानेश्वर धायगुडे यांची पुनर्नियुक्ती करण्यात आली. राळेगणसिद्धी येथे संस्थापक अध्यक्ष अण्णा हजारे यांच्या प्रमुख उपस्थितीत ५ जानेवारी रोजी पार पडलेल्या बैठकीत डॉ. धायगुडे यांची निवड जाहीर करण्यात आली.



अण्णा हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली लोक आंदोलन न्यासचे संघटन देशभर मजबूत करण्याचे ठरविण्यात आले. आतापर्यंत आंदोलनामुळे १५ कायदे अंमलात आणल्याचे हजारे यांनी बैठकीत सांगितले. तसेच शहरापासून ग्रामीण भागापर्यंतपोहोचलेली भ्रष्टाचाराची कीड संपविण्यासाठी लोक आंदोलन न्यासच्या माध्यमातून कार्य करण्याची जबाबदारी जिल्हाध्यक्षांवर सोपविण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले. निवडीचे पत्र कार्याध्यक्षा कल्पना इनामदार यांनी दिले. यावेळी सचिव अशोक सब्बन, खजिनदार दत्ता आवारी, अन्सार शेख यांच्यासह विविध जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# समाजकार्याबद्दल प्रा आशिष इंगळे यांना राष्ट्रीय एक्सलन्स पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ जानेवारी**
ओम सेवाभावी संस्था परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद व राष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय एक्सलन्स पुरस्कार २०२५ या मानांकित पुरस्काराने प्रा. आशिष इंगळे यांना सन्मानीत करण्यात आले आहे.



हिंगोली जिल्ह्यातील माळधामणी गावचे रहिवाशी असलेले व शिवाजी महाविद्यालय हिंगोली येथे कार्यरत असलेले भौतिकशास्त्र विषयाचे प्राध्यापक आशिष मारोतराव इंगळेयांनी आतापर्यंत शिक्षकांच्या प्रश्नसाठी आवाज उठवून न्याय देण्याचे कार्य करीत आहेत तसेच सामाजिक कार्यातून विविध उपक्रम राबऊन समाजकार्य करीत आहेत. तसेच पर्यावरण क्षेत्रात आतापर्यंत हजारो वृक्षारोपण चे वाटप त्यांनी केले आहे. आतापर्यंत प्रा. आशिष इंगळे यांनी एक हजार पुस्तके व १ हजार वृक्षारोपण वाटप करून एक सामाजिक आदर्श निर्माण केला आहे. याच त्यांच्या कार्याची दखल घेऊन यावर्षीचा राष्ट्रीय एक्सलन्स पुरस्कार २०२५ या मानाकीत पुरस्काराने प्रा. इंगळे यांना सन्मानीत केले आहे. राष्ट्रीय एक्सलन्स पुरस्कार मिळाल्याबद्दल विविध समाज माध्यमातून प्रा. आशिष इंगळे यांचे अभिनंदन केले जात आहे. यावेळी प्रा. इंगळे यांनी असे सांगितले की आपणही समाजासाठी देशासाठी कार्य करत राहून शैक्षणिक कार्यासबोत सामाजिक कार्याची बांधलकी जपावी.

# हिंगोलीत ओबीसी समितीची बैठक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ जानेवारी**
जिल्ह्यातील सर्व ओबीसी समाजातील सर्वपक्षीय नेते, व्यापारी तसेच कर्मचारी व ओबीसी समितीची विविध प्रश्नांवर बैठक घेण्यात आली.

या बैठकीमध्ये येणाऱ्या काळात ओबीसीच्या समस्या आणि ओबीसीच्या मागण्यांसाठी कृती समिती स्थापन करण्यासंबंधी नियोजन करण्यात आले

यावेळी भास्करराव नाईक पंडागळे, ॲड गयबाराव नाईक, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, अशोक श्रीरामे, ॲड पंजाबराव चव्हाण, बालाजी घुगे, विलास आघाव, अँड प्रकाशराव बांगर, कैलासराव बांगर, अविनाश बांगर, भरतराव जाधव संजय राठोड, प्रकाश राऊत, गिरीश घुगे, श्रीराम मुसळे, संदीप घुगे, लखन शिंदे, दीपक गीत, तुळशीराम घुगे, विठ्ठल बांगर, जय घुगे, केशव जराड शिवाजी घुगे, गोपाल बांगर, दीपक बांगर, विजय घुगे, रवी कुटे, सतीश खिल्लारे, रामप्रसाद हाके श्याम दराडे, बालाजी बांगर, गोपाल सातपुते, सोपान पोले, गणेश दराडे, भैया बांगर, रवी दराडे, महेश बांगर, भास्कर पोले, बाजीराव घुगे तसेच ओबीसी या घटकातील अनेक मान्यवर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

# अल्टरनेटीव्ह मेडीसीन डॉक्टर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी डॉ. पाटेकर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ जानेवारी**
भारतभरातील सहयोगी डॉक्टरांच्या हक्क आणि अधिकारासाठी कार्यरत अल्टरनेटीव्ह मेडीसीन डॉक्टर्स असोसिएशनच्या हिंगोली जिल्हा अध्यक्षपदी येथील डॉ. मिरा दत्ता पाटेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. माधव हिवाळे यांनी गुरुवार, ९ जानेवारी रोजी पाटेकर यांना निवडीचे पत्र दिले. डॉ. मिरा पाटकर यांचे हिंगोली जिल्हयाच्या वैद्यकीय क्षेत्रात मोठे नाव असून त्यांचा जनसंपर्कही दांडगा आहे. त्यांच्या वैद्यकीय कार्यायाची दखल घेवून त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली असून नवनियुक्त पदाधिकार्यांनी सहयोगी डॉक्टरांच्या हक्क आणि अधिकारासाठी कार्यरत रहावे. यासोबतच अल्टरनेटीव्ह मेडीसीन डॉक्टर्स असोसिएशनने स्थापनेपासूनच देशभरातील डॉक्टरांच्या अधिकारासाठी मोठा लढा उभारून डॉक्टरांच्या पाठशी ठामपणे उभी राहीली आहे. अनेक अन्यायग्रस्त डॉक्टरांसाठी असोसिएशनने न्यायालयात कायदेशीर लढा देवून त्यांना न्याय मिळवून दिला आहे. त्यामुळे नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी एकजुटीने व एकदिलाने ग्रामीण व दुर्गम भागात वैद्यकीय सेवा करणार्या सहयोगी डॉक्टरांच्या हक्क अधिकारासाठी संघटनात्मक कार्य करावे असे आवाहन डॉ. हिवाळे यांनी केले.

## संक्षिप्त वृत्त

### आदमपूर, गळेगांव, थडीसावळी परिसरात हरभऱ्यावर पसरला रोग

**आदमपूर**-ग्रामीण आदमपूर,गळेगांव,थडीसावळी, ता.बिलोली परिसरात बहरात आलेल्या हरभरा पिकांवर रोग पसरल्याचे सद्यस्थितीत चित्र आहे. मागे काही प्रमाणात दमट वातावरण चार आठ दिवस निर्माण झाल्याने चहूकडे धुके पडलेले होते.त्याचाही परिणाम हरभरा पिकावर सर्वत्र दिसून येत आहे.शेतकर्‍यांकडून आता हरभरा पिकावर अंतिम फवारणी शेतकरी करताना दिसून येत आहेत.पहिला,दुसरा,तीसरा फुलांचा बहार हरभऱ्यास बसलेला आहे.घाटी हरभऱ्यास लगडल्याने शेतकरी आनंदात असताना ही समस्या आ वासून शेतकऱ्यांसमोर उभी राहिली आहे.परंतु ऐन बहरात असताना धुके किंवा अंतर्गत बुरशीजन्य रोगाने हरभरा करपून जात असल्याने, शेतकरीवर्गांत काहीशी निराशा पसरलेली दिसून आली.आधी पेरणी झालेल्या हरभऱ्यास घाटी लगडलेली आहे,तर मागून पेरणी केलेल्या हरभऱ्यास फुलांचा बहार आलेला आहे. आदमपूर,गळेगांव,थडीसावळी परिसरातील काही शेती पट्ट्यात हा रोग आढळून येत आहे.जोमदार आलेले पीक शेत शिवारात काही भागात जागोजागी करपून पिवळे झाल्याने शेतकरी उपाययोजना करण्यात हतबल होताना दिसून येत आहेत.अनेक समस्यांवर उपाय करीत,पिकांचे संवर्धन करीत शेतकरीवर्ग नियमित तगताना, जगताना या हरभरा उधळण्याच्या समस्येने सद्यस्थितीत चिंतेने ग्रासल्याचे चित्र आहे.

### गंगाधर वानोळे यांना राज्यस्तरीय पुरस्कार

**भोकर**-तालुक्यातील बोरवाडीचे भूमिपुत्र तथा जालना जिल्हा परिषद शिक्षण सेवेत कार्यरत असलेले प्रयोगशील शिक्षक तथा भोकर तालुका आदिवासी समाजाचे समन्वयक, माझा गाव सुंदर गाव गारगोटवाडीचे समन्वयक, लोकसेवा संस्थेचे सचिव उपक्रमशील शिक्षक गंगाधर यशवंतराव वानोळे यांना शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल बीड जिल्ह्यातील मातृभूमी प्रतिष्ठानने राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला. हभप.मोहन महाराज खरमाटे यांच्या अध्यक्षतेखाली १२ जानेवारी,२०२५ रोजी बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनात पुरस्कार वितरण सोहळा घेण्यात आला. सुप्रसिद्ध कीर्तनकार महंत हभप.राधाताई सानप महाराज यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उद्घाटन करण्यात आले. माजी आ. ॲड.उषाताई दराडे, सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी,जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, प्राचार्य डी.जी.तांदळे,उद्योजक इंजि.उत्तमराव मिसाळ, संपादक प्रा. ज्ञानेश्वर वाघ, मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.संजय तांदळे, प्रा.बाळासाहेब नागरगोजे, पांडुरंग जायभाये आदींची प्रमुख उपस्थिती होती.या सोहळ्यात वानोळे यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील १७ शिक्षक - शिक्षिकांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार तर अन्य क्षेत्रातील १५ नामवंतांना गुणवंत पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

### सिडको येथे पौष बुद्ध पौर्णिमा उत्साहात

**नवीन नांदेड**-सिडको येथे पौष (बुद्ध )पौर्णिमा निमित्त ठिकठिकाणीच्या अन्य बुद्ध विहारासह डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथेही पौष बौद्ध



पौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. सिडको येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे दिनांक १३ जानेवारी रोजी बौद्ध पौर्णिमा निमित्त तथागत भगवान बुद्ध यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला व नंतर वंदना घेण्यात आली. यावेळी सिडकोतील लहान थोर मंडळी सह महिलांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे सकाळी ११ वाजता खिरदान विलास गजभारे तर भोजनदान पंचशील बुद्ध विहार कमिटीच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी सिडको परिसरातील समाज बांधवांनी खिरदान व भोजनदानाचा आस्वाद घेतला.

# उपोषणास बसलेल्या गुत्तेदाराचे साहित्य जळून खाक

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १३ जानेवारी**

थकित बिलासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर कुटूंबासह उपोषणास बसलेल्या गुत्तेदाराचे साहित्य जळून खाक झाल्याची घटना दि. १३ जानेवारी रोजी उघडकीस आली. दरम्यान हा प्रकार कुटूंबास जिवंत जाळण्याचा असल्याचा आरोप गुत्तेदाराने केला आहे. याप्रकरणी सायंकाळी उशीरापर्यंत शिवाजीनगर पोलीस ठाण्यात कुठलिही नोंद करण्यात आली नाही.



गुत्तेदार राजु चुन्नप्पा हलगुंडे यांनी मौजे ताडकळस ते धानोरा काळे या ८.५ किलोमिटर रस्त्याचे काम केले आहे. अनेक वेळा पाठपुरावा कुरूनही बिल मिळत नसल्याने त्यांनी यापुर्वी मुंबई येथे उपोषण केले होते. यावेळी तात्काळ बिल आदा करण्याचे आदेश देण्यात आले परंतु बिल मिळाले नसल्याने राजु हलगुंडे यांनी दि. ३० डिसेंबर पासुन सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयासमोर कुटूंबासह उपोषण सुरू केले आहे. दरम्यान रविवारी रात्री हलगुंडे परिवार झोपल्यानंतर त्यांचे अंथरून, पांघरून पेट घेत जळून खाक झाले. याप्रकारामुळे नांदेड शहरात खळबळ उडाली आहे. हा प्रकार जिवंत जाळण्याचा असल्याचा आरोप गुत्तेदार हलगुंडे यांनी केला आहे.

दरम्यान शिवाजीनगर पोलीसांनी उपोषण स्थळी भेट दिली असली तरी उशीरा पर्यंत कुठलाही गुन्हा दाखल करण्यात आला नव्हता.

# चाकुने हल्ला करून स्कुटी चोरणाऱ्या पाच जणांना अटक



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १३ जानेवारी**

जिम ट्रेनरवर हल्ला करून स्कुटी चोरून नेणाऱ्या आरोपींना ग्रामीण पोलिसांनी अटक केली असून त्यांच्याकडून १ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

शहरातील लोकमित्र नगरीतील जिम ट्रेनर दीपक कापरे व त्यांचे मित्र दि. १० जानेवारी रोजी रात्री साडे अकराच्या सुमारास पीव्हीआर समोरील रोड वरून कौठ्याकडे जात असताना पाच जणांनी त्यांना अडवूनन मारहाण केली. तसेच एका स्कुटीची तोडफोड केली तर एक स्कुटी चोरून नेली. याप्रकरणी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्यातील आरोपिंना ग्रामीण पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी दर्शन अंकुशराव टाक, अभिजीत नामदेश चव्हाण, आदित्य रामदास सोनमकर, प्रसाद दत्ता फुलारी व महेश आनंदा शिंदे या पाच जणांना अटक केली असून त्यांच्याकडून एक एक्टिवा स्कुटी, गुन्ह्यात वापरलेल्या दोन मोटरसायकल, एक स्कुटी व लोखंडी खंजर असा एकूण १ लाख ८५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे, पोहेकॉ वाकडे, सत्तार, सुनील गटलेवार, पवार, कल्याणकर, आवळे,तेजबंद यांच्या पथकाने केली.

# कमी भावाने विकत असलेल्या शेतीमालाला भावांतर योजना द्या : कलंबरकर



**तभा वृत्तसेवा**
**मुक्रमाबाद,दि. १३ जानेवारी**

शेतीमालाला सद्या बाजारात खूप कमी भाव मिळत आहे.शेतकऱ्यांचा शेतमाल बाजारात आला की भाव कमी केले जातात, ही कायमची समस्या झाली आहे.सरकारचे खरेदी काटे बोटावर मोजण्याइतकेच आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना मिळेल त्या भावात सोयाबीन,तूर,कापूस इ. शेतमाल बाजारात विकावा लागतो.म्हणून सरकारने कमी भावात विकलेल्या शेतीमालाला भावांतर योजना लागू करून असलेला भावफरक द्यावा अशी मागणी तहसीलदार राजेश जाधव यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांकडे शेतकरी नेते शिवशंकर पाटील कलंबरकर यांनी दि.१३ जानेवारी रोजी केली आहे.

सरकारने सोयाबीनला ६००० रुपय भाव देणार असे जाहीर केले होते.शेतकरी आता सोयाबीन बाजारात ४१०० ते ४२०० रुपयने विकत आहे.हा प्रतीक्विंटल १८०० ते १९०० रुपय भावफरक आहे. तो सरकारने दिलेल्या शब्दाप्रमाणे शेतकऱ्यांना दिला पाहिजे.सोयाबीन प्रमाणे कापूस,तूर इत्यादी पिकांची तीच अवस्था झाली आहे.असे निवेदनात सांगितले आहे.यावेळी गिरीधर पाटील,अशोक बच्चेवार,शाम पाटील इंगोले आदी उपस्थित होते.

# अतिवृष्टी अनुदान प्राप्तीसाठी शेतकऱ्यांनी प्राधान्याने ईकेवायसी पूर्ण करावी : किशोर यादव

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. १३ जानेवारी**

माहूर तालुक्यात गत २०२४ या वर्षी १ ते ३ सप्टेंबर या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे शेती पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. त्यावरुन माहूर तालुक्यासाठी शासन स्तरावरून अतिवृष्टी नुकसान भरपाई रक्कम म्हणून ३५ कोटी ११ लाख ६८ हजार ४०८ रूपये मंजूर झाले असून,सदरील अनुदान रक्कम डीबीटी (थेट लाभ हस्तांतरण) प्रणाली द्वारे शेतकर्‍यांच्या बँक खात्यात जमा होणार आहे.



प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या लाभासह अतिवृष्टी आणि इतर कारणांमुळे मिळणाऱ्या लाभासाठी शेतकऱ्यांनी ई-केवायसी करावी. ई-केवायसी पूर्ण केल्याशिवाय लाभाची रक्कम बँके खात्यात जमा होणार नसल्याने शेतकऱ्यांनी प्राधान्याने ई-केवायसी पूर्ण करावी ! असे आवाहन तहसीलदार किशोर यादव यांनी केले आहे. खरीप हंगाम २०२४-२५ मधील गत सप्टेंबर महिन्यात दि.१ ते ३ या कालावधीमध्ये अतिवृष्टीमुळे तालुक्यातील बाधित झालेल्या शेतकऱ्यांची संख्या ही एकूण २६ हजार १७२ आहे तर, त्यापैकी दि. ९ जानेवारी पर्यंत शेतकरी ई-पोर्टलवर केवळ १६ हजार ४०९ शेतकऱ्यांनी आपली माहिती अपलोड केली आहे. परंतू ,१० हजार १४४ शेतकऱ्यांची ई-केवायसी प्रलंबित आहे.याआ शेतकऱ्यांनी आपली माहीती अपलोड केलेली नाही.माहीती अपलोड करुन घेण्यास आपापल्या संबंधित गावसज्जाचे तलाठी व कोतवाल हे याकामी सहकार्य करीत आहेत. तेव्हा अशा सर्व व्हिके नंबर प्राप्त झालेल्या शेतकऱ्यांनी तात्काळ प्रलंबित असलेली ई-केवायसी करून घ्यावी.त्याशिवाय अनुदान रक्कम ही बँक खात्यावर जमा होणार नाही.तर ज्या शेतकऱ्यांना व्ही के नंबर प्राप्त झाले नाहीत त्यांनी आपल्या सज्जाच्या तलाठ्याशी संपर्क साधुन व्हि के नंबर प्राप्त करून घ्यावेत जेनेकरून अतिवृष्टी नुकसान भरपाई अनुदानाची रक्कम आपल्या बँक खात्यावर जमा होण्यास विलंब होणार नाही असे तहसीलदार यादव यांनी सांगितले आहे.

तालुक्यात सध्यस्थितीत १० हजार १४४ शेतकऱ्यांची ई-केवायसी प्रलंबित आहे. शेतकऱ्यांनी प्रलंबित असलेली ईकेवायसी तातडीने पूर्ण त्यांच्या बँक खात्यात तातडीने मदतीची रक्कम जमा करण्यात येते. शेतकऱ्यांना राज्य शासनाकडून विविध योजनेत दिली जाणारी मदत, अनुदान ई-केवायसी प्रलंबित असल्याने ती मिळण्यास अडचण जाते. ही प्रक्रिया प्रलंबित असल्यास शेतकरी लाभापासून वंचित राहतो. त्यासाठी शेतकऱ्यांनी ई-केवायसी करणे आवश्यक आहे. ई-केवायसी अभावी लाभापासून कोणताही शेतकरी वंचित राहू नये, यासाठी शेतकऱ्यांनी प्रलंबित ई-केवायसी तातडीने पूर्ण करावी ! असे आवाहन माहूरचे तहसीलदार किशोर यादव यांनी केले आहे.

# सगरोळीत बुधवारी विमानांच्या चित्तथरारक कवायती

## भारतीय थलसेना दिनानिमित्त एरोमॉडलिंग शो

**तभा वृत्तसेवा**
**बिलोली ,दि. १३ जानेवारी**

विमानांच्या चित्तथरारक कवायती, पुष्पवृष्टी, विमानातील विज्ञान समजावून सांगणारा, विद्यार्थ्यांना वैमानिक होण्यासाठी प्रेरित करणारा व यापूर्वी कधीही न अनुभवलेल्या अद्भुत अशा एरोमॉडलिंग शो चे आयोजन भारतीय थलसेना दिनानिमित्त सगरोळी (ता.बिलोली) येथील राजर्षी श्री छत्रपती शाहू सैनिकी विद्यालयातर्फे बुधवार (दि.१५) रोजी करण्यात आले आहे.



येथील सैनिकी विद्यालायातर्फे भारतीय थलसेना दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन केले असून यापैकी एरोमॉडलिंग शो हा उपक्रम परिसरातील ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी पहिलाच अनुभव व आकर्षण असल्याने विद्यार्थी व नागरिकांमध्ये हा शो पाहण्यासाठी उत्सुकता लागली आहे. रेडीओ कंट्रोलवर उडणाऱ्या विमानांची आकर्षक प्रात्याक्षिके, लढाऊ विमानांच्या थरारक कसरती, हवाई पुष्पवृष्टी असे बरेच काही प्रत्यक्ष पहावयास व अनुभवयास मिळणार असून यासाठी केवळ प्रती विद्यार्थी वीस रुपये शुल्क ठेवण्यात आले आहेत. हा शो सकाळी ९ ते ११ यादरम्यान सैनिकी विद्यालयाच्या मैदानावर होणार असून परिसरातील अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या शोचा अनुभव घ्यावा असे आवाहन सैनिकी विद्यालयातर्फे करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी चाकूर येथील बीएसएफचे महासंचालक विपीन कुमार हे विशेष अतिथी म्हणून राहणार आहेत. यावेळी भारताच्या संरक्षणात आपुले जीवन समर्पित केलेल्या भारतीय सैनिकांच्या अमर जवान ज्योती



स्थळास ' पु ष्प च क' अर्पण, महासंचालक महोदय यांना गार्ड ऑफ ऑनर तथा मानवंदना, नांदेड जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिकांच्या देशसेवेप्रति कृतज्ञता व गौरव सोहळा आयोजित केला आहे.

# किनवट क्रिकेट प्रीमियर लीगचा बक्षीस वितरण सोहळा उत्साहात

## आ. भीमराव केराम यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान

**डॉ. नागरगोजे वॉरियर्स विजेता**

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. १३ जानेवारी**

किनवट येथे दि. १ जानेवारी ते ८ जानेवारी यादरम्यान संपन्न झालेल्या किनवट क्रिकेट प्रीमियर लीग पर्वत दोन स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ उत्साहात साजरा झाला असून विजेत्या क्रिकेट संघांना आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते पारितोषिक वितरित करण्यात आले.



दरवर्षीच किनवट येथील एन के गार्डन समोरील भव्य मैदानात किनवट क्रिकेट प्रीमियर लीगच्या वतीने क्रिकेट सामन्याचे भव्य स्वरूपात आयोजन केले जाते यावर्षी दि १ जानेवारी ते ८ जानेवारी या कालावधीत पर्व २ क्रिकेट स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत राज्यातील नामांकित ८ क्रिकेट संघानी सहभाग नोंदीला होता. या स्पर्धेत आ. भीमराव केराम यांचेकडून १ लाख ५१ हजार रु.चे प्रथम पारितोषिक, माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास नेम्मानीवार व संदीप केंद्रे यांच्या संयुक्त विद्यमाने १ लाख १ हजार रुपये द्वितीय पारितोषिक, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार यांच्याकडून तृतीय ७१ हजार रु तर शिवसेनेचे तालुका प्रमुख बालाजी मुरकुटे यांच्याकडून ५१ हजाराचे चौथे पारितोषिक जाहीर करण्यात आले होते. या स्पर्धेत डॉक्टर नागरगोजे हॉस्पिटल वॉरियर्स क्रिकेट संघाने प्रथम पारितोषिक समर्थ फायटर क्रिकेट संघाने द्वितीय पारितोषिक पटेल टू क्रिकेट संघाने तर ते तर विशाल योद्धा सर्कल क्रिकेट संघाने चतुर्थ पारितोषिक पटकाविले विजेत्या क्रिकेट संघांना आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले.

या स्पर्धेत उमरी बाजार येथील संकल्प गिरी या खेळाडूने मालिकावीर सन्मान पटकाविला आहे तर विजय पेटकुले या खेळाडूने उत्कृष्ट गोलंदाज व राहुल वाडगुरे या खेळाडूने उत्कृष्ट फलंदाजीचा बहुमान मिळविला आहे. मुंबई येथील जय पवार यांनी क्रिकेट सामन्याचे पंच म्हणून काम पाहिले. youtube द्वारे या क्रिकेट सामन्याचे थेट प्रक्षेपण दाखविण्यात आले. या बक्षीस वितरण सोहळ्याला माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार,माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास नेम्मानिवार, संदीप केंद्रे बालाजी मुरकुटे, भाजपा नेते अनिल तिरमनवार, सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक यशवंत जाधव, मारोती दिवसे, दत्ता आडे, शिवा आंधळे यांची उपस्थिती होती स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी बालाजी मुंडे प्रदीप आत्राम शिवाजी जाधव शुभम हजबे विजय पेटकुले मुज्जू चाऊस अक्षय मरस कोल्हे शेख माजिद यांच्यासह इतर खेळाडूंनी परिश्रम घेतले.

# ॲड. विशाल भवरे यांना नोटरी व्यवसाय प्रमाणपत्र प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. १३ जानेवारी**

माहूर तालुक्यातील पडसा येथील रहिवासी ड.विशाल उत्तम भवरे यांना भारत सरकार व्यवसाय प्रमाण पत्र प्रदान करण्यात आले आहे.नोटरी कायदा,१९५२ (१९५२ चा ५३) अंतर्गत नोटरी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे आणि त्यांना पाच वर्षांच्या कालावधीसाठी संपूर्ण माहूर न्यायालयात नोटरी म्हणून काम करण्यास भारत सरकार,उप विधिक सल्लागार विधि व न्याय मंत्रालय विधि कार्य विभाग नवी दिल्ली सविता रानी सिंगल यांनी डिजीटल स्वाक्षरीने नुकतेच ९ जानेवारी रोजी दिले आहे. ड्व्होकेट विशाल उत्तम भवरे यांना नोटरी प्राधान्य झाल्यामुळे त्यांचे अभिनंदन करत पुढील व्यावसायिक वाटचालीसाठी भाजपाचे नेते अनिल वाघमारे, नंदु संतान, महेंद्र पट्टेकर, ड. दिनेश मेहता, महेंद्र घाळवट, अमृत जगताप, मगरे आदिंनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# खा. प्रा.रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते सुष्मिता जाधवचा गौरव



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १३ जानेवारी**

मध्यप्रदेशातील सतना येथे झालेल्या वेस्ट झोन इंटर युनिव्हर्सिटी टेबल टेनिस २०२४-२५ स्पर्धेत महाराष्ट्राचे नेतृत्व करतांना स्वामी विवेकानंद नगर नांदेड येथील कु.सुष्मिता गणेश जाधव हिने अनिल बंदेल सर यांच्या प्रशिक्षणाखाली रौप्य पदक पटकावून दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवडीबद्दल नांदेड जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार प्रा.रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी सत्कार करून पुढील वाटचालीसाठी जाधव कुटुंबीयांना शुभेच्छा देऊन सुष्मितास पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी युवक काँग्रेस तालुकाध्यक्ष गणेश कोकाटे सांगवीकर, गोविंद पाटील, प्रथमेश गिरी, संदीप जाधव व जाधव कुटुंब उपस्थित होते.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना तालुकास्तरावर सुरु

## नवीन अर्ज करण्यासाठी १५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १३ जानेवारी**

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील जे विद्यार्थी शासकीय प्रवेशास पात्र असून प्रवेश मिळालेला नाही. अशा विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिक्षण घेता यावे म्हणून भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा विद्यार्थ्यांना स्वतः उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक रक्कम संबधीत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट वितरीत करण्यासाठी १३ जुन २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्यात येत आहे.

शासन निर्णय क्र.बीसीएच/ प्र.क्र.२९३/शिक्षण-२, दि.२६ डिसेंबर २०२४ च्या निर्णयान्वये राज्यात दिवसेंदिवस वाढत आसलेली व्यावसायीक, बिगर व्यावसायिक महाविद्यालयांची संख्या आणि तेथे प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची वाढत आसलेली संख्या यामुळे सर्वच विद्यार्थ्यांना वसतीगृहातील जागेची मर्यादा लक्षात घेता प्रवेश देणे शक्य होत नाही व वसतीगृह सुरु करुन तेथे प्रवेश देण्यासाठी जागेची उपलब्धता व बांधकामासाठी लागणारा कालावधी लक्षात घेता मर्यादा येतात. त्यामुळे तालुकास्तरावर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरु केलेली आहे.

सदर योजनेसाठी अनु.जाती प्रवर्गातील तृतीयपंथी (Transgender) पात्र असतील

अनु.जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यास स्वाधार योजनेचा अर्ज भरण्याची मुदत प्रत्येक वर्षी जास्तीत जास्त ३० नोव्हेंबर पर्यंत राहिल. मात्र ज्या विद्यार्थ्यांचा निकाल उशीरा लागल्याने महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रिया उशीरा होईल, अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील प्रवेशानंतर एका महिण्याच्या आत स्वाधार योजनेसाठी अर्ज करता येईल.

**योजनेचा लाभ घेण्यासाठी निकष/सूचना:**

वद्यार्थी अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील असावा. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवाशी असावा. शासकीय वस्तीगृहात प्रवेशासाठी पात्र असलेल्या अभ्यासक्रमास विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेला असावा. विद्यार्थ्याने जात प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल. विद्यार्थ्याने नांदेड जिल्ह्यातील सामाजिक न्याय विभागाच्या कोणत्याही शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी विध्यार्थ्यानी अर्ज करणे आवश्यक आहे . परंतु शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळालेला नसावा. शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेशासाठी अर्ज सादर करतांना संबंधीत विद्यार्थ्यांने अर्जामध्ये स्वाधार योजनेचा पर्याय नमुद करणे बंधनकारक असेल.

# भोकर तालूक्यातील अवैद्य रेतीचे उत्खनन ; कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,दि. १३ जानेवारी**

तालूक्यात अनूसया कंन्स्ट्रक्शन नांदेड मार्फत व ईतर शासकिय गूत्तेदाराकडून २०१०-२०२४ दरम्यान च्या काळात अनेक ठिकाणी कामे सूरु आहेत सदरील कंत्राटदाराने भोकर तहसीलमधून एक हजार ब्रास रेतीची परवानगी घेवून पाच हजार ते साडेपाच हजार ब्रास दगड मूरुम व रेतीची अवैद्यरित्या उत्खनन करित असल्याने शासनाचा महसूल बूडत आहे रेतीची बेकायदेशीर वाहतूक रात्री बे-रात्री सर्रास होत असल्यामूळे घरकूलच्या लाभार्थ्यांना रेती उपलब्ध होत नाही शासन नियमानूसार लाभार्थ्यांना रेती मिळत नसल्याने जादा दराने रेतीची खरेदी करावी लागत आहे.यामूळे गोरगरिब लाभार्थ्यांना रेतीपासून वंचित रहावे लागत



आहे.महसूल प्रशासनाचे याकामी नेमण्यात आलेले पथक झोपेचे सोंग घेत असल्याची चर्चा सर्वत्र असून शासनाचा लाखो रुपयाचा महसूल बूडविणाऱ्या कंत्राटदारांची चौकशी करुन कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी प्रिंट मिडिया प्रदेश अध्यक्ष गोविंद गिरी चिदगीरीकर यांनी तहसीलदार यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.